म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८७७

सन १९५२

करॉलिन प्रॅट

# मुलेंच माझे गुरु

न व सा हि त्य

REFBK-0007751

मुलेंच माझे गुरु.

# मुलेंच माझे गुरु

( लेखिकेच्या "I learn from Children" या पुस्तकाचा संक्षिप्त अनुवाद )

ग्रं. क्र. ७७५१

REFBK-0007751

लेखिका

कॅरोलिन प्रॅ

अनुवादक

राम गजानन प्रधान

मुंबई

नव साहित्य प्रकाशन

प्रकाशक :
डी. के. कानजी,
मॅनेजर, नव साहित्य प्रकाशन,
पो. बॉ. नं. ४०३३
मुंबई ७

किंमत एक रुपया चार आणे

COPY RIGHT
Reproduced by the permission
of the Author and the Publisher.

मुद्रक :
म. ना. चापेकर,
आर्यसंस्कृति मुद्रणालय, लि.
१९८/१७ सदाशिव पेठ, पुणें २

१३६८०
१५।८।५२

# प्रास्ताविक

या देशांतल्या बालकांचा जीवनक्रम कसा सर्वस्वीं माझ्या या जीवनकालांतच पालटून गेलेला आहे, हें मीं पाहिलें. नाहींतर येरव्ही माझा देखील त्या गोष्टीवर विश्वास बसणें जड गेलें असतें. बालकांचें जग संकुचित होत होत, त्याला एका निरुंद कोटडीचें स्वरूप प्राप्त झाल्याचें, आणि त्याच्याभोंवतीं गुंतागुंतीच्या यांत्रिक गूढांचीं, आणि मोटारीच्या वेगावर पळणाऱ्या शहरी पार्श्वभूमीच्या धोक्याची तटबंदी उभी झाल्याचें मला दिसून आलें.

न्यूयॉर्कमधील फायटी व्हिले येथें मी लहानाची मोठी होत असतांना शाळा म्हणजे कांहीं मोठी महत्त्वाची बाब आम्हां मुलांच्या लेखीं नव्हती, स्वैरपणानें भोंवतालचे जगांत भटकूनच तीं आपलें शिक्षण करीत असत. दूध कोठून येतें, आणि लोणी कसें तयार करतात, हें आम्हांला कांहीं कोणीं मुद्दाम शिकविलें नव्हतें. गव्हाच्या हंगामाच्या वेळीं आम्हीं मदत केली, तो गहूं आमच्याच नदीवरल्या पिठाच्या चक्कींत दळतांना बघितला. वयाच्या तेराव्या वर्षीं मीं कुटुंबाच्या स्वयंपाकाचा भार उचलला. आमच्या नदीवर एक कागदाची गिरणी देखील होती. शेजाऱ्याच्या दुकानाचें मुक्तद्वार असल्यामुळें आम्हीं आणखी अर्धा डझन उद्योगधंद्यांचीं गुपितें अवगत करुन घेऊं शकलों. ज्या जगांत आम्हीं जन्म घेतला, तेथें कसें रहावें, आणि त्याच्या कामांत कसा भाग घ्यावा याबद्दल महत्त्वाची विद्या अवगत करण्याची जागा अगदीं आमच्या लगतच शाळेच्या चार भिंतींपलीकडे होती.

मुलांच्या अटोक्याच्या बाहेर असलेल्या जगाबद्दल त्यांना समजूं शकणाऱ्या परिभाषेंत ज्ञान देणाऱ्या शाळेच्या ऐवजीं, प्रत्यक्ष जगांत लहानाचे मोठे होत असतांनाच पुढें प्रत्यक्ष प्रसंगीं आपलें योग्य स्थान आत्मविश्वासानें ग्रहण करतां येण्याच्या लायकीचें ज्ञान घेतां येतें, असा बदल मी माझ्या अनुभवानें बघून घेतला.

१९०१ मध्यें मीं नॉर्मल स्कूलमधून राजीनामा दिला, आणि न्यूयॉर्क येथें माझ्या अध्यापन–विषयक कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचा मार्ग धुंडाळण्यासाठीं आलें, तेव्हांपासून खुद्द त्या मुलांच्यामुळें माझ्याच शिक्षणांत महत्त्वाची भर पडली. मला जेवढें कांहीं ज्ञान मुलांच्याबद्दल आतां आलें, तें त्यांचें त्यांनींच मला शिकवलें. नव्या भूखंडाचा शोध लावणाऱ्या कोलंबसाचा अभिमान वाटण्याजोगे क्षण अनेकदां माझ्या वांट्यास आले· आणि याच्या उलट कधीं कधीं बाल–जगांतल्या मोकाटपणामध्यें माझ्या, सारख्या मामुली बाईला नीट वाट देखील सांपडली नाहीं.

कॅ. प्रॅ.

# क्रम


| | | |
|---|---|---|
| १. | विद्यालय म्हणजे काय ? ... ... ... | ९ |
| २. | प्रथम अनुभूति ... ... ... | १४ |
| ३. | एक नवें स्वप्न ... ... ... | १९ |
| ४. | शाळेचा आरंभ ... ... ... | २६ |
| ५. | नवी शाळा, नवे शिक्षक ... ... ... | ३२ |
| ६. | मॅक्डुगल अलेंतून स्थलांतर ... ... | ४१ |
| ७. | सातवें वर्ष—एक विकासशील वर्ष ... ... | ५१ |
| ८. | अष्टवर्षीय काम पत्करतात ... ... ... | ६१ |
| ९. | बालकांसाठीं अधिक कार्यक्रम ... ... | ६८ |
| १०. | वाचनाचा अभ्यास ... ... ... | ८१ |
| ११. | बालकांचीं नाटकें ... ... ... | ८६ |
| १२. | छोटेखानी लोकशाही ... ... ... | ९२ |

दा. क.
संग्रह शाखा

# १. विद्यालय म्हणजे काय ?

आमच्या विद्यालयाला भेट देण्यासाठीं येणारे बहुधा भांबावून जाऊन विचारीत असत, " याला तुम्ही विद्यालय म्हणतां ? "

मला त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटत असे, कारण त्यांच्या मनांत विद्यालयासंबंधींचें कोणतें चित्र असावें हें मला माहीत होतें,—जेथें प्रत्येक बालक जमिनीला खिळल्याप्रमाणें आपल्या बाकावर अगदीं स्तब्ध बसलेलें आहे, आणि जेथें शिस्तीशिवाय आपलें कार्य उरकणें शक्य नाहीं, अशा ठाम समजुतीनें शिस्त निर्माण करण्यासाठीं त्यांच्यासमोर शिक्षक बसलेला आहे, असा एक वर्ग हेंच तें चित्र होय.

अशा कोणत्याही प्रकारची स्तब्धता आमच्या वर्गांत नव्हती. नऊ वर्षांच्या एका मुलानें लिहिलेल्या गोष्टीच्या साहित्यिक गुणावगुणांसंबंधीं चर्चा करणाऱ्या अकरा वर्षांच्या मुलांच्या मासिकाच्या संपादक मंडळांत निर्माण झालेल्या मतभेदाचा आरडाओरडा एका कोपऱ्यांतून ऐकूं येत होता. आठ वर्षांची एक बालिका वर्गांतून इकडे तिकडे फिरत होती. आठ वर्षांच्या बालकांच्या पोस्ट—ऑफिसांतील ती एक पोस्टमन होती. नऊ वर्षांच्या बालकांनीं वर्गातील आपल्या बाल—सहाध्यायांसाठीं चालविलेल्या वस्तु—भांडारासाठीं कांहीं वस्तू खरेदी करून अकरा वर्षांचीं दोन मुलें वर्गांत परत आलीं. एक उंचेला बारा वर्षांचा मुलगा त्याच्या गटानें प्रकाशित केलेल्या ' प्रांगणांतला पक्षी ' या साप्ताहिकाच्या प्रतींचा ढीग घेऊन चालला होता. आणि भेट देण्यासाठीं आलेल्याच्या सराव नसलेल्या

कानांवर मुलांनीं चालविलेला गोंगाट येऊन आदळत होता. वर्गातील एकूण वीस जणांपैकीं फक्त एकटाच गप्प होता-तो म्हणजे शिक्षक.

अर्थात् हें चित्र शाळेंतील एकाद्या वर्गासारखें खचितच नव्हतें. कांहीं मोठ्या माणसांच्या हालचालींसारखाच तो सारा प्रकार होता. एकादी कचेरी, एकादा कारखाना, किंबहुना कारखाना व कचेरी एकत्र असल्या-सारखेंच वाटत होतें. येथील बालकें शाळेंतील बालकांसारखीं कशीं दिसावीं; कारण त्यांनीं आपापल्या कामाला योग्य असेच कपडे घातलेले होते.

हा वर्ग म्हणजे काम करण्याची जागा होती. काम करणाऱ्यांना एकाच ठिकाणीं डांबून बसविणें शक्य नव्हतें. आवश्यक वस्तू विकत आणणें, सल्लामसलत घेणें, पारखणें, तुलना करणें, चर्चा करणें आदि अनेकविध कामें करण्यासाठीं त्यांना ये जा करणें आवश्यक होतें !

वर्गातील शांततेच्या प्रमाणावर कामें केलीं जात नव्हतीं, तर आपल्या संबंध गटाच्या किंवा आपल्या स्वतःच्या, अशा कार्यांच्या जबाबदारीच्या भावनेनें कामें चाललीं होतीं.

अशा परिस्थितींत भेट देण्यास आलेली व्यक्ती भांबावून गेली नाहीं तरच नवल ! धांवपळ व आवाज यांनीं ती व्यक्ती भांबावून जात असे. आमच्या या पद्धतीचा तिला उलगडा पडत नसे, कारण त्या व्यक्तीला परि-चित असणाऱ्या प्रकारापेक्षां हा प्रकार कांहीं वेगळाच असे आणि म्हणूनच तो अधिक गुंतागुंतीचा वाटे. परंतु वास्तविकपणें हीच संभाव्य व परिचित अशी पद्धति होती. मोठीं माणसें घ्या किंवा लहान बालकें घ्या, ही पद्धति म्हणजे मानवी व्यापारांचा एक सर्वसामान्य असा प्रकार होता. परंतु या ठिकाणीं हीं अज्ञ बालकें असल्यानें गोंगाट होत होता, हालचाली गडबड-गोंधळाच्या वाटत होत्या. आणि येथें हीं बालकेंच असल्याकारणानें त्यांची शिक्षिका व तिच्या मदतीला असलेली शिकाऊ-शिक्षिका यांचें कार्य हें मोठ्या माणसांच्या कारखान्यांतल्या अथवा सुपरवाइजरपेक्षां अधिक अव-घड होतें. ह्या शिक्षिकेचें हें कार्य अत्यंत महत्त्वाचें होतें.

म्हणून जेव्हां जेव्हां कोणी भेट देणारे आम्हांला ही शाळा आहे कां

असें विचारीत तेव्हां तेव्हां आम्ही आमच्यापरी प्रश्न करीत असूं 'शाळा म्हणजे काय ?'

या प्रश्नाच्या प्रत्युत्तरार्थ शाळा म्हणजे शिकण्याची जागा हें उत्तर मुळींच नव्हे, तर केवळ निराळ्या पद्धतीनें तोच प्रश्न विचारणें होय. काय शिकण्याची जागा ? शिकण्याची जागा, कशी ?

मीं ज्या वेळीं प्रथमच वर्गांत शिकविलें त्या वेळीं मी अवघी सतरा वर्षांची होतें. खेडेगांवांतील एका खोलीवजा जागीं होती ती. प्रचलित शाळा अथवा शिक्षकांचें संस्करण यांपैकीं कसलाच फायदा मला मिळालेला नव्हता. शिकण्याची इच्छा बालकांत स्वभावःच असावी व ती अटळच आहे अशी मनाची ठाम समजूत करून घेतली.

खाणें व झोंपणें या अवस्था पार झालेल्या बालकांच्या जागृत जीवनांतील प्रत्येक दिवस, प्रत्येक तास हा त्यांच्या आंवतींभोंवतीं असणाऱ्या जगाचा ठाव घेण्यासाठींच कार्याला लावला जातो. बालकाच्या स्वतःच्या मर्यादांव्यतिरिक्त त्याच्या सर्वांत मोठ्या विकृती जर कोणत्या असतील तर त्या म्हणजे स्वाभाविक प्रवृत्तींनुसार वस्तूंना स्पर्श करण्याच्या, त्यांची जाणीव करून घेण्याच्या, त्या पहाण्याच्या, वास घेण्याच्या व चव घेण्याच्या त्यांच्या प्रयत्नांवर वडिलधाऱ्या माणसांनीं घातलेले निर्बंध होत. आणि बालकाची शिक्षणाची पद्धत ? आद्य व सर्वोत्तम म्हणजे यत्न व चुका करणें.

परंतु या चैतन्यशील प्रेरणेला कांहीं तरी बाधा येते खास. अगदीं मोजक्या स्त्री–पुरुषांखेरीज सर्वांची शिक्षणासंबंधीची उत्कंठा नष्ट पावलेली आहे. ते लहान असतांनाच ही उत्कंठा नष्ट झाली, शिक्षण घेण्याच्या जागीं –शाळेंत आपले दिवस घालवीत असतांनाच ती नष्ट झाली, किंबहुना त्यांची ती उत्कंठा नष्ट झाल्याची तीच जागा असावी !

कचऱ्याच्या टोपलींतून ठोकळे व भिन्नाकार खोकीं काढून घेऊन त्यांच्यापासून हुबेहुब लोहमार्गाची प्रतिकृति शिशुगृहांत खेळतांना तयार करणाऱ्या एका बालकापासून मी असें शिकलें कीं, बालकांत खेळाची जी स्वाभाविक प्रवृत्ति असते ती वस्तुतः कार्य–प्रवृत्तीच होय.

खेळणें हेंच बालपणाचें कार्य आणि अशा रितीनें खळतांनाच बालक स्वसंकल्पानुसार कार्य करीत असतें. कांहीं ऐतिहासिक घटनांचे खेळ खेळातांना बालकें जितकीं तन्मय होतात तितकी तन्मयता एकाद्या इतिहासाच्या पुस्तकासंबंधीं कोण्या बालकानें दाखविली नसेल.

बालकांच्या बाबतींत 'खेळ' या शब्दाचा त्यांचा स्वतःचा असा एक विशिष्ट अर्थ असतो. मोठ्या माणसांच्या बाबतींत या शब्दांच्या अर्थामध्यें आळशीपणा, अकारणता, कामापासून विश्रांति आदि ज्या कल्पना अभिप्रेत असतात तशा त्या बालकांच्या बाबतींत नसतात. आम्हीं ज्या वेळीं नव्यानेंच आमची शाळा सुरू केली त्या वेळीं तिला 'खेळण्याची शाळा' असें नांव दिलें; बालकें खेळांतूनच शिकत असतात हा हेतु व्यक्त करणें याचाच हा मार्ग होता, परंतु लौकरच शाळेच्या नांवांतून तो शब्द रद्द करणें बालकांनींच आम्हांला भाग पाडिलें; कारण, त्यांच्या बाबतींत ती 'खेळण्याची शाळा' नव्हती तर 'शाळा'च होती व तीं आपल्या या शाळेंत मन लावून शिकत होतीं.

बालकांना कशा प्रकारें शिकवावें हें मी त्यांच्याकडूनच शिकूं लागलें. त्यांची शिकण्यासंबंधींची उत्कंठा म्हणजे खेळण्यासंबंधींचीच उत्कंठा आहे हें मीं ताडलें. त्यांच्या या प्रवृत्तीचा अनादर करून ज्या क्षणीं त्या प्रवृत्तीला आम्हीं बाजूला करण्याचें ठरविलें आणि महत्त्वपूर्ण कामापासून भिन्न अशा प्रकारें ही प्रवृत्ति असल्याचें समजूं लागलों कीं त्या क्षणीं आम्हीं बालकाचें जीवन व्यर्थ दवडूं लागलों हें निःसंशय.

अननुभूत अशा अवस्थेंतच एखाद्या वस्तूला स्पर्श करणें, तिचा अनुभव घेणें ही जी एक उत्सुकता बालकांत असते तिची मला जाणीव झाली. खुद्द जगापासून प्रत्यक्ष शिक्षण घेऊं देण्याऐवजीं आम्हीं त्यांना शिक्षकाच्या मध्यस्थीनें शिक्षण देऊं लागलों—जीवनापासून प्रत्यक्ष शिक्षण घेण्याला वाव देण्याऐवजीं पुस्तकांकरवीं त्यांच्यावर शिक्षण लादूं लागलों कीं, तत्क्षणींच पुन्हां आम्हीं त्यांचें जीवन व्यर्थ करूं लागलों असेंच होय. बालकाच्या शिक्षणांत अशी एक पायरी असते कीं, त्या वेळीं बालकापुढें असलेल्या जगाचा विस्तार खूपच वाढलेला असतो, आणि त्यामुळें जरी

त्याला खुद्द जगापासून प्रत्यक्षरीत्या शिक्षण घेणें शक्य होत नसलें तरी ज्या क्षणीं बालकाला आपलें शिक्षण कोणा मध्यस्थाकरवीं घेणें आवश्यक ठरतें तो क्षण गंभीरच होय. आंवतीभोंवतींच्या जगतांतून प्रत्यक्षरीत्या वस्तुस्थितीची पहाणी करून आपल्या मनाशीं तत्संबंधीच्या ज्ञानाचा निर्वाळा-कायम करण्यापूर्वी तत्संबंधीं आपल्या मनालाच प्रश्न विचारून त्याचें उत्तरहि आपण शोधून काढूं लागण्याच्या अवस्थेंत येण्यापूर्वींच जर त्यांच्या-वर शिक्षक अथवा पुस्तकें यांच्या मध्यस्थीनें ज्ञान लादूं लागलों तर त्यांच्या मनांत शिकण्यासंबंधीं जी एक उत्सुकता असते ती नष्ट करण्याची ही एक खाईच आपण निर्माण करतों खास !

तसेंच मला आणखीही एका गोष्टीची जाणीव झाली ती ही कीं, कारणपरत्वें शिकण्याची त्यांची उत्कंठा असते हें कारण तात्कालिक असतें, व्यवहार्य असतें व त्यांच्या धारणाशक्तीला झेंपेल असेंच असतें.

नों. नं. ९३५८० १५१.९५२

# २. प्रथम अनुभूति

अध्यापन महाविद्यालयांत शिकणें हें १८९२ सालच्या सुमारास प्रगतिपूर्ण कार्य समजलें जात असे, आणि सबंध देशांतून या महाविद्यालयांत शिकण्यासाठीं आलेल्या आम्हां स्त्रियांचा एक गट आपापल्या गांवांतील शाळांत येथून अभिनव अशा प्रकारचे विचार घेऊन जाणार या अभिनिवेशानें शिक्षण घेत होता. लहान बालकांच्या बाबतींत माझा अधिक ओढा असल्यानें शिशु–विहार संचालकाचा पेशा मला जास्त आकर्षक वाटला. परंतु त्या वेळीं प्रचलित असणाऱ्या शिशु–विहार-संचालना-संबंधींच्या नवनव्या पद्धती मी जसजशी शिकत गेलें तसतशी मी अधिकाधिक बुचकळ्यांत पडूं लागलें.

आम्हांला शिकविण्यांत आलें होतें कीं, बालकांनीं आपल्या शाळेंतील अभ्यासाला वर्तुळाकार अन् गप्प बसून सुरवात करावी. नंतर त्यांनीं गीत गाण्यास सुरवात करावी अथवा पाहिजे तर गोष्ट वाचून घ्यावी; परंतु वर्तुळाकार बसणें अत्यंत आवश्यक होय.

माझी जरी या पद्धतीसंबंधीं थोडीदेखील सहानुभूती नसली तरी व्यवहारांत तिला विशिष्ट महत्त्व होतें. शिशु–विहारांतील त्यांच्या हालचाली अगदीं शांतपणें झाल्या पाहिजेत, कोणत्याहि प्रकारची प्रक्षुब्धता त्यांत असतां नये. अर्थात् याचें प्रयोजन मोठेपणीं शिस्तीच्या दीर्घजीवनाला बालकांना योग्य बनविण्यासाठींच होतें.

अशा वेळीं माझ्या बंडखोरीचें पहिलें पाऊल म्हणजे आमच्या या अध्यापन–महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांकडे जाऊन शिशु–विहार संचा-

लनाचें हें शिक्षण मला पसंत नाहीं असें, जाहीर करणें हें होय. त्यांनीं मला हस्तकौशल्याचें शिक्षण घेण्याची शिफारस केली. अल्पावधींतच मी हस्तकौशल्याच्या विभागांत हातोडा व करवत हातीं घेऊन आनंदानें शिक्षण घेऊं लागलें.

मी या विभागांत एकामागून एक अवजार वापरण्यास व एकामागून एक काम करण्यास शिकत होतें. मी सरळ रेषेंत करवतीनें कापूं लागलें, लाकडाचा पृष्ठभाग एकसारखा करण्यास शिकलें, विंधण्यानें तासकाम करूं लागलें, मी निरनिराळ्या पद्धतीचे सांधे बनवूं लागलें आणि ते सफाईनें व निर्दोष बनवूं लागलें; परंतु एकादी वस्तु अशी मी बनविली नाहीं.

येवढें झाल्यानंतर एकाद्या मोठ्या माणसाला आपल्या स्वतःच्या तांत्रिक कलाकौशल्याच्या सुधारणेसाठीं प्रयत्न करण्यास लावणें ठीक आहे. आणि अंतीं आपल्याला त्यांतून कांहीं ना कांहीं यश मिळाल्याचें त्याला समजणें शक्य असतें. परंतु ही गोष्ट बालकांच्या बाबतींत खरी नाहीं, हें समजण्यास फारशी कल्पनाशक्तीची आवश्यकता नाहीं.

योग्य अवसर मिळतांच शिक्षणासंबंधीच्या माझ्या कल्पना व्यवहारांत आणण्याचा योग्य मार्ग हुडकून काढण्यासाठीं मी बाहेर पडलें. मला तशीं तीन कामें मिळालीं—एक म्हणजे एका लहानशा खाजगी शाळेंतील व दुसरीं दोन वसाहतगृहांतील होत. या तीन्हीं ठिकाणीं नवशिक्यांसाठीं माझ्या मनाप्रमाणें शिक्षण–गृहें चालविण्याच्या बाबतींत मला पूर्ण मोकळीक होती. आरंभापासूनच मीं बालकांना सांगितलें कीं, त्यांना जें आवडेल तें त्यांनीं करण्यास घ्यावें व त्यांत जर कां कांहीं अडचण आली तर मदत करण्यासाठीं मी तेथें आहेंच. काय करण्यास घ्यावें याबाबत बालकें गोंधळून जाऊं नयेत यासाठीं माझ्याजवळ, एक नाव, कांहीं पेट्या व बाहुल्या तयार करण्याचें कांहीं सामान अशी साधीसुधी सामुग्री होतीच. सुरवातीलाच फार मोठी महत्त्वाकांक्षा राखूं नका आणि जें कांहीं करण्याचें मनांत असेल त्याचा आरंभीं आराखडा काढून तें स्पष्ट करण्याचा उपदेश करणें हेंच माझें तंत्र होतें. आवश्यक त्या ठिकाणीं हत्यारांचा योग्य उपयोग कसा करावा हें मी त्यांना सांगत असें आणि त्यांच्या चुका सुधारून घेत

असे, ते करीत असलेली वस्तु सोप्या पद्धतीनें कशी करावी हें मी त्यांना दाखवून देत असें. माझा फक्त एकच नियम असे आणि तो म्हणजे ' **काम करा नाहीं तर बाहेर जा.** '

त्या काळीं प्रस्तुत असलेल्या दर्जाच्या दृष्टीनें पहातां आमच्या या तिन्ही कारखान्यांत बनलेल्या पेट्या, तिवया व खेळणीं हीं उत्तम प्रकारचीं नव्हतीं. आणि कौशल्यांत परिपूर्णता आणणें हें माझें आद्य लक्ष्य नव्हतें. माझ्या मतें जर कांहीं महत्वाचें असेल तर तें म्हणजे बालकांनीं आपल्याला करण्याच्या वस्तूंचा आराखडा तयार करणें, त्यावर विचार करणें व तदनंतर आपलें कार्य शक्य तोंवर स्वतःच पार पाडणें. बालकांकडून प्रश्नांची प्रतीक्षा करीत मी त्यांच्यापाशीं थांबत असें; एकादें बालक गोंधळांत पडल्यानंतरच मी आंत पाऊल टाकीत असें अथवा एकादें बालक संकल्पित वस्तु अवघड अशा पद्धतीनें करीत असेल तर त्याला सोपी पद्धत दाखविण्यासाठीं तेथें जात असें. बालकें शिकूं लागलीं परंतु केवळ कृति करण्यानेंच नव्हे तर तत्संबंधीं विचार करून व आराखडा काढून व तदनुसार कृति करून होय. या पद्धतीनें तयार होणाऱ्या वस्तु परिणामीं ओबडधोबड असल्या तरी जें कांहीं आपण तयार केलें आहे तत्संबंधीं बालकाला समाधान झालें किंवा नाहीं तेंच फक्त मी विचारीत असें.

बालकाच्या ठायीं असणाऱ्या कलाकौशल्याच्या वाढीबरोबरच त्यानें निर्माण केलेल्या वस्तूंचा दर्जा वाढूं लागतो. वस्तुतः त्याच्या कुवतीपेक्षां वस्तुबाबतचा त्याचा दर्जा हा उच्च असतां कामा नये ही गोष्ट अत्यंत महत्त्वपूर्ण आहे; नाहींपेक्षां आपली संकल्पित वस्तु तयार करण्यास सुरवात करण्यापूर्वीच त्याचा निरुत्साह होईल.

माझ्या या कार्यात मोठा बिकट प्रश्न जर कुठें निर्माण झाला असेल तर तो म्हणजे वसाहतींतील कारखान्यांत होय. येथें येणारीं बालकें ज्या कुटुंबांतील होतीं त्या कुटुंबांच्या घरीं जागेची इतकी अडचण होती कीं, आपण स्वतः तयार केलेल्या आणि अभिमानानें त्यांनीं घरीं आणलेल्या वस्तू घरांत ठेवण्यास जागाच नव्हती.

या बालकांना उपयोगी पडतील तसेंच त्यांच्या घरांतील आकुंचित जागेंतहि ज्या मावूं शकतील अशीं कोणतीं खेळणीं तयार करावींत या संबंधीचे प्रश्न माझ्या मनांत उभे राहिले. आणि ते सोडविण्यासाठीं म्हणून ज्याला एक लहान मुलगा होता त्या माझ्या एका मित्राला भेटण्यासाठीं मी त्याच्या घरीं गेलें.

त्या घरांतील जमिनीवर मला छोटीशी लोहमार्गाच्या पद्धतीची(Rail Road System ) प्रतिकृति आढळून आली. त्याचा लहानसा मुलगा ती ठोकळे, खेळणीं, निरनिराळ्या आकाराचीं कागदी खोकीं व इतर असेंच जें कांहीं मिळेल त्यांपासून बनवीत होता. त्याच्या या प्रतिकृतींतील एका स्टेशनापाशीं थांबण्यासाठीं येणारी ' फास्ट एक्स्प्रेस ' मार्ग मोकळा नसल्यानें ओरडत होती. आणि तिला मार्ग मोकळा करून देण्यासाठीं मार्गावर असलेली मालवाहू गाडी तो बाजूच्या रूळावर सरकवीत होता. त्या स्टेशनावर उतारू व मोटारगाड्या आदि वाहनें गर्दी करून उभीं होतीं हें सर्व मीं पाहिलें व आगगाड्यांच्या शिट्या आणि मोटारीचे कर्णे यांच्या आवाजांची नक्कल करणारा एकसारखा चाललेला आवाज मीं ज्या वेळीं ऐकला त्या वेळीं मला आनंद वाटला. मुलांना आजपर्यंत एकाद्या वस्तूपासून जो आनंद झाला असेल त्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक अशा प्रकारचा आनंद व समाधान मिळविण्याचा मार्ग या मुलानें शोधून काढला होता असें वाटलें मला त्या वेळीं ! त्यानें त्यासाठीं स्वतः सर्व गोष्टी पाहिल्या होत्या, वस्तुस्थितीच्या कल्पना संकलित केल्या होत्या आणि त्यांच्याकरवीं येथें माझ्या डोळ्यांदेखत तो आपण जें काय पाहिलें त्याचें परिपूर्ण असें बालकाचें पाठ्य पुस्तकच तयार करीत होता. येथें नकाशा, आकृति व क्रियाशील चित्रण यांच्या समन्वयानें तो पाहिलेल्या वस्तूंच्या हालचालींच्या व कार्याच्या पद्धतीची जाणीव करून घेत होता, घटनाघटनांतील परस्पर संबंध, कारणें व परिणाम, कार्य व कृति यांतील परस्पर संबंध यांची आपल्या तर्कशक्तीशीं ओळख करून देत होता. हाच विचार होय. हच शिक्षण होय. अशाच प्रकारें जर मुलाला स्वेच्छेनें कार्य करूं दिलें तर तें स्वतःला तांतडीचें वाटणारें व त्याला अत्यंत आवडीचें असें

आपल्या जगांतील विषयांचें ज्ञान वा शिक्षण स्वतःच प्राप्त करून घेऊं शकेल. परंतु त्यासाठीं एका गोष्टीचा अभाव होता व ती गोष्ट म्हणजे त्याच्या स्वतःच्या वयाचे त्याच्या बरोबरीनें काम करणारे साथीदार.

माझ्या मनांत निर्माण झालेल्या या विचारांतून जो सारांश निष्पन्न झाला तो म्हणजे अशा हालचालींचा—खेळांच्या हालचालींचा लहान मुलांना शिकविण्याच्या कामीं उपयोग करून घेतां येणें शक्य होईल.

स. क्रं. ...

# ३. एक नवें स्वप्न

मी बालकांच्या सृष्टिसंबंधीचें एक नवें स्वप्न पाहूं लागलें. ज्या सृष्टींत लोहमार्ग, शहरी रस्ते, शेतें व कारखाने, रस्त्यांना लागणारी साधनसामुग्री हीं सर्व जर बालकांना समजूं शकतील अशा प्रकारें बनाविलीं तर त्यांना त्यांचा नीट उमज पडेल. मी माझ्या कल्पनाचक्षूंपुढें बालकांचा असा एक वर्ग पाहूं लागलें कीं, जो आपल्यापरी हें सर्व जगत् व त्याचें कार्य यांची प्रतिकृति निर्माण करूं शकेल. लहानग्या व्यक्तींचें असें जगत् कीं ज्या आकार, सामर्थ्य व ग्रहणशक्ती यांत मोठीं माणसें आपल्या मोठ्यांच्या समुदायांत जशीं या बाबतींत एकसारखीं असतात तशाच या छोटेखानी व्यक्तीदेखील एकसारख्या असतील व ज्या केवळ या जगताबद्दलचें भौगोलिक सत्यच नव्हे तर सामाजिक सत्यें—व्यक्तिगत भिन्नत्व असतां देखील सर्वांनीं परस्परांसमवेत राहाणें व कार्य करणें वगैरेसंबंधींचीं सर्व महत्वाचीं लौकिक सत्यें शिकतील.

माझी ही योजना रचनेमध्यें अगदीं साधी सोपी होती.—छानशी जागा, खेळण्याचें मूलभूत सामान व अनेक बालकें सामुदायिकपणानें त्यांचा वापर करीत आहेत. या अगदीं साध्याशा घटकांच्या सहाय्यानें बालकांसाठीं मी एक शाळा निर्माण करूं शकेन असा मला आत्मविश्वास वाटूं लागला.

माझ्या तत्संबंधीच्या गरजा इतक्या साध्या असतांही मला त्या भागवून घेण्यासाठीं १९१३ सालच्या वसंतऋतूपर्यंत थांबावें लागलें. या वेळीं

माझ्या एका मित्रानें मला माझ्या योजनेसाठीं जागा मिळाल्यास योजनेला येणाऱ्या खर्चासाठीं रक्कम देण्याचें आश्वासन दिलें.

मी पश्चिमेकडील 'हार्टले हाऊस' या एका वसाहतींत गेलें व माझी संकल्पित योजना त्यांना समजावून दिली. मला आतां फक्त जागेचीच आवश्यकता होती. ती मिळाल्यास मी योजनेसाठीं लागणारी सामुग्री पुरवूं शकेन तसेंच माझ्या शाळेसाठीं बालकेंही मिळवूं शकेन असें सांगतांच तेथील लोकांनीं माझ्या या योजनेला पाठिंबा दिला व मला त्यांनीं त्यांच्या सभागृहाची जागा दिली.

यानंतर माझ्या योजनेंतील मोठी अडचण म्हणजे साधनसामुग्रीची होती. रंगित खडू, कागद व गोंद या वस्तू आवश्यक होत्याच. परंतु अशी एकादी लवचिक व वाटेल तसा आकार देतां येण्यासारखी वस्तु पाहिजे होती कीं जिचा वापर बालकें कोणत्याही मार्गदर्शनाशिवाय करूं शकतील.

बालकांसाठीं देण्यांत येणाऱ्या खेळण्याच्या साधनांपैकीं त्यांना सर्वांत योग्य अशी ठरणारी वस्तु म्हणजे ठोकळे होत. भूमितीमधील आकृतींच्या साध्यासुध्या आकाराचे ठोकळे बालकांना अनेक गोष्टींसाठीं उपयोगी पडतील. असा ठोकळा एकादी ट्रक गाडी अथवा होडी होऊं शकेल किंवा आगगाडी देखील बनूं शकेल. त्यांच्या सहाय्यानें एकाद्या कोठारवजा झोंपडीपासून गगनचुंबी इमल्यापर्यंतचीं घरें तयार करतां येतील.

परंतु येवढ्यानेंच भागलें असतें का ? आणखी कसली तरी आवश्यकता होती आणि ती म्हणजे संकलित माहितीची. मोठ्या माणसांच्या अटकळीपेक्षां अधिक संकलित माहिती बालकांपाशीं असते. जी माहिती ते ऐकतात व जी ते पोपटपंचीप्रमाणें घडाघड बोलून दाखवितात, तत्संबंधीं हें मी म्हणत नाहीं. मी म्हणतें ती माहिती म्हणजे बालकांनीं अभावितपणें मिळविलेली प्रत्यक्ष व ताजी माहिती होय. वाणी अथवा दूधवाला काय आणतात; घरांत, रस्त्यांत अथवा गांवांत राहाणाऱ्या बालकांच्या बाबतींत शेतांत काय चालतें; हें सर्व ज्ञान बालकांच्या मनांत खळबळ निर्माण करणारें आहे, या खळबळजनक गोष्टींची माहिती त्यांना वाचून दाख-

विलेली असेल तर मात्र त्याच खळबळजनक गोष्टी त्यांना नीरस वाटूं लागतात.

'खुद्द मनुष्यावरूनच मानव जातीचा योग्य प्रकारें अभ्यास करतां येतो,' ही गोष्ट बालकांना सांगण्याची आवश्यकता नाहीं. बालक जन्मल्या-दिवसापासून तें एकप्रकारें अभ्यासच करीत असतें. परंतु आपल्या स्वतःच्या पद्धतीनें, स्वतःच्या डोळ्यांच्या, कानांच्या व स्नायूंच्या सहाय्यानें तें यासंबंधीं प्रयोग करीत याचा अभ्यास करीत असतें. जेवणाच्या टेबला-जवळील खुर्च्यांची तें आगगाडी करतें व स्वतः इंजिनिअर बनतें; अगदीं एकाद्या मोठ्या माणसाप्रमाणेंच तें हें सर्व करीत असतें. तें सिग्नल व वळणें पाहातें. तोंडानें शिटी फुंकतें, घंटा वाजवितें, पाण्यासाठीं आपली गाडी थांबवितें, कोळसा तथा उतारू घेण्यासाठीं थांबतें. तें स्वतःच आगगाडी असतें तसेंच आगगाडी चालविणाराही तेंच असतें, गाडीची शिटी गाडीं-तून बाहेर पडणारी वाफ आणि घंटा म्हणजे तें बालकच असतें; आणि आगगाडीसंबंधीं त्याला जें ज्ञान—जी माहिती असते त्या माहितीला अनुसरून त्या प्रमाणांत त्याचा हा खेळ वा त्याच्या कृती या सहीसही व वास्तवपूर्ण असतात. बालकाला जर आगगाडीसंबंधीची माहिती केवळ सांगितलेली व आगगाडीचीं चित्रेंच दाखविलेलीं असतील तर त्याला हे सर्व आवाज व हालचाली करतां येणार नाहींत. परंतु तेंच एकादें बालक आगगाडींतून बसून गेलेलें असेल, गाडी स्टेशनांत येतांना पाहिलेली असेल, व इंजिनिअर आपल्या डब्यांतून बाहेर वांकून पाहतांना त्यानें पाहिलेला असेल तर आपल्या खेळांत तें बालक स्वतः चालविण्यासाठीं लुटुपुटुची आगगाडी निर्माण करील. त्याच्या खेळांत त्याची भूमिका केवळ बघ्याची असणार नाहीं, तर मोठ्या माणसांच्या क्रियाशील जगताचा एक भाग तें बालक असेल. मोठेपणीं या जगाच्या व्यवहारांत भाग घेण्याचा तें एव्हां-पासून सराव करीत असतें. तें आपलें शिक्षण घेत असतें.

बालकांच्या बाबतींत तसेंच त्यांना मोकळेपणानें वागूं दिल्यास तीं जें करूं शकतील त्या संबंधीच्या विश्वासानें मी माझ्या या प्रयत्नात्मक शाळे-साठीं बालकें हुडकण्याकरितां 'हार्टले हाऊस'च्या शेजारींच असलेल्या

ठिकाणीं गेलें. सुमारें पांच वर्षे वयाचीं अर्धो डझन बालकें मिळविण्याला मला फारसे प्रयास पडले नाहींत.

'हॉर्टले हाऊस'मधील माझ्या या शाळेंत खेळण्यासाठीं येण्यास मी या नियुक्त सहा बालविद्यार्थ्यांना बोलाविलें आणि तीं पहिल्याच सोमवारीं सकाळीं माझ्या शाळेंत आलीं, त्या वेळीं मी तयारच होतें. माझ्या या शाळेंत ठोकळे व खेळणीं ठेवलेलीं होतीं, तेथें रंगी बेरंगी खडू होते, कागद होते आणि शाडू होता. ही सर्व सामुग्री मी जमिनीवर अशा तऱ्हेनें काळजीपूर्वक पसरून ठेवली होती, कीं आलेल्या बालकांनीं न विचारतांच हवी ती वस्तु उचलावी.

आरंभीं त्यांनीं चालविलेली वस्तूंची उडवाउडव व झोंबाझोंबी पहात, गप्प बसणें मला भाग पडलें. मी अत्यंत उत्कंठ झालें होतें–मार्जोरीनें तोंडांत बोट घालावें, रडावें; चांगल्या खडूंच्या पेटीसाठीं ॲलिस व जोसेफ यांत भांडण लागावें या उत्सुकतेंत मी निमग्न असल्यानें, तिकडे मिचेल काय करीत होता याकडे प्रथमतः माझें लक्षच गेलें नाहीं, मात्र त्यानें आपल्या खेळाला स्वतःच्या मनःप्रमाणें ठाकठीक सुरवात केल्यावर माझें लक्ष तिकडे वेधलें.

मिचेलनें ठोकळे घेतले होते. माझें त्याच्याकडे लक्ष गेलें त्या वेळीं तो त्या ठोकळ्यांच्या सहाय्यानें शहराच्या रस्त्याची प्रतिकृति बनवीत होता. आपल्या प्रयोगशाळेंत एकाद्या प्रयोगांत निमग्न झालेल्या विज्ञान-शास्त्रज्ञासारखा तो आपल्या त्या कार्यांत गढून गेला होता. आणि त्याच्या बौद्धिक पातळीनुसार तो एकाद्या वैज्ञानिकासारखाच होता. तो केवळ कशीतरी ठोकळ्यांची रचना करीत नव्हता; केवळ ठोकळ्यांचें काय बनवावें या देखील विचारांत नव्हता; तर ठोकळ्यांचें सहाय्य घेऊन तो आपल्या बुद्धिसामर्थ्याचा उपयोग करीत होता, वस्तुभांडार व माल पोहोंचविण्याची गाडी, तसेंच नदीवरील धक्क्यावर कोळशानें भरलेली गाडी व भरलेला माल घरीं पोहोंचविणें यांतील कार्यपद्धतीच्या संबंधाचे तो तर्क बांधीत होता. तो विचार करण्यास शिकत होता.

इतक्यांत मिचेलनें तयार केलेल्या रस्त्यावर जोसेफ घर बांधू लागला.

जो जोसेफ एकदां खड्डूच्या पेटीवरून ॲलिसबरोबर भांडला होता त्यानेंच मिचेलला त्याची कोळशाची गाडी हांकण्यासाठीं आपल्याजवळील लांकडी मनुष्य स्वेच्छेनें दिला; कांहीं वेळानें ते दोघे मिळून 'फायर हाऊस' बांधण्याची योजना आखूं लागले. मार्जोरीनें आपलें रडें थांबविलें व एक खेळणें घेऊन ती खेळूं लागली. शाळेच्या जमिनींवर अनेक ठिकाणीं अनेक प्रकारच्या रचना होऊं लागल्या. भांडणें झडलीं अन् तशींच विरूनही गेलीं, त्यासाठीं क्वचितच मध्यस्थीची आवश्कता भासली.

माहितीच्या अभावीं कार्यव्यग्र मनांना मंदपणा आला व कार्य थांबलें. त्या वेळीं कार्याला पुन्हां नव्या जोमानें आरंभ करण्याचे मार्ग आम्हांपाशीं होतेच. आम्ही अशा वेळीं एकत्र बसत असूं व तत्संबंधीं चर्चा करीत असूं आणि त्या बालकांच्या स्मरणशक्तीच्या भांडारांतून अधिकाधिक कल्पना व वस्तुवस्तूंतील संबंध बाहेर पडूं लागत. अथवा आम्ही रस्त्यावर येऊन आमच्या आंवतींभोंवतीं असलेल्या मनोरंजक दैनंदिन जीवनासंबंधीं आमचे शोध लावीत असूं.

केवळ तात्त्विक विवेचन व प्रत्यक्ष व्यवहार यांचा मेळ कसा बसेल हें पहाण्यांत मी गढून गेलें. त्यांचा खेळ हेंच त्यांचें शिक्षण होतें, हें माझें मत अगदीं खरें असल्याचें मला आढळून आलें. हें स्वेच्छेचें, सहजस्फूर्त व अविरतपणें चालणारें त्यांचें खेळण्याचें कार्य दुर्लक्ष करण्याइतकें कमी मोलाचें नव्हतें. तीं शाळेंत असोत वा घरीं असोत; त्या ठिकाणीं बालकांना अशा प्रकारचे खेळ खेळतां येणें शक्य आहे.

अन्य मूलभूत सत्यांचा उलगडा झाला. परानुभूत (Secondhand) ज्ञानाचा बालकांना अति स्वल्प उपयोग होतो, किंबहुना अगदींच होत नाहीं. शब्दांनीं उमज पडणें हें पांच वर्षें वयाच्या बालकाच्या बाबतींत अकालींच होय; अशा बालकाचीं ज्ञानार्जनाचीं साधनें,–ज्यायोगें त्याला योग्यरीत्या ज्ञानार्जन होऊं शकतें–तीं,–म्हणजे त्याची संवेदनक्षमता व अक्कल होत. माझ्या या सहा छोट्या शिक्षकांनीं मला असें दाखवून दिलें कीं, त्यांना ज्या गोष्टींची माहिती होणें आवश्यक होतें त्या गोष्टींसंबंधीं

माहिती वाचून दाखविण्याऐवजीं मीं ज्या पद्धतीनें ती त्यांना समजावून दिली ती पद्धतच अधिक श्रेयस्कर व उपयुक्त होती व त्यायोगेंच मी अधिक यशस्वी होऊं शकलें. स्वानुभूत ज्ञानासाठीं प्रवास करणें हा या कार्याचा महत्त्वाचा भाग ठरला. एकाद्या मोठ्या वैज्ञानिकाच्या स्थल-प्रवासासारखेंच आमचे हे प्रवास ठरले. सात वर्षें वयाच्या बालकांच्या गटांत प्रश्न निर्माण होतो कीं, कचरा ( Garbage ) वाहू गाडी कचरा कोठें घेऊन जाते ? याला उत्तर म्हणजे आरोग्य–खात्याच्या साफसफाई–यंत्रास ( disposal plant ) भेट देणें हेंच होय.

जसें मला येणाऱ्या अनुभूतीनें बालकांचें तें काम होणार नाहीं तसेंच त्यांना आवश्यक असलेल्या सामाजिक परिस्थितीची आवश्यकता माझ्या त्याच आवश्यकतेच्या पूर्तीनें होणार नाहीं हें मीं ताडलें. माझ्या या सहा बाल–शिक्षकांनीं मला दाखवून दिलें कीं, मोठ्या माणसांची लुडबुड अगदीं कमी असेल अथवा अजिबातच नसेल तर बालकें परस्परांसमवेत जलदीनें व परिणामकारकरीत्या एकोपा निर्माण करूं शकतात व एकोप्यानें काम करतात.

अन्य शाळांतून आणि बहुतेक घरांत शिस्त असली तरी माझ्या शाळेंतील या विद्यार्थ्यांवर मी शिस्त लादलेली नव्हती. हीं बालकें खरो-खरच स्वतंत्र होतीं; एकमेकांशीं मारामारी करण्याला देखील त्यांना तेथें स्वतंत्रता होती; मात्र कांहीं नुकसान होऊं नये याची मी खबरदारी घेत असें. मी शोधून काढलें कीं, ज्या वेळीं आपल्या मार्गानें आपल्याला पाहिजे असलेले ठोकळे तर मिळत नाहींत उलट मारामारी निर्माण होत आहे असें समजून येतांच जोसेफनें दुसऱ्याच्या हातून ठोकळे हिसकावून घेण्याचें थांबविलें. मार्जोरीला पाहिजे असलेल्या वस्तूंसाठीं तिनें प्रथम रड-ण्याला सुरवात केली असली तरी, रडण्यानें त्या वस्तू आपल्याला मिळत नाहींत असें कळून येतांच तिनें रडें थांबविलें व त्या वस्तूंपाशीं जाऊन त्या प्राप्त करून घेतल्या.

जॉननें माझ्यापुढें कोणत्याही प्रकारची समस्या निर्माण न केल्यानेंच

तो स्वत: एक समस्या होऊन राहिला होता. तो एकलकोंड्यासारखा वागत असे व एकलकोंडेपणानें राहाणेंच त्याला अत्यंत आवडत असे.

जॉनच्या बाबतींत माझ्यापुढें कांहींच अडचण निर्माण होत नसे; परंतु हीच एक मोठी अवघड समस्या होती. तो अगदीं एकलकोंड्यासारखा वागत असे व एकलकोंडेपणाच त्याला आवडत असे. तो इतर बालकांच्या घोळक्यांत अगदीं मोठ्या काळजीपूर्वकपणें मिसळत असे, तो इतर बालकांशीं अथवा माझ्याशीं देखील बोलत नसे. आपल्या कामांत तो अगदीं एकसारखा मग्न असे व तीं तो चांगल्या प्रकारें करी. परंतु अशा प्रकारची वृत्ति ही बालकांच्या बाबतींत अस्वाभाविकच होय; बालकें एकलकोंड्या स्वभावाचीं नसतात.

माझी शाळा व्यवस्थित रीत्या सुरू झाल्यानंतर जॉनसारख्या बालकांना आटोक्यांत आणण्याचे मार्ग मी शोधून काढीन व त्यांचे अनेक प्रश्न तथा बालकांना ग्रासून टाकणारीं असंख्य अनामिक भयें व सखोल मानसिक व्यथा वगैरे प्रश्न सोडविण्यासाठीं मी झटेन. आतां मला निदान येवढें तरी एक समाधन होतें कीं, मी योग्य दिशेनेंच माझ्या कार्याला आरंभ केला होता.

# ४. शाळेचा आरंभ

१९१४ च्या शरद्‌ऋतूमध्यें मीं माझी झाळा उघडली. माझी ही शाळा चौथ्या व बाराव्या रस्त्याच्या कोंपऱ्यावर असलेल्या तीन खोल्यांच्या एका जागेंत होती. पुन्हां या वेळीं मी माझ्या शाळेसाठीं मुलांच्या शोधार्थ शेजारच्या रहिवाश्यांकडे गेलें.

प्रथम मला एमिली नांवाची एक बालिका मिळाली. ती माझ्या शाळेची जागा असलेल्या बंगल्याच्या पहारेकऱ्याची मुलगी. त्यानंतर अल्बर्ट आला. त्याचा बाप हा इटालियन असून एका हॉटेलांत 'वेटर' होता व त्याची आई अल्साटीअन असून तिचा चेहरा रुंद व लीन अशा शेतकरी थाटाचा होता. माझ्या एका नर्स मैत्रिणीनें कॅटी ही एका सुताराची मुलगी शाळेंत आणली. जॉयचा बाप एक आयरिश फायरमन होता. डग्लस व जॉन हीं पांच वर्षें वयाचीं बालकें अमेरिकन कुटुंबांतील होतीं. त्यांचे बाप कारकुनी पेशाचे होते.

ह्या सहा बालकांसमवेत मी बहुतेक वेळ जवळच्या गोदींत घालवीत असें. मनाला मोहून टाकणाऱ्या तेथील अखंड रहदारीनें त्यांच्या ओंठावर अनेक प्रश्न येऊन थडकले. परंतु तेथील बोटीवाल्यांना वा धक्क्यावर काम करणाऱ्यांना ते विचारून त्यांचीं उत्तरें मिळविण्याला त्यांना प्रथम भीड वाटत असे. परंतु त्यांच्या प्रश्नांना उत्तरें मिळवून देण्यासाठीं मी कांहीं पुढें सरसावत नाहीं असें पाहतांच तीं स्वतः पुढें सरसावलीं अन् आपले प्रश्न तेथें काम करणाऱ्यांना विचारूं लागलीं आणि त्या लोकांनींही मोठ्या

प्रेमळ भावानें त्यांच्या प्रश्नांना उत्तरें दिलीं. येथें आलेलीं बालकें हीं माझ्या शाळेंतील आहेत हें मात्र मीं त्या लोकांना समजावून सांगितलें. हीच काय ती मदत या बाबतींत मीं केली आणि ही गोष्ट समजतांच त्या लोकांनाही आपण बालकांच्या शिक्षणाला कांहीं तरी मदत करीत आहोंत याची जाणीव होऊन त्यांनीं प्रश्नांचें स्वागत केलें. त्यांनीं बालकांच्या प्रश्नांना मोठया उत्सुकतेनें व काळजीनें उत्तरें दिलीं. कधीं कधीं गोदींत परत आलेल्या गाडीच्या पाठीमागील बाजूस बसून आम्ही नौकांची ये जा पहात बसत असूं. शहरांत माल नेण्यासाठीं आलेल्या गाडींत सर्व प्रकारच्या जिनसा भरीत असलेल्या आम्हीं पाहिल्या व या जिनसा कोठें नेण्यांत येत आहेत असें ड्रायव्हरला विचारलें.

परंतु केवळ माहिती संकलित करणें हें आमचें काम नव्हतें. थोडी फार माहिती मिळवायची व तें ज्ञान दुसऱ्यांना सांगावयाचें व स्वतःच्या कामीं त्याचा उपयोग करावयाचा. ही विचार करण्यास शिकण्याची सुरवात होय. आणि म्हणूनच ज्या ज्या वेळीं आमच्या या सहलींमध्यें आम्हांला कांहीं नवीन गोष्टींचें ज्ञान मिळालें कीं लगेच आम्हीं तें ज्ञान व्यवहारांत वापरण्यासाठीं आमच्या शाळेंत परत येत असूं. येथें आम्हीं विचार करण्यास शिकण्याचे पाठ शाळेच्या जामिनीवर खेळण्यांच्या व ठोकळयांच्या सहाय्यानें गिरवूं लागलों. येथें बालकें आपण मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करू लागत. कांहीं जण प्रश्न विचारीत. परंतु बहुतेक जण आपल्या डोळ्यांच्या व कानांच्या सहाय्यानें काम करूं लागत.

सुरवातीला नौकेसाठीं नियताकार ठोकळयानें काम भागत असे. परंतु पुढें पुढें बालकांना तें पसंत पडेना व तीं आपल्या टेबलापाशीं जाऊन उपकरणांच्या सहाय्यानें त्या ठोकळ्यांना नौकेसारखीं टोकें तासूं लागलीं. आणि अशा प्रकारें ज्या वेळीं गरज भासेल त्या वेळीं तीं उपकरणें वापरण्याचें शिकूं लागलीं. जर तुम्हीं त्यांना नौकेच्या आकारसादृश्यांत काय मोठें वैशिष्ट्य आहे असें विचारलें असतें, तर तीं शब्दांत तें सांगूं शकलीं नसतीं. परंतु आपल्या टेबलापाशीं जाऊन त्यांनीं तत्सदृश आकार तयार करून जें त्यांना शब्दांत व्यक्त करतां येणें शक्य नव्हतें तें व्यक्त केलें असतें.

जसजशी बालकांची कल्पनाशक्ति वाढूं लागली तसतशा त्यांच्या मागण्या वाढूं लागल्या. हातोडे व खिळे, करवती व खुरपण्या सतंत वेळ कामांत गुंतून जाऊं लागल्या. गाड्या व इतर खेळणीं त्यांच्या हातून घडूं लागलीं. त्यांनीं बनविलेल्या खेळण्याला नेहमींच तुम्ही कदाचित ओळखूं शकलां नसतां. लहानगी नाव व गाडी यांतील फरक त्यांत तितक्या प्रमाणांत पाहूं शकलां नसतां. परंतु बालक तें समजूं शकतें, कारण त्यांपैकीं एक वस्तू तें कल्पित नदीमध्यें ढकलून देतें व दुसरें कल्पित रस्त्यावरून ढकलतें. तुमच्या मनांत निर्माण झालेला गोंधळ तुमचाच असतो. आपण काय करीत आहोंत तें बालकांना समजतें.

आमच्या सहलींना आम्ही प्रारंभ करतांच सुरवातीला कांहीं बालकांकडून अनेक प्रकारें प्रश्न विचारण्यांत येऊं लागले. परंतु जेव्हां त्यांचे प्रश्न त्यांच्यावर उलटविण्यांत आले—'नावेला असलेल्या या दोन वाटोळ्या टोकांचें कारण तुम्हांला काय वाटतें?' त्या वेळीं तीं कांहीं वेळ गप्प बसलीं. पुन्हां ज्या वेळीं प्रश्न विचारण्यांत आले त्या वेळीं ते भिन्नप्रकारचे होते. केवळ लक्ष वेधण्यासाठीं ते विचारण्यांत आले नव्हते अथवा संभाषण करावयाचें म्हणूनही विचारलेले नव्हते किंवा माहितीव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणांसाठीं नव्हते; ते अगदीं मनापासूनचे होते व उपयुक्त होते. प्रश्नांचें स्वरूप आतां ते कशाप्रकारचे असले पाहिजेत असें झालें, स्वतःच्या प्रश्नांना स्वतःच उत्तर शोधून काढण्याच्या बालकांच्या प्रयत्नांतील ही पहिली पायरी होती.

दुसऱ्या वर्षी आमच्या शाळेंत सहा वर्षांच्या मुलांचा गट आम्हीं निर्माण केला. परंतु आमच्या अपेक्षेइतकीं बालकें मिळालीं नाहींत. पालकांना आपलीं बालकें सहा वर्षांचीं होईतों त्यांना खेळण्याच्या शाळेंत पाठविणें ही गोष्ट वेगळी होती व त्यांना सार्वजनिक शाळेंत न पाठवितां आमच्या या शाळेंत पाठविणें ही गोष्ट वेगळी. आमच्या शाळेंत आल्यानंतर कदाचित् पुढें तीं सार्वजनिक शाळेंत जाण्यास तयार होणार नाहींत अशी भीति पालकांना वाटत असे, आणि ती फारशी चुकीची नव्हती. बालकांची तयारी होईतों त्यांच्यावर लिहिणें, वाचणें व गणित करणें यांची सक्ती करणें आम्हांला पसंत नव्हतें—आमचा तसा उद्देश नव्हता.

परंतु कलाकार व लेखक या दुसऱ्या वर्षीं आमच्या शाळेकडे फिरकूं लागले व आम्हीं शाळेच्या विकासाच्या वेळेपर्यंत त्यांच्यावर निर्भरित होतों. लेखक व कलाकार या संधीचा फायदा घेण्यास अधिक राजी होते.

सहा वर्षें वयाच्या बालकांच्या या नवीन तुकडीसाठीं आम्हीं आम्हां-पाशीं असलेलीच सामुग्री दिली. फक्त चकचकणारे व आकर्षक असे रंग भरीला घातले. परंतु जरी सामुग्री तीच असली तरी बालकांनीं ती वापरतांना तिचें अगदीं पूर्णपणें रूप बदलून टाकलें.

प्रयत्नपूर्वक योजनाकौशल्य व परस्परांच्या कल्पनांचा अंगिकार यांच्या-योगें ठोकळ्यांचा खेळ हा एक सहकारी पद्धतीच्या कार्यासारखा ठरला. या सर्वांना मान्य असलेल्या योजना इतक्या महत्त्वाकांक्षेनें चालत असत कीं अधून मधून तीं सर्व बालकें स्वेच्छेनें आपापलें काम थांबवून आपल्या योजनांसंबंधीं चर्चा करूं लागत. अल्पावधींतच या सामायिक कार्याला सुरवात करण्यापूर्वीं दररोज प्रथमतः सर्वांनीं एकत्र जमून परस्परांच्या कल्पना ऐकून घेऊन त्यांच्यावर चर्चा करण्यासाठीं नियमितपणें बैठक भरूं लागली.

समूहापासून आपलें भिन्न मत प्रतिपादन करण्याचा व्यक्तींचा हक्क हा मोठ्या माणसांचा सुसंस्कृत समाज–जीवनाचा एक भाग असल्यानें या बालकांच्या सामूहिक योजनेंत सामील होण्याची कोणावरही सक्ति कर-ण्यांत येत नसे. परंतु येथील कार्य हाच एक आकर्षक लोहचुंबक होता. थोड्याफार वेळांतच सर्व बालकें त्यांत सामील होत.

मोठ्या माणसांच्या हालचालींची नक्कल करण्याच्या वेळींच बालकांना गणि-ताची आवश्यकता पहिल्यानेंच भासली. तीं प्रामाणिक उत्सुकतेनें वस्तुभांडा-राचा खेळ खेळूं लागलीं. त्यांनीं सर्व टेबलें एकत्र मांडलीं व 'काउंटर' बन-विलें. निरनिराळ्या प्रकारच्या रिकाम्या खोक्यांच्या दुकानांतील शेल्व्ज बनविल्या व त्या रचण्यासाठीं माझी मदत घेऊं लागलीं. आणि खरोखरची खरेदी विक्री करतात तशी कृति करण्याची त्यांची गरज होती. तशीच या व्यवहारासाठीं पैशांची देखील आवश्यकता होती. आम्हीं त्यासाठीं खरो-खरीचे पैसे वापरूं लागलों.

हीं सहा वर्षांचीं बालकें ज्या वेळीं आपल्या या खेळांत नाण्यांच्या मोडी करूं लागलीं त्या वेळीं खरोखरच ती एक आश्चर्यकारक अशी गोष्ट होती. इतक्या शीघ्रतेनें तीं त्यांच्याशीं परिचित झालीं व किती उत्सुकतेनें त्यांनीं नाणीं हाताळण्याची जबाबदारी अंगिकारिली! आमचा खेळ संपल्यानंतर आम्हीं नाणीं मोजून एकादें हरवलें तर नाहीं ना याची खात्री करून घेऊं लागलों, त्या वेळीं प्रत्येकजण एका डॉलरच्या किंमतीचीं नाणीं बाजूला काढण्यासाठीं अनेक प्रकारें प्रयत्न करीत होता.

पावसाळ्याच्या दिवसांत बालकें कुटुंबपद्धतीचा खेळ खेळत असत, मोठीं बालकें आई बाप होत, लहान बालकें त्यांचीं मुलें होत. कौटुंबिक जीवन, बापाचें काम, आईचें बाजारांत जाणें, आदि सर्व हुबेहुब चालत असे.

स्वच्छ व निरभ्र दिवसांत मात्र त्यांच्यापुढें प्रश्न निर्माण होत असत. या दिवसांत बालकें सबंध दिवसभर आमच्या या शाळेंत असत. त्यामुळें आम्हीं आठवड्यांतून एकदां व दोनदां ज्या सहली काढीत असूं त्यांपेक्षां अधिक सहलींची त्यांना आवश्यकता भासे. आम्हीं आमच्या शाळेच्या आवारांत एक घसरगुंडी व एक आडवी शिडी बसविली होती. बालकांनीं या गोष्टींचा आपल्यासाठीं कसा उपयोग करून घेतला तें पहाणें अत्यंत मनोरंजक होतें त्यांनीं त्यांचा व्यायामासाठीं उपयोग तर केलाच परंतु आपल्या दैनंदिन जीवनाच्या नाटकासाठीं देखील त्यांचा उपयोग केला. त्या आडव्या शिडीचा त्यांनीं शिडीप्रमाणें उपयोग करण्याऐवजीं अधिकतया गाड्यांच्या रांगेसारखा उपयोग केला. कधीं कधीं बसच्या वरच्या भागाप्रमाणें तिचा वापर करीत तर कधीं हवेंतून उडत जाणाऱ्या विमानासारखा उपयोग करीत.

आश्चर्याची गोष्ट ही कीं आम्हीं आमच्या या सफळतापूर्ण कार्यामध्यें गढून गेलों असतां आमच्या व्यतिरिक्त दुसरेही आणखी कांहीं डोळे आमच्या कार्याकडे लागले होते. इव्हेलीन डेवे या एकदां आमच्या शाळेला भेट देण्यासाठीं आल्या. त्यांचे वडील जॉन डेवे हे लिहीत असलेल्या एका ग्रंथाच्या त्या सहकारी लेखिका होत्या व त्या आपल्या या ग्रंथासाठीं मजकूर गोळा करीत होत्या. हा ग्रंथ कालांतरानें ' उद्यांच्या शाळा ' या नांवानें प्रसिद्ध झाला.

त्यानंतर सार्वजनिक शिक्षणसंस्थेतर्फे सार्वजनिक शाळांची पहाणी करण्यासाठीं नेमलेले एक शिक्षक हेरिएट जॉन्सन यांनीं ल्युसी स्प्रेग मिचेल यांना आपल्याबरोबर पहाणी करण्यासाठीं आमच्या शाळेंत आणलें. आमच्या शाळेच्या उपक्रमावर खूष होऊन सौ. मिचेल यांनीं आम्हांस आर्थिक सहाय्य देऊं केलें. मॅकडुगल ॲलीमधील एक गॅरेजवजा घरें त्यांनीं आम्हांला शाळेसाठीं दिलें व सर्वांत उत्तम गोष्ट म्हणजे त्या स्वतः शिक्षक म्हणून आमच्या सेवेंत सादर झाल्या.

---

## ५. नवी शाळा, नवे शिक्षक

कित्येक दिवसांपासून माझ्या मनांत कलांचें शिक्षण सुरू करावयाचें होतें व विशेषत: म्हणजे संगीतकला व बालकांना इतर क्षेत्रांत जशा स्वत: प्रयोग करण्याच्या स्वेच्छेवर आधारलेल्या संधी देत असूं तशा प्रकारच्या संधी देऊन संगीताचें शिक्षण देणाऱ्या एकाद्या संगीत शास्त्रज्ञाचा शोध मीं कांहीं दिवसापूर्वीच चालविला होता. हॅरिट हॅबेल या एकदां आमच्या शाळेला भेट देण्यासाठीं आल्या आणि संगीतकलेसंबंधीं आमच्या या नव्या पावलाची जबाबदारी अंगावर घेऊन ती त्यांनीं अनेक वर्षेंपर्यंत चालविली. जेथें तीन वर्षें वयाचीं बालकें खेळत असत त्या खोलींत त्या जायच्या. आपल्याबरोबर त्यांनीं निरनिराळ्या स्वरांच्या पट्ट्या अथवा निरनिराळ्या स्वरांत लावलेल्या घंटा आणलेल्या असत. त्या त्या टेबलावर स्वरांच्या अनुक्रमानें मांडीत व त्या वाजवून निरानिराळ्या स्वरांचा झंकार उठवीत. तो ध्वनी ऐकून प्रथम एक बालक तेथें येई, त्या मागून दुसरें असें करून बहुतेक सर्व बालकें ती गंमत ऐकण्यासाठीं व पहाण्यासाठीं तेथें येत व आपणांला वाजवूं देण्याची मागणी करीत. अल्पावधींतच सर्व बालकें हॅबेल बाईच्या भोंवतीं जमा होत व आपापल्यापरी घंटा वाजवून भिन्न भिन्न प्रकारचे झंकार उठवीत व त्या आवाजांशीं आपले आवाज जुळवून घेत. इतकें झाल्यानंतर पियानोच्या साथीवर गाणें सुरू झालें. मोठीं बालकें जशीं स्वत: गोष्टी रचून सांगण्यांत तत्पर होतीं तितक्याच तत्परतेनें त्यांनीं आपली स्वत:चीं गाणीं तयार केलीं. संगीताच्या शिक्षणाचा आरंभ अशा

प्रकारें झाला व दिवसानुदिवस या अभ्यासाच्या वाढीबरोबरच बालकांचीही त्यांत प्रगति होऊं लागली; आमच्या शाळेच्या अभ्यासक्रमांत अल्पावधींतच संगीत हा एक वैशिष्ट्यपूर्ण विषय ठरला. हीं गाणीं सामुदायिकरीत्या व्हायचीं व त्यांना साथ देण्यासाठीं केवळ एकच नव्हे तर लहान व मोठ्या बालकांचे असे दोन वेगवेगळे वाद्य–वृंद ( Orchestras ) निर्माण झाले.

विल्यम झोरॅच हा आमचा पहिला कला–शिक्षक. तो एक होतकरू तरुण कलावंत होता. त्यानें आपल्या या कामांत फारच कष्ट घेतले व मला तो अत्यंत आवडे. कारण त्यानें बालकांना आरंभीं एकदम शिकविण्यास नाकारलें म्हणूनच होय. उत्तेजन व स्फूर्ति या गोष्टी तो प्रथम बालकांमध्यें निर्माण करीत असे. वयोमानाप्रमाणें बालकांत कलेच्या शिक्षणाचा परिपोष होऊं लागला. झाडूचे निरनिराळे आकार बनविण्यांतील आरंभीची निर्हेतुकता नाहींशी होऊन सहेतुक आकार व नमुने तयार होऊं लागले. चित्रकला व रंगसंगती यांतील निर्हेतुकताही कालांतरानें नष्ट झाली व आतां उद्देशपूर्ण चित्रें व तदनुरूप रंगसंगती सुरू झाली. कित्येक प्रसंगीं पांच वर्षांच्या वयाच्या तसेंच चार वर्षांच्या बालकांकडूनही अशीं हेतुपूर्ण चित्रें काढलीं जाऊं लागलीं. वास्तवतापूर्ण चित्रें तथा केवळ काल्पनिक नमुने काढले जाऊं लागले व त्या दोन्हीं प्रकारच्या चित्रांतील सूक्ष्म फरकही बालकांना आतां पूर्ण परिचयाचा झाला. बालकांना आपल्या मनाप्रमाणें निरनिराळे आकार वा नमुने तयार करतां यावेत म्हणून चित्रविचित्र आकाराचे सुटे तुकडे त्यांना देण्यांत येतांच त्यांनीं ते जमिनीवर पसरून त्यांची निरनिराळ्या आकारांत जुळणी करण्यास सुरवात केली. अशा प्रकारें तयार केलेल्या चित्राकारांत वा नमुन्यांत सहेतुकता आढळून येई. ते अर्थपूर्ण व सुडौल असत. या वेळीं शिक्षकाचें काम म्हणजे त्या चित्राकृतींतील उणीव भरून काढण्यासाठीं मार्गदर्शन करणें हेंच होतें. अथवा ‘ ही गाडी कोठें जातें आहे ? ’ अशा प्रकारचा सूचक प्रश्न विचारणें असेंच होतें. या प्रश्नानंतर लगेच एकादें घर अथवा तबेला ( garage ) तयार केला जात असे; किंवा “ गाडी रस्त्यावरून जातांना काय आढळलें ? ” अशा प्रश्नानंतर एखाद्या झाडाची

आकृति तयार केली जात असे. सहा वर्षांच्या वयाचीं बालकें देखील आपली स्वतःची चित्राकृति आणि दुसऱ्यांची चित्राकृति नीट पाहून त्यावर टीका करतांना पाहणें ही खरोखरच समाधानकारक गोष्ट होती. शिक्षकांनीं सांगण्यापूर्वींच तीं स्वतःच एकाद्या कला–कृतीकडे आकार, समतोलपणा, सुडौलता यांच्या दृष्टीनें पहाण्यास शिकलीं. " ही बाजू सुनी सुनी वाटते व ती बाजू भरगच्च दिसते, जणूं काय सर्व कांहीं एकाच ठिकाणीं भरून टाकलें आहे " अथवा " या गाडीच्या मानानें हा मनुष्य फार अवाढव्य वाटतो " किंवा " ही होडकी मूर्खासारखी वाटते–ती लाटांच्या पृष्ठ–भागावर हळूच ठेवल्याप्रमाणें वाटते. खरोखरीची होडकी अशी नसते. " वगैरेसारख्या टीका तीं करूं लागलीं होतीं.

निरनिराळ्या वयाचीं बालकें शाळेंत अधिकाधिक येऊं लागल्यानें मला त्यांच्यासाठीं शिक्षक शोधावे लागले. मला पाहिजे होते, तशा प्रकारचे शिक्षक त्या वेळीं कोठेंच सांपडेनात. मला आवश्यक असलेल्या या मौल्य-वान सामुग्रीचा पुरवठा कोणत्याही ट्रेनिंग स्कूलकडून होऊं शकला नाहीं. आमच्या या शाळेसारखी शाळा–कीं, जिच्यामध्यें शिक्षकाला तिच्या मार्ग-दर्शनासाठीं एक मूलभूत असें तत्त्वज्ञान अंगिकारावें लागतें. परंतु जिच्या-मध्यें ठराविक असा कोणताही अभ्यासक्रम नसतो, इतकेंच नव्हे तर विशिष्ट कालवधीनंतर विद्यार्थ्यांनीं संपादन करावयाच्या यशाचें ठराविक असें कोणतेंही प्रमाण नव्हतें, जिच्यामध्यें वास्तविक प्रत्येक बालकाकडूनच व्यक्तिशः आपल्या प्रगतीचा मार्ग व गति ठरविली जात असे–अशा प्रकारच्या शाळेचा भर विशेषतः आपल्या वर्गांना उपयुक्तताप्रदान करण्यावर असतो.

अशा शाळेनेंच दिवसानुदिवस किंबहुना क्षण-प्रतिक्षण शिकविण्याच्या पद्धतींत नवीन नवीन अशी भर घालण्याचे निर्णय घेतले पाहिजेत. तिला तिचा विषय जीं बालकें त्यांच्याबरोबर त्यांच्याच अनुषंगानें कार्य करून त्यांच्यासंबंधीं शिकलें पाहिजे. बालकांच्या वैयक्तिक तथा सामूहिक विकासा-बरोबर त्यांच्या बदलत्या आवश्यकतांनुसार तिनें आपला अभ्यासक्रम बनाविला पाहिजे. विशिष्ट परिस्थितींत झटपटीनें कार्य कसें करावें हें तिनें

शिकलें पाहिजे. बाजारहाट करणें, अथवा गुणोत्तराचे तर्क समजून घेणें, बालकांना कोणत्या माहितीची आवश्यकता आहे व ती कशी आणि केव्हां त्यांना दिली पाहिजे वगैरेसारख्या आपल्या कल्पनांचा क्रम बालकें अल्पावधींत आपलें शिक्षण घेण्यास उद्युक्त असतां कोठपर्यंत त्यांच्यावर लादावा यासंबंधीच्या प्रश्नांचा तिनेंच विचार करावयाचा असतो.

आणि एकाद्या भित्र्या बालकाला आपल्या हक्कांसाठीं झगडण्यास केव्हां उत्तेजन द्यावें, बेसुमार आक्रमक वर्तणुकीच्या मुळाशीं असलेल्या सुरक्षितपणाच्या अभावाला कसें तोंड द्यावें, बालकाला आईच्या मायेची पाखर केव्हां द्यावी व कोणत्या वेळीं त्याच्याकडे परिणामीं हितकर ठरणारें दुर्लक्ष करावें व केव्हां पुढें सरसावून बालकांच्या अंगावरील जबाबदारी स्वतः अंगिकारावी, यांसारखे व अन्य भावनावेगाचे व वर्तणुकीचे बालकांचे सखोल प्रश्न तिलाच सोडवावे लागतात.

वर्गात अशा प्रकारची उत्पादक अभिजात वृत्ति व विकासपूर्वक ज्ञान आणणारे शिक्षक हेच आमच्या कार्याचे जीवनदायी प्रमुख घटक होते. त्याशिवाय आमच्या कार्याचा जम बसणें शक्य नव्हतें.

अनेक ठिकाणांहून आमच्या शाळेसाठीं शिक्षक आले होते व अशा शिक्षकांच्या तपासांत मी सर्वत्र हिंडत असें. आमच्या शाळेसाठीं आलेल्या शिक्षकांपैकीं कांहींना आमच्या कार्याची पूर्ण जाणीव झालेली होती. परंतु त्यांना शिकविण्याचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता. दुसरे कांहीं जण अनुभवी शिक्षक होते परंतु त्यांना शिकविण्याच्या कामाची जी एक संवय झालेली होती ती विसरणें अवघड जात असल्यानें त्यांचा नाइलाज झाला होता. पूर्वानुभवाचा यश अथवा अपयश यांच्याशीं फारसा संबंध नव्हता असें मला आढळून आलें.

आमच्या तत्त्वांत अन् त्यांच्या व्यवहार्यतेबाबत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं व तत्संबंधीची चर्चा करण्यासाठीं, आमच्या शाळेंतील सर्व शिक्षकांची आठवड्यांतून एकदां बैठक होत असे. आमच्या शाळेचा अभ्यासक्रम बालकांना निरनिराळे अनुभव मिळवून देण्यावर आधारलेला असावा असें माझें मत होतें; आणि हें माझें विधान किती साधें सोपें होतें—

साक्षात्कारी तर तें अगदींच साधें परंतु तरी देखील 'अनुभव' या शब्दाच्या अर्थासंबंधीं कांहीं आठवड्यांपर्यंत आमच्यामध्यें जणूं वाग्युद्धच माजून राहिलें होतें 'सहल हा अनुभव आहे का?' 'साहित्य हा अनुभव असूं शकणार नाहीं कां?' 'एकादा अनुभव हा दुसऱ्या एकाद्या अनुभवापेक्षां अधिक मूल्यवान असूं शकेल कां?' असे एक ना अनेक यक्षप्रश्न आमच्यापुढें निर्माण झाले.

मी आमच्या शिक्षणपद्धतींत जो समतोलपणा आणण्याचा प्रयत्न करीत होतें व आम्ही प्रत्यक्षरीत्या जें कार्य करीत होतों त्या कार्याची रूपरेखा आणि अभ्यासक्रम यांचा आराखडा तयार करण्याच्या निश्चयानें मी एके दिवशीं घरीं आलें. मी संदिग्ध अशा प्रकारची अनुभवाची व्याख्या सोडून दिली व आमच्या कार्याचे क्रीडान्तर्भूत अनुभव व कृतिनिष्ठ अनुभव असे दोन स्पष्ट भेद पाडले. पहिल्यांत ठोकळ्यांच्या रचना, नाट्यात्मक खेळ व कला यांचा समावेश केला व दुसऱ्यांत वस्तुभांडाराचें काम, बाजारहाट, पाकशास्त्र, वस्तूंची काळजी आदींचा समावेश केला. हे दोन भाग हा आमच्या अभ्यासक्रमाचा गाभा होता. याला पूरक असे आणखी दोन भाग होते. 'कौशल्य वा तंत्र' आणि 'अनुभवांचा परिपोष' (यालाच आम्हीं पुढें माहिती मिळविणें असें नांव दिलें). पहिल्या भागांत धारणाशक्तीला वळण लावणें, क्रमांक-कार्य, भाषा-कौशल्य, संगीत-तंत्र आदि समाविष्ट होतें व दुसऱ्या भागांत सहली, वादविवाद, पुस्तकांची व गोष्टींची उपयुक्तता तथा अशाच दुसऱ्या माहिती वाढविणाऱ्या गोष्टींचा समावेश केला होता.

बालकें आमच्या या शाळेंतील आपापल्या वर्गांत जें काम करीत तें या उपरिनिर्दिष्ट वेगवेगळ्या मथळ्यांखालीं नमूद करून ठेवण्यास मीं शिक्षकांना सांगितलें आणि आश्चर्य हें कीं, ही योजना अत्यंत यशस्वी ठरली. आपले विचार व योजना या अशा प्रकारें संघटित करण्यास शिक्षक उत्सुक बनले. ते आपल्या कामाची नोंद या मथळ्यांखालीं नमूद करूं लागले व परस्परांशीं त्यांची तुलना करूं लागले.

ज्याप्रमाणें मूर्त अनुभव हा बालकांच्या शिक्षणाचें तत्त्व आहे असा आमचा दृढ विश्वास होता तद्वतच तेंच तत्त्व शिक्षकांच्या शिक्षणाचें देखील असावें असा विश्वास निर्माण होणें साहजिकच होतें. लौकरच आम्ही आमच्या समवेत कार्य करूं इच्छिणाऱ्यांना विद्यार्थी–शिक्षक म्हणून दाखल करून घेऊं लागलों. मी त्यांची निवड शैक्षणिक लायकीपेक्षां भावना व बुद्धि यांची परिपक्वता या मानवी गुणांच्या लायकीवरच करूं लागलें.

या पहिल्या विद्यार्थी–शिक्षकांसाठीं विशिष्ट असा अभ्यासक्रम नव्हता. मी दर आठवड्याला एकदां त्यांची भेट घेत असें व त्या वेळीं त्यांना वर्गांत आलेल्या अनुभवांवर व तदनुषंगिक प्रश्नांवर चर्चा करीत असें. आणि त्यानंतर आमच्यापैकीं दोघे अथवा दोघांपेक्षां जास्तजण एकत्र आले कीं रोज त्यांच्या कल्पनांची व अनुभवांची देवघेव होत असे. परंतु या विद्यार्थी–शिक्षकांच्या बाबतींत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना वर्गांत आलेले अनुभव व त्यांचें बालकांबरोबरचें कार्य हीच होय.

आमच्या शाळेच्या अभ्यासक्रमाच्या ठराविक लिखित नियमांना माझा विरोध हा अंतःस्फूर्त व भावनानिष्ठ होता. बालकें, शिक्षक व मी स्वतः या सर्वांना आमच्या स्वतःच्या कार्याला जर योग्य अवसर मिळाला तर आमची शाळा म्हणजे कोणत्याही लिपिबद्ध नियमांच्या वा अभ्यासक्रमाच्या पलीकडे असणारी गोष्ट निष्पन्न करणारी अशी एकादी विकासशील व जीवंत वस्तू ठरेल असा माझा विश्वास होता. हाच मार्ग चालू ठेवण्याच्या व शैथिल्य, थकवा, अनुत्साह व भीती यांना विरोध करण्याचा मी सतत प्रयत्न करीत असें. शिक्षकांनीं आपली दृष्टी बालकांवर ठेवावी, वेळापत्रक अथवा अभ्यासपत्रकावर नव्हे–ही माझी इच्छा होती. शिक्षकांनीं आपल्या कल्पना साकार कराव्या, बालकांसंबंधीं ते समजूतपूर्ण बनावेत, व बालकांकडून शिकतां शिकतां बालकांसाठीं योजना तयार कराव्यात यासाठीं त्यांना स्वातंत्र्य मिळावें ही माझी सबळ इच्छा होती.

अर्थात् मीं दाखवून दिल्याप्रमाणें आम्हांला आलेल्या विविध अनुभवांचें साधें सोपें स्पष्टीकरण करण्याच्या बाबतींत आम्ही सर्व सहमत झालों.

दैनंदिन योजनांसाठीं व आमचें कार्य नमूद करण्यासाठीं जणूं ती एक मार्ग-दीपिकाच ठरली व हीच काय ती विद्वत्तेचें स्तोम माजविणाऱ्या अशा इतर लिपिबद्ध सामुग्रीसारखी होती. प्रत्येक शिक्षिकेला आपल्या स्वतःच्या वर्गाची शिक्षण-पद्धति आपल्या मनाप्रमाणें ठरविण्याला मोकळीक होती; तसेंच तत्संबंधीं मदतीची आवश्यकता भासल्यास ती जेथें मिळणें शक्य आहे तेथून घेण्याचीही मोकळीक होती. अशा प्रकारच्या अत्यंत सफलतापूर्ण प्रयत्नांसाठीं आम्हांला शक्य त्या गोष्टी करणें आवश्यक झालें.

सहा वर्षें वयाच्या बालकांच्या वर्गांत त्यांच्या शिक्षिकेनें एका कथेचें नाट्यपूर्ण आविष्करण कसें केलें तें त्या वर्गाच्या आरंभीच्या नोंदींतून घेतलेल्या खालील उताऱ्यांवरून कळून येईल. त्यावरून बालकांतील चैतन्य, निरीक्षणशक्ति, एकाच कार्याकडे आकृष्ट होणें व त्यासाठीं आपल्या ज्ञानाचा व योजकतेचा उपयोग करणें या त्या बालकांच्या ठायींच्या गोष्टींचें चित्र पहावयास सांपडेल. विकासपूर्ण जगाच्या कार्यशील जीवनाच्या एका भागाचा तो एक संघटित अनुभवच होय.

" मंगळवार, पावसाचा दिवस होता तो—त्या दिवशीं पांच बालकां-खेरीज बाकी सर्वजण मुदपाकखान्यांत पाक कार्यांत निमग्न होते. आणि या पांच बालकांतील फेथ या एका मुलीनें सुचविल्याप्रमाणें त्यांनीं ' फॉग बोट ' ही कथा नाट्याविष्कारित करण्याचें ठरविलें. प्रत्येक बालकाला एक एक नाव तयार करण्यास सांगून मीं तो खेळ बसविला. मीं त्यांना न्यू यॉर्कचा नकाशा दाखविला व त्यांनीं तत्काल आमच्या वर्गांतील अरुंद भाग हा हडसन नदी म्हणून मुक्रर केला व रुंद भागाचा उपसागर करण्यांत आला."

" सेलिया व रिचार्ड यांनीं जिच्यासंबंधीं ही कथा होती ती महासाग-रांत प्रवास करणारी बोट तयार केली. फेथनें ' पायलट बोट ' बांधली व मेरीनें कोळशाची होडी तयार केली. मेजें व ठोकळे रचनेसाठीं उपयोगांत आणले. या मोठ्या बोटीला गोदींतून बाहेर काढण्यासाठीं उपयोगी पडावी म्हणून एडना ' टग् बोट ' तयार करूं लागली परंतु ती वारंवार मला

मदतीसाठीं बोलावूं लागली व अधिकाधिक उतावळी व नाराज होऊं लागली. तसेंच तिच्यामुळें इतरांना त्रास होऊं लागला. शेवटीं मीं तिला बाहेर नेलें व कचेरींत दहा मिनिटांपर्यंत एकटीच ठेवली. दहा मिनिटांनंतर तिला मीं परत आणलें व एक लहानशी प्रवासी नाव तयार करण्यास लाविलें आणि तिनेंही ती शांतपणें तयार केली. ( बहुधा टग्-बोट कशी करावी हें तिला पुरेसें माहीत नसावें. ) मॅरीचें लक्ष इतर कामांत लागत नसे. परंतु आपल्या कोळसा होडीच्या बांधणींत ती अगदीं गढून गेली होती. आपली चौकोनी आकाराची ही होडी तिनें अल्पावधींतच बांधून तयार केल्यानंतर ती कोळशांसाठीं शाडूचे गोळे तयार करूं लागली. ”

“ आपलें पाक-कार्य आटोपून इतर बालकें ज्या वेळीं खोलींत परत आलीं त्या वेळीं खोली या आमच्या बोटींच्या शिट्यांच्या आवाजांनीं भरून गेलेली होती. तें ऐकून हीं बालकें देखील उत्सुक होऊन या खेळांत रमून गेलीं. मेटा ही एकच बालिका या कथेशीं पुरीशी परिचित नसल्यानें मीं तिला तरंगण्याची पातळी दर्शविणारी घंटा तयार करण्यास सांगितलें. तिनें ठोकळ्यांचा एक उंचसा ढीग तयार केला व सोनियानें तिच्यासाठीं कागदाची एक भली मोठी घंटा तयार केली. तिनें ती एका चापानें एका ठोकळ्याला अडकाविली व ती पुढेंमागें हलवून ‘ डींग् डोंग्, डींग् डोंग्, ’ असा तोंडानें आवाज करूं लागली. मीं बाजूच्या हॉलमधून एक बांक आणलें. उद्देश हा कीं त्याचा या मोठ्या बोटीला ओढणाऱ्या बोटीसारखा उपयोग व्हावा, सोनियानें तें ताडलें व रंगीत लांकडी घनाकार ठोकळ्यांच्या सहाय्यानें तसली एक छानदार बोट बनविली. ”

“ फ्रेडनें ‘ पायलट बोटी ’चा ताबा घेतला, कारण फेथला ती महासागरी-बोट उपसागरांत न्यावयाची होती. ही मोठी बोट जागची हालूं शकत नव्हती. येथेंच काय ती मुख्य अडचण आली; परंतु बालकांनीं ती चालत आहेच असें समजण्याचें ठरविलें. सोनियानें एक दोरी मागून घेतली व त्या दोरीनें तिनें आपल्या या टग्-बोटीला ही मोठी बोट बांधून टाकली. फेथ बोटीवर चढला परंतु लगेच त्याच्या लक्षांत आलें कीं, बोटीला कप्तान नाहीं. रिचार्ड व सेलिया मेजाच्या खालून डोकीं काढून म्हणालीं कीं

आपणांला इंजिन चालवावयाचें आहे व म्हणून कप्तान होण्यास त्यांनीं नकार दिला. तेव्हां मीं फ्लोरेन्सचें मन वळवून ती बांधीत असलेली बोट तशीच ठेवून प्राप्त परिस्थितीला तोंड देण्यास सांगितलें. तिनें आपली बोट तशीच सोडून येण्यापूर्वीं तिला खाडींत नांगरून ठेवलें. खोलींत जळत असलेला दिवा मीं मालवला व त्यामुळें आमच्या या खेळाला वास्तविक स्वरूप आणण्याला मदत झाली. इतकें झाल्यावर खेळाला आरंभ झाला."

"पायलटाच्या अभिनिवेशानें फेथ सूचनेचा भोंगा वाजवूं लागला. भोंगा 'टूट् टूट्, मी आहें' असा आवाज करूं लागला. परंतु रिचार्डनें किंबहुना रडूनच त्याला विरोध केला. तेव्हां आम्ही फेथला एक दोरी दिली. ही दोरी इंजिनच्या खोलीला बांधलेली होती. फेथनें ती ओढतांच रिचार्ड शीट वाजवूं लागला. प्रत्येक बालक आपापल्या नावेच्या शिट्या आपापल्यापरी वाजवूं लागले. या मोठ्या बोटीच्या पायलटानें शेवटीं आपली बोट सोडली व तिच्या शिट्या अधिकाधिक हळूहळू वाजूं लागल्या —जणूं काय ती महासागरांत दिसेनाशी झाली."

---

## ६. मॅक्डुगल अलेंतून स्थलांतर

१९२१ साल उजाडलें, आमच्या शाळेंत आतां तीन ते सात व कांहीं वेळां आठ वर्षांपर्यंतचीं बालकें येऊं लागल्यानें आम्हांला शाळेची जागा अपुरी पडूं लागली. तेव्हां आम्हीं आमची शाळा पश्चिमेकडील बाराव्या रस्त्यावरील सध्यांच्या जागीं हलविली.

गतकालाचा आढावा घेऊन त्यांतून निष्पन्न अशा अनुभवाच्या पायावरच भावी काळासाठीं योजना आंखण्याची हीच वेळ होती. सुरवातीलाच आम्हीं स्वातंत्र्य व आवड ( Interest ) यांच्यामधील नातें ठरवून टाकलें. स्वातंत्र्यासाठीं स्वातंत्र्य याला कांहीं किंमत नाहीं. विघातकतेचें अथवा दुसऱ्यांच्या बाबतींत ढवळाढवळ करण्याचें स्वातंत्र्य हितकारक नव्हतें. जर स्वातंत्र्याचें प्रयोजन कांहीं तरी भरीव असें करण्यासाठीं असेल तरच तें चांगलें होतें; आणि हें जें कांहीं भरीव करावयाचें तें ठरविणें बालकाला जें कांहीं करावयाचें असेल त्यांत तें कितपत रमून जातें यावर अवलंबून होतें. एका समूहांतील एक व्यक्ति असल्यानें बालकाच्या वैयक्तिक आचरणावर एक प्रकारें निर्बंध लादला जातो. शिस्तीसाठीं शिस्त हा आम्हांला एक प्रकारें शाप वाटत असे. परंतु त्याचबरोबर स्वातंत्र्यासाठीं स्वातंत्र्य ही देखील क्वचितच चांगली अशी गोष्ट होती. कार्याचें स्वातंत्र्य व कार्याची शिस्त–वैयक्तिक व सामूहिक दोन्ही बाबतींत–या मूल्यांवरच बालकें प्रगतिशील झालीं व वाढलीं.

आतां बालकांत कामाची संवय निर्माण होत होती. ठोकळ्यांसमवेतचा त्यांचा खेळ हाच याचा पुरावा होता. ठोकळ्यांचा लोहमार्ग बनविणें हा त्यांचा उपक्रम मोठ्या माणसांना एक खेळ वाटत असेल परंतु त्यांना तें कार्य होतें. अशी एकादी वेळ येते कीं जेव्हां हें त्यांचें कार्य त्यांना त्रास-दायक वा कष्टप्रद होतें. उदाहरणार्थ एकादी रचना करतांना ती उभी करण्यासाठीं पुन्हां पुन्हां रचना करावी लागणें. मोठ्या माणसांच्या एकाद्या रचनात्मक योजनेंत असणारी कामाची शिस्त बालकांच्या अशा कामांत खात्रीनेंच उपस्थित असते.

कामांतील दुसरी त्रासदायक गोष्ट म्हणजे काम करणाऱ्याला घ्यावी लागणारी आपल्या साधनसामुग्रीची काळजी. ही जबाबदारी देखील बालकांनीं अंगिकारिलेली होतीच. एक आठवडाभर करीत आलेल्या ठोकळ्यांची रचना संपल्यानंतर ज्या वेळीं ते बाजूला नेऊन ठेवणें आवश्यक असतें त्या वेळीं तें कसें तरी उरकण्यांत आल्यास बालकांना तुम्हीं दोष दिला नसतात.

परंतु एकादें कार्य करवून घेण्याच्या विशिष्ट पद्धती असतात. एका शुक्रवारीं दुपारीं सहा वर्षें वयाच्या बालकांचा खेळ मी लक्षपूर्वक पहात होतें, कांहीं बालकें आपली मालवाहू होडकी फडताळांकडे ढकलीत होतीं अन् त्या फडताळांच्या गोद्यांमध्यें असलेलीं माल-उतारू पथकें 'आतां आमच्या या गोदींत या' असा पुकारा करून त्यांना बोलावीत होतीं. तो वर्ग बोटींच्या शिट्यांच्या आवाजानें व या बालचमूच्या हालचालींनीं अगदीं भरून गेला होता. हीं बालकें अगदीं खांद्याला खांदा भिडवून आपापलीं कामें करीत होतीं. अशा वेळीं जर त्यांच्यापाशीं मोठीं माणसें असतील व त्यांनीं देखील बालकांच्या या कामांत भाग घेतला तर काम करण्याच्या या उत्साहाला तें सहाय्यभूत होत असतें.

बालकांना आपला खेळ आवरण्यास लावण्यासंबंधीचा प्रश्न ज्या ज्या वेळीं माझ्या मनांत येतो, त्या त्या वेळीं माझ्या एका मैत्रिणीनें सांगितलेलें एक दृश्य माझ्यापुढें नेहमींच उभें राहातें. ती एकदां आपल्या एका मैत्रिणीकडे जेवावयास गेली होती; त्या वेळीं त्या घरांतील लहान मुलगा

ठोकळ्यांनीं खेळत होता. आपल्या कल्पनेप्रमाणें एक छानदार अशी इमारत रचण्यांत तो अगदीं गढून गेला होता. इतक्यांत त्याची आई माजघरांतून बाहेर आली व हातानें टाळी वाजवून तिनें पुकार केला 'जेवणाची वेळ झाली, चल, ठोकळे आटप व हातपाय धुण्यास चल' हा पुकार ऐकतांच तो लहानगा मुलगा चवताळल्याप्रमाणें आपल्या ठोकळ्यांच्या इमारतीकडे वळला व एक जोराची लाथ हाणून ती इमारत कोसळवून टाकली. त्याच्या उत्पादनशील कल्पनाशक्तीचें संकल्पित कार्य पुरें होण्यापूर्वीच ती भग्न झाली व म्हणूनच त्याला तें सहन झालें नाहीं. आपल्या संकल्पित व मोठ्या काळजीपूर्वकतया तयार केलेल्या या वस्तूवर लाथ हाणून ती मोडून टाकतांना जो आवेश प्रकट झाला त्यांत त्याच्या मनोयातनांची उत्कटता पूर्णतया प्रतीत झाली होती.

आईबापांकडून वारंवार विचारण्यांत येणाऱ्या "कुटुंबाच्या सोयीचा कांहीं अंशीं विचार केला पाहिजे हें बालकानें शिकावयास नको का?" या प्रश्नाला सरळ व सोपें उत्तर देतां येणार नाहीं. अर्थात् बालकांनीं तें शिकणें आवश्यक आहे, परंतु शिकणें हें मोठ्यांना देखील त्रासदायक आहे. बिकट अशा प्रसंगीं बालकांना मदत होईल अशा प्रकारच्या सहानुभूतिपूर्ण असा विचार मोठ्यांनीं करावा असेंच माझें म्हणणें आहे. आपल्या जगांत प्रवेश करून आपल्या सोयीचा विचार करण्यास बालकांना जर सांगावयाचें झालें तर तें स्थित्यंतर करण्यासंबंधीं त्याला केवळ सहाय्यभूत होण्यासाठीं म्हणून तरी आपल्याला त्याच्या जगतांत शिरणें भाग नाहीं का? उपरिनिर्दिष्ट प्रसंगांतील त्या आईनें आपल्या बालकाच्या खेळाकडे मन लावून पहाण्यांत कांहीं वेळ घालविला असता व मग जेवण लौकरच तयार होईल तेव्हां तूं आपले ठोकळे आवरून लाग कसे अशी आज्ञा केली असती तर अगदीं थोडयाशा निषेधानेंच त्यानें त्या आज्ञेचा स्वीकार केला असता.

सहा वर्षें वयाच्या बालकांच्या वर्गांत सर्वसाधारण अशा कोणत्याही दुपारीं शिक्षिकांनीं कोणत्याही प्रकारें जोर न देतां केलेल्या आज्ञा मीं ऐकल्या आहेत, "आतां घरीं जाण्याची वेळ झाली आहे—तुम्ही आपल्या गाईंना गोठ्यांत बांधून ठेवा व नंतर आपापलीं कामें आवरा" बालकें

करीत असलेल्या कार्याच्या महत्त्वपूर्णतेसंबंधीं अशा प्रकारें थोडीशी दखल घेणें आवश्यक आहे. बालकांच्या जगतांत स्वतः शिरून त्यायोगें आमच्या शिक्षिका त्यांचा अधिकाधिक परिचय करून घेत होत्या इतकेंच केवळ नव्हे तर बालकांबरोबरचा घनिष्ठ संबंधही प्राप्त करून घेत होत्या. मोठीं माणसें व बालकें यांच्यांत इतरत्र जें वैमनस्य अटळपणें आढळून येतें, तें आमच्या या वर्गातून क्वचितच अनिवार्य होतें, आपल्या घराकडून फार मोठा त्रास घेऊन येणाऱ्या बालकांव्यतिरिक्त आमच्या वर्गातून त्याचें अस्तित्त्व नव्हतेंच असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं.

मोठ्या माणसांच्या प्रमाणांना भिऊन जाणें अथवा त्याबाबत झगडणें याऐवजीं आम्हांला जर कांहीं आढळून आलें असेल तर तें म्हणजे मोठ्या माणसांच्या अभिनिवेशानें ज्या वेळीं तीं आपले खेळ खेळूं लागत त्या वेळीं त्यांत तीं आणीत असलेलें आपलें वैशिष्ट्य हेंच होय. यालाच तीं "खरें काम" असें ओळखीत आणि त्यांत मोठ्या माणसांचीं साधनें, भांडींकुंडीं व इतर सामुग्री यांचा वापर करणें यांचा समावेश होई. या सहा वर्षें वयाच्या छोट्या बालकांना त्यांत अभिमान वाटे; आणि म्हणूनच आम्हीं त्यांत बाजारहाटाचें काम, पाकशास्त्र व शिवण यांची अधिक भर घातली. या वयाच्या बालकांना स्वयंपाकपाण्याचेंच विशेष आकर्षण वाटलें. आपल्या या कामाला त्यांनीं फळें सुरक्षित ठेवणें, साखर, फळें व उष्णता यांचा प्रयोग करून निरनिराळे पदार्थ बनविणें यांपासून सुरवात केली. या कामीं जर तीं कधीं अयशस्वी झालींच तर त्यांना संकल्पित पदार्थ कसा बनवायचा हें दाखवून दिलें जात असें.

अनुकरणात्मक खेळ, संगीत, कला व स्वयंपाक करणें, बाजारहाट करणें यांच्यासारख्या व्यवहारी कला यांच्याकडे आमचें संपूर्ण लक्ष देत असतांनाच आम्हीं परंपरागत शालेय अभ्यासाचा शिरकाव कसा करून घ्यावा, या संधीची हरघडी वाट पहात असूं.

आपल्या आंवतींभोंवतींच्या सृष्टीसंबंधीं बालकांना आकर्षण असल्यानें भूगोल विषयाला स्वाभाविकतःच आरंभ झाला होता. नकाशांवरील शहरांचे आकार त्यांना परिचित झाले व त्यांनीं स्वेच्छेकरून आपले नकाशे

स्वतःच तयार केले. उंचसखलपणा दर्शविणारे शाडूचे महत्त्वाचे असे नकाशे बालकांच्या गटागटांनीं एकत्र मिळून तयार केलेले होते. आपल्या सभोंवारच्या सृष्टीची माहिती व्हावी म्हणून आम्हीं त्यांना दिशांची जाणीव करून दिली.

आपल्या सहलींत आपण नगराच्या वरच्या भागाकडे जात आहोंत वा खालच्या भागाकडे जात आहोंत, पूर्वेकडील नदीच्या रोखानें जात आहोंत कीं हडसन नदीकडे जात आहोंत हें तीं जाणूं शकत होतीं, व मग ह्या दिशांना उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम असें सांगणें ही साधी सोपी पायरी होती.

या सहा वर्षांच्या बालकांना लिहिण्यावाचण्याचें व हिशेब करण्याचें शिकविण्यासाठीं ज्या ज्या वेळीं आम्हांला संधी मिळत त्या त्या वेळीं आम्हीं त्यांचा पुरेपूर फायदा घेत असूं. आमच्या शिक्षिका वर्गांत भेंड्या व कोडीं अशा प्रकारचे खेळ घेत. वर्गांतील वस्तूंच्या वा मुलांच्या नांवांतील पहिल्या अक्षराचा जो आवाज येतो त्या आवाजावरून त्या वस्तूचे वा त्या बालकाचें नांव शोधून काढावयाचें. "ज्याचें नांव ममम यानें आरंभ होतें अशा एका मुलाचें नांव शोधून काढा" अशा प्रकारें नांवांतील पहिल्या अक्षराच्या आवाजासारखा आवाज करून सांगण्यांत येत असे "बॉय (मुलगा) या आवाजासारखा ज्या वस्तूच्या नांवाचा आवाज येतो ती वस्तू सांगा" अशा प्रकारचे खेळ घेतले जात. यायोगें आवाजाआवाजांतील सूक्ष्म फरक देखील त्यांना परिचित झाला व तीं त्यांच्या स्पष्ट परिभाषा देखील करूं लागलीं. त्यानंतर ज्या वेळीं प्रत्यक्ष लिहिणें वाचणें सुरू करण्यांत आलें त्या वेळीं बालकांच्या उपस्थितीबद्दलची भीति फारच कमी झाली होती.

याच सुमाराला इतरत्रच्या शैक्षणिक गोटांतून बालकांसाठीं बालवाचन सुरू करण्यासंबंधीं जोराची चर्चा चाललेली होती. अद्‌भुत पऱ्यांच्या गोष्टींच्या विरुद्ध अशा प्रकारची विचारप्रणाली निर्माण झाली. परंतु पऱ्यांच्या कहाण्यांत कांहींच वावगें नाहीं. त्यांपैकीं पुष्कळशा कथा अत्यंत सुंदर आहेत, त्यांत परिचित अशा प्रकारच्या दृश्यांचे वातावरण आहे व वास्तविकताही त्यांत कांहीं थोडी थोडकी नाहीं. आणि बालक व त्यांचे आईबाप या उभयतांनाही मनोरंजक अशाच त्या आहेत.

परंतु कल्पनाशक्तीला उत्तेजित करण्याच्या बाबतींत मात्र या कथा मदतीपेक्षां बाधकच जास्त ठरतात. वाचनाशीं परिचित असलेलीं किंवा ज्यांचें पुष्कळसें वाचन झालेलें आहे, अशीं बालकें त्याचप्रमाणें वाचनाशीं अल्पपरिचित परंतु आपल्या हातां–पायां–डोळ्यां-कानांकरवीं पुष्कळशा विविध अनुभूति घेतलेलीं बालकेंही मीं पाहिलीं आहेत. त्यांत दर्जा, नावीन्य व भावप्रकटीकरणाराचा प्रभाव आहे. कोणत्याही प्रकारच्या तुलनेंत अशिक्षित ( वाचनाशीं परिचित नसलेलें ) बालकच यशस्वी ठरतें

लोकांकडून उसन्या घेतलेल्या कल्पना व त्यांचा आविष्कार करणारे वाक्प्रचार यांच्या बाबतींत वाचनाशीं पूर्ण परिचित असलेलें बालक हें हुशार असूं शकेल परंतु व्यक्तिगत भावात्मक अनुभूतींच्या शक्तीचा त्याच्याठायीं अभाव असतो. प्रातःकालच्या अरुणोदयाची पक्षांच्या समवेत भावात्मक सुखानुभूति घेतलेल्या बालकाची केवळ अरुणोदय व पक्षी यांसंबंधीची माहिती वाचलेलें बालक कधींही बरोबरी करूं शकणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपल्या अनुभूतिसदृश अशा प्रकारचें वर्णन वाचनांत आल्यास हें बालक तें चटकन ओळखूं शकेल व तत्संबंधीं आपल्याला असलेल्या अधिक माहितीची भर घालील.

वाङ्मयविषयक सत्वपूर्णता या दृष्टीनें विचार करतां पऱ्यांच्या कथा बालकांपुढें त्यांना वास्तविक जगाची जाणीव होण्यापूर्वींच कल्पनारंजित असें अद्भुत जग उभें करीत असतात, खरें कोणतें व कपोलकल्पित कोणतें यांतील सूक्ष्म भेद कळण्यापूर्वींच त्यांच्यापुढें तें उभें केलें जातें. हें वाङ्मय अशा प्रकारचा सुलभ भावनावेग घडवून आणतें कीं त्यामुळें खऱ्याखुऱ्या जगतांत असणाऱ्या प्रक्षोभजनक गोष्टींचा तपास लावण्यासाठीं त्या खऱ्या जगाचा नीट शोध घेण्याला त्यांना एक प्रकारें उत्साहरहितच करण्यांत येतें.

वाङ्मय हें बालकांच्या कल्पनाशक्तीला उत्तेजक ठरण्याऐवजीं आम्हांला जर कांहीं आढळून आलें असेल तर तें हें कीं, वाङ्मयाच्या निर्मितीचें अधिष्ठान बालकांच्या कल्पनाशक्तीवरच असतें. नदींतून मालाची वाहतुक करणारी मालवाहू होडी स्वतः पाहिलेल्या बालकाला तत्संबंधीच्या

एकाद्या गोष्टीबद्दल जितकी आत्मीयता वाटेल तितकी ती एकाद्या फुलराणीची कथा वाचून दाखविलेल्या बालकाला त्या गोष्टीबद्दल वाटणें हें असंभाव्यच होय. मालवाहू होडी त्या बालकानें जितक्या सूक्ष्मतेनें पाहिली असेल व त्या दृश्यानें त्याच्या मनावर जितकी छाप बसविली असेल तितक्या उत्कटतेनें व उत्कृष्टतेनें तें बालक आपण पाहिलेल्या या दृश्याची आपल्या खेळांतील रचनेंत, चित्रांत अथवा शब्दांत प्रतिकृति निर्माण करण्याचा प्रयत्न करील. आपल्या या अनुभूतीच्या अभिव्यक्तीसाठीं त्याला वाङ्मयांतून वाक्प्रचार उसने घ्यावे लागणार नाहींत. आपल्या स्वतःच्या शब्दांत व वाक्यांत तें त्याचें वर्णन करील–त्यासाठीं लागणारीं वाक्यें वा वाक्प्रयोग त्याला स्वतःच्या भाषेंतच सांपडतील.

याचें उदाहरणादाखल एका सहा वर्षें वयाच्या बालकानें असेंच एक दृश्य पाहिल्यावर आपल्याशींच गुणगुणलेली स्वयंरचित काव्यवजा पंक्ति होय. "The giant shovel takes a bite of coal and he spits it down into another boat.'' त्या बालकाची ही गुणगुण बरोबरच्या शिक्षिकेनें ऐकली होती. परंतु त्या वेळीं ती कांहींच बोलली नाहीं, परंतु दुसऱ्या दिवशीं शाळेंत तिनें ती पंक्ति स्वःत म्हटली व ही कविता पुरी करावयाची आहे कां असें तिनें त्या बालकाला विचारलें मात्र अन् पुढल्या ओळी इतक्या शीघ्रतेनें त्या बालकाच्या मुखांतून बाहेर पडल्या कीं, त्या लिहून घेण्याचा त्या शिक्षिकेचा वेगही त्यापुढें कमी पडला.

फावड्याच्या दैत्यानें घेतला कोळशाचा घांस, थुंकला
दुसऱ्या जहाजांत ॥
येतो कोळसावाला खटारा न्याया आपली न्याहारी
जहाजांतून ॥
दैत्य फावडें घेतो दुसरा घांस, थुंके कोळशाच्या
खटाऱ्यांत ॥
घेतो घांसामागून घांस खटारा शिगेला येईतों ॥
जातो धडाडधडाड खडाडखडाड खटारा माघारीं ॥

येतो मग खटारा दुसरा उभा असा कोळशासाठीं ॥
झाली रिती कोळशाची बोट तिला ओढाया आलें
दुजें जहाज ॥
पुन्हां न्यायाला कोळसा भरून ॥ दिनक्रम हा सूर्यास्तावरी ॥

त्या काव्यांत वास्तविकतेचें प्रतिबिंब आहे, ध्वनि आहे, ज्या अनुभूतीं-मुळें वा संकलित अनुभूतींमुळें या काव्याला प्रेरणा मिळाली त्यांचें यथार्थ व मनावर ठसणारें असें दर्शन यांत होतें. बालकें अशाच प्रकारें आपल्या स्वतःच्या गोष्टी तयार करीत, या गोष्टींचें निराळें असें वाङ्मयीन महत्त्व होतें व तें म्हणजे कल्पनेचें होय. पुढें दिलेलें वर्णन हें एका अशाच सहा वर्षे वयाच्या बालकानें स्वतःच काढलेल्या एका 'समुद्र–पक्ष्या'च्या चित्राकडे पाहून सांगितलेलें आहे. या चित्रांत हा पक्षी समुद्राच्या लाटांवर झडप घालीत आहे असें काढलेलें होतें. तें वर्णन असें:—

समुद्रपक्षी—( पाणबुडे अथवा खंड्यापक्षी )

मध्यरात्रीला हे समुद्रपक्षी गाढ झोपीं गेलेले असतात आणि सकाळीं जेव्हां ते जागे होतात व समुद्राच्या लाटांकडे पहातात त्या वेळीं त्यांना पाण्यांत मासे दिसतात, ते लगेच त्या लाटांवर झडप घालून ते मासे पकडण्याचा प्रयत्न करतात. हा पक्षी पाण्यांत बुडी मारतो व मासे पकडतो. आणि नंतर पाण्यांतून वर येऊन खडकांतील आपल्या घरट्याकडे उडून जातो. तो पकडून आणलेला मासा खातो. आपली भूक शमेपर्यंत त्याचा हा कार्यक्रम रोज सारखा चालूच असतो.

बालकांच्या जीवनांत वाङ्मयाच्या स्थानासंबंधीं जो एक मोठा गैरसमज निर्माण झालेला आहे त्याचें मूलभूत कारण म्हणजे कल्पनाशक्तीचा वास्तवतेशीं कांहींच संबंध नसतो. ती स्वतंत्र असते अशा प्रकारचा ग्रह चुकीचा होय असें मला वाटतें. कल्पनाशक्ती (Imagination) बद्दल जें पुष्कळ वेळां बोललें जातें तें हा शब्द अवास्तव कल्पनाशक्ति (fantasy) अशाच अर्थानें अभिप्रेत केला जातो.

अवास्तव कल्पना अथवा कल्पनारम्यता हें कल्पनाशक्तीचें एक अंग आहे; आणि त्याचा बालकांच्या बाबतींत कांहींच फायदा नाहीं. होडी पाहिलेल्या एकाद्या बालकानें आपल्या नजरेवर भिस्त ठेवून एकाद्या काठीची एक होडी तयार करून ती लाटांवर कशी हेलकावे खाते या संबंधीच्या आविर्भावापासून त्याला होणाऱ्या आनंदाचा स्वाद तुम्हींही घ्यावा म्हणून जर तें बालक तुम्हांलाही प्रवृत्त करूं लागलें तर आपल्या कल्पनाशक्तीच्या बाबतींत त्याची चांगलीच प्रगति झाली आहे हें खचितच होय.

तासचे तास, दिवसानुदिवस आपल्या हातीं मिळेल त्या साधनांकरवीं आपल्या जगताची निर्मिति करण्याच्या खेळांत त्यानें दवडले तरी त्यांत त्याच्या कल्पनाशक्तीची अभिव्यक्ति खास असेल. परंतु मोठीं माणसें जसें समजतात कीं, त्याचा खेळ हा दादूमादूचा आहे म्हणून तो काल्पनिक आहे. जर त्या बालकानें म्हटलें कीं, " एक मोठी थोरली गाय पाण्यांतून बाहेर आली व तिनें माझी होडी फोडून टाकली " आणि त्याच वेळीं जर त्याला गाय म्हणजे काय याची माहिती असेल तर त्याचें म्हणणें केवळ विनोदाचें असेल अथवा त्याला गाईसंबंधीं चुकीची माहिती असेल किंवा तितकीशी नीट माहिती नसेल, अशा प्रसंगीं अशा बालकाच्या मातेनें आपल्या बालकाच्या या 'कल्पकते'संबंधीं धन्योद्गार काढले तर त्यानें बालकाचा कांहीं एक फायदा होणार नाहीं. त्याच्या बाबतींत जर कशाची जरुरी असेल तर ती म्हणजे त्याच्या या ' कल्पनेच्या भरारी' संबंधीं कौतुक करण्याची नव्हे, तर त्याला सुस्पष्ट अशी माहिती पुरविणें, त्याला असलेल्या माहितींतील संदिग्धता नाहींशी करणें ही होय.

वस्तुस्थितीबद्दल त्याला जी कांहीं माहिती असते त्या माहितीनुसार तें बालक ती माहिती संकलित करून त्यापासून प्रतिकृति निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतें व या प्रयत्नासाठीं तें आपल्या कल्पनाशक्तीचा उपयोग करीत असतें; परंतु त्याचा हा प्रयत्न जर वस्तुस्थितीला अनुसरून नसेल तर त्याचें कारण म्हणजे त्याला असलेली माहिती ही गैरसमजाची असते, तिचा गैर उपयोग केलेला असतो, ती गैरसमजुतीची

वास्तविकता असते. त्याच्या ह्या अशा प्रकारच्या समजुतीच्या घोटाळ्यामुळें त्याला सहाय्य तर होत नाहींच पण उलट त्यामुळें त्याची अनवस्था मात्र होते. परंतु खऱ्याखुऱ्या जगताचा वास्तवतापूर्ण परिचय त्याच्या कल्पनाशक्तीला बाधक न ठरतां उलट त्याच्या कल्पनाशक्तीला बळकटच करील, तिच्या विकासाला आवश्यक असें पोषणच प्रदान करील.

...छोट्या परमाणूंत अडकून पडलेल्या राक्षसी शक्तीचा वस्तुविज्ञानशास्त्रज्ञाला परिचय करून देण्याला जर कांहीं कारणीभूत असेल तर तें म्हणजे ज्ञात जगासंबंधींचें त्याचें ज्ञानच होय. तत्त्वज्ञ व कवी यांना मानवी आत्म्याचा साक्षात्कार करून देण्याला कांहीं कारणीभूत असेल तर तें म्हणजे मानवी सत्यासंबंधींची त्याला झालेली वा होणारी जाणीवच होय. बालकें मोठीं मोठीं होत गेल्यानंतर त्यांना भौतिक जीवनापासून मुक्त करण्यास कारणीभूत होईल अशा प्रकारचें आवश्यक शिक्षण बालकांना द्यावें हेंच माझें मागणें आहे. भौतिक वा भौगोलिक जगताची उपेक्षा करून त्यांना त्यापासून दूर जातां येणार नाहीं. त्याच्या अस्तित्वासंबंधींची पूर्ण जाणीव करून घेतल्यानंतर त्यावर आरूढ होणें त्यांना शक्य होईल.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७७५९

## ७. सातवें वर्ष–एक विकासशील वर्ष

आमच्यापुढें आणखी एक निर्माण झालेला प्रश्न सात वर्षें वयाच्या बालकांच्या कार्यक्रमाचा होता. मोठ्या माणसांच्या जगताप्रमाणेंच उत्पादक्षम अशा प्रकारचीं धाडसी कामें हातीं घेण्यास व तदनुषंगिक जबाबदारी स्वीकारण्यास हीं बालकें अगदीं उत्सुक झालीं होतीं. ही त्यांची उत्सुकता म्हणजे त्यांच्या स्वतःच्या विकासाचीं लक्षणेंच होतीं.

खरें पाहिलें तर स्वतःसाठीं नवीन असें कार्य त्यांच्यापुढें होतेंच. यापुढें लिहिण्यावाचण्याच्या शिक्षणाला आरंभ करण्यास आणखी विलंब लावणें हें शहाणपणाचें नव्हे अशी आमची खात्री झाली होतीच. वाचनाच्या शिक्षणांत मागें पडलेल्या बालकाला त्याचें सहकारी तुच्छ लेखीत असतात; निदान त्याला स्वतःला तरी तें तसें वाटूं लागतें आणि यांतूनच पुढें न्यूनगंडाच्या भावनेचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असतो.

या प्रश्नावर कांहीं प्रकाश पडतो कां तें पहाण्यासाठीं म्हणून मी सहा वर्षांच्या बालकांच्या वर्गांत एके दिवशीं गेलें. सातव्या वर्षांत पदार्पण करण्याचा त्यांचा काळ आतां जवळ आलेला होता. वर्गांत पाऊल ठेवतांक्षणींच मला तेथें न्यू यॉर्क शहराची ठोकळ्यांची प्रतिकृति तयार करण्यांत येत असलेली आढळून आली. नकाशावजा अशा खडूच्या रेघोट्या काढून नद्या व बंदरें दाखविण्यांत आलीं होतीं. या गटांतील सर्व बालकें आपल्या या सामायिक योजनेला सफल करण्यांत गढून गेलीं होतीं. होड्या चालवणें, आगगाड्या चालवणें, वस्तुभांडार, गृहकर्म, वीज-

खातें वगैरे निरनिराळ्या कामांत प्रत्येकजण अगदीं गढून गेलें होतें. जणूं काय एकाद्या सजीव समाजाप्रमाणेंच त्यांचें हें कार्य आश्चर्यकारकरीत्या चाललें होतें.

पुढल्या वर्षात पदार्पण केल्यानंतर त्यांच्या या सुदृढ कार्यापासून त्यांची ताटातूट करणें मला पटेना व म्हणूनच अशा प्रकारच्या रचना या कायम स्वरूपाच्या साधनसामुग्रीकरवीं तयार करणें हेंच काम त्यांना पुढल्या वर्षी द्यावें अशा प्रकारचा मी विचार करीत होतें. मीं माझा विचार त्यांना सांगितला व तो त्यांना पटला देखील.

तदनुसार शहराची रचना करण्याचा खेळ हा पुढील वर्षासाठीं सप्तवर्षीय बालकांच्या कार्यक्रमाचा गाभा ठरला. उत्पादनक्षम अशा कोणत्या तरी कार्यक्रमाची त्यांची मागणी आणि मोठ्या माणसांच्या जगताची अनुकारणात्मक प्रतिकृति करण्याची संधि, अशा दोन्ही गोष्टींची फलश्रुति या कार्यक्रमानें भागली. सामुदायिकरीत्या आपल्या आंवतींभोंवतीच्या परिस्थितीचा वापर व विकास करण्याचे आणखी कांहीं मार्ग त्यांना यायोगें प्राप्त झाले व त्यांच्या या मध्यवर्ती कार्याशीं संबद्ध असलेलें वाचन, लेखन व अंकगणित यांचा प्रारंभ करण्यास अशा प्रकारचा वाव मिळाला कीं ज्यायोगें या साधनांची साधना हेंच केवळ अंतिम कार्य न राहतां नेहमीं त्यांचा तात्कालिक वापर करतां यावा.

वयाच्या सातव्या वर्षाच्या आरंभालाच या बालकांनीं आपल्या जीवनाच्या 'तोंडी' भागाचा समारोप केला. बेरीज, वजाबाकी व भागाकार करणें यांचा त्यांना अर्थ कळत होता. परंतु खऱ्याखुऱ्या वस्तूंकरवींच त्यांना या रीतींचा वा प्रयोगांचा परिचय होता; या वस्तूंच्या प्रातिनिधिक चिन्हांचें लेखन माहीत नव्हतें. स्मृतिप्रिय वस्तूंच्या वस्तुस्थितीची लेखी नोंद करण्याची पद्धत त्यांना माहीत नव्हती. शब्द हे ध्वनीपासून तयार होतात हें त्यांना ठाऊक होतें; परंतु लिहिण्यांत त्यांचीं जीं प्रातिनिधिक स्वरूपें असतात; त्या स्वरूपांची प्रतिमा त्यांच्या डोळ्यांना परिचित नव्हती; परंतु या वेळीं तीं बालकें अशा एका पातळीपर्यंत येऊन पोहोंचलीं होतीं कीं ज्या स्थळीं त्यांना या साधनांची आवश्यकता भासूं

लागली होती व बहुतेक बालकें त्यांचा वापर करण्यासाठीं शिकायला अधीर झालीं होतीं.

सप्तवर्षीय बालकांना आम्ही कसें शिकवीत असूं याचें उत्तम उदाहरण म्हणजे आमच्यापैकींच दोन शिक्षिकांनीं लिहिलेल्या व शैक्षणिक प्रयोग-खात्यानें प्रसिद्ध केलेल्या 'कृति–प्रधान शाळेंत वाचन व सामाजिक–विज्ञान यांचें स्थान' या पुस्तकांतील पुढें दिलेला उतारा होय.

—"या सात वर्षें वयाच्या बालकांना अर्थाची व वाचनाच्या प्रयोजनाची जाणीव करून देणें हेंच आमचें ध्येय आहे. थकवा, त्रास, भीति यांच्यासारख्या अकरणात्मक प्रतिक्रिया व साध्यासाठीं साध्य अशा प्रकारच्या प्रणालीच्या भोंवतीं केंद्रीभूत होणारी चढाओढीची प्रवृत्ति यांना टाळण्याची आमची इच्छा आहे. बालकांच्या कार्य व खेळ यांच्याशीं संबद्ध असलेल्या साधनांच्या अनुषंगानेंच बहुधा सुमारें सहा महिन्यांपर्यंतचा काळ तशा प्रकारच्या कार्यासाठीं व्यतीत केला जातो. आणि पुस्तकांचा उपयोग सुरू केला असतां देखील बालकें वाचण्याचीं आपलीं साधनें तयार करण्याचें चालूच ठेवतात.

—"वर्गाच्या शिस्तबद्धतेच्या आवश्यकतेंतूनच आरंभीं वाचन निर्माण होतें. सूचना–फलकावर लावण्यांत येणाऱ्या रोजच्या सूचना तक्त्यांच्या स्वरूपांत असतात.

आम्ही दहा वाजतां दुकानांत जातों.

मंगळवारीं व बुधवारीं आम्ही स्वयंपाक करण्यांस शिकतों.

सोमवारीं व मंगळवारीं आम्ही संगीत शिकण्यास जातों.

शुक्रवारीं आम्ही सहली काढतों.

क्रीडा–नगरांतूनच समाधानकारक अशीं साधनें प्राप्त होत असतात. कारण तेथें प्रत्येक बालकाला भाग घेण्यास संधि मिळते व बालकांच्या या गटांकरवींच अनुभवांची निवड करण्यांत येऊन हे निवडलेले अनुभव तीं बालकें शिक्षिकांना सांगतात. त्या अनुभवांचे असे तक्ते वा फलक तयार करण्यांत येतात.

—"त्यांपैकीं कांहीं प्रक्षोभक वा खळबळजनक असत. आग लागलेल्या चाळींतून लोकांची मुक्तता, कारखान्यांतील हरताळ, नदीवरील पडझड

अशा स्वरूपांचे ते असत. कांहीं प्रत्यक्ष खेळांतून निर्माण झालेल्या अनुभवांऐवजीं केवळ तर्कबुद्धींतून निर्माण झालेले असत. उदाहरणार्थ एकदां एका मुलानें आपल्या इमारतीच्या छपरावर पाण्याची टाकी ठेवली व नंतर शहरांतील उंच इमारतीच्या माथ्यावर पाणी कसें चढतें या संबंधीच्या चर्चेला तोंड लागलें. झालें. लगेच विज्ञानशास्त्राच्या शिक्षिकेला बोलावण्यांत आलें व या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर सप्रयोग समजावून देण्याचें सांगण्यांत आलें व त्याची नोंद बालकांना वाचण्यासाठीं तक्त्यावर करून ठेवण्यांत आली.

—"या तक्त्यांवरील नोंदींची रोज उजळणी घेण्यांत येत असे व बालकांनीं त्यावर प्रभुत्व मिळविलें कीं मग त्यांना त्यांच्या छापील प्रती दिल्या जात. ह्या छापील प्रती अकरा वर्षांच्या बालकांनीं पुस्तकरूपांत तयार केलेल्या असत.

—"आम्हीं वर्गाचें वृत्तपत्र चालवीत असू, त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या बातम्यांचा समावेश केलेला असे—आवारांत खेळण्यांत आलेले नाट्यरूप खेळ, सहलींत आलेले अनुभव अथवा छापण्यासाठीं न घेतलेला शहरी बातम्यांचा मजकूर. न छापलेल्या अशा वृत्तपत्राच्या एका मोठ्या कागदावर शिक्षिका हातानें लिहून हें वृत्तपत्र तयार करीत असत.

—"यानंतर गोष्टींचीं पुस्तकें वाचण्यासाठीं दिलीं जात व हीं बालकें पुरेशीं स्वावलंबी झालीं कीं, त्यांना आपला वाचनाचा वेळ पुस्तकालयांत घालविण्यास मुभा देण्यांत येत असे, मात्र त्यांच्याबरोबर त्यांची शिक्षिका वा एखादी मदतनीस असे.

—" सप्तवर्षीय बालकांच्या वाचनविषयांतील कांहीं भाग पुढें त्यांना आपल्या समाजशास्त्राच्या अभ्यासासाठीं पाया तयार करण्याच्या कामीं उपयोगी पडत असे. वर्गाच्या वृत्तपत्रांत बालकांनीं लिहिलेला मजकूर, तसेंच सहलींच्या वेळीं मिळविलेली माहिती यांच्या आधारें लोक आपला उदरनिर्वाह कसा करितात ( व कांहीं जणांना उदरनिर्वाह कां करतां येऊं नये ), लोकशासन कसें चालतें, संप म्हणजे काय व ते कां निर्माण होतात इत्यादि गोष्टींची चर्चा सुरू झाली. ज्या बालकांनीं सद्यः-

कालीन जीवनासंबंधीं वाचलें आहे व तदनुसार खेळ खेळले आहेत तीं आठ वर्षे वयाचीं झालीं तोंच त्यांनीं प्राचीन काळांतील लोकांच्या जीवनक्रमासंबंधींचें वाचन करण्याची व तदनुसार खेळ खेळण्याची तत्परता दाखविली आहे."

आतां हीं बालकें पूर्वीपेक्षां जास्त लक्ष लावून आपले कार्यक्रम पार पाडीत होतीं. पूर्वीपेक्षां जास्त वेळ तीं आपल्या या कारखान्यांत काम करूं लागलीं आहेत व घरें, पूल व चढणीचे मार्ग, यांत्रिक वाहनें, होड्या व आगगाड्या तयार करण्यांत निमग्न झालीं आहेत, कारण त्यांच्या खेळांतील शहराला या गोष्टींची आवश्यकता असल्याचें त्यांनीं ठरविलें होतें. अशा प्रकारें प्रत्येक बालकाचें काम म्हणजे त्याच्या गटाच्या सामूहिक जबाबदारीचा एक भागच होता.

शहराच्या खेळाच्या बाबतींत हीच जबाबदारी बालकांमध्यें आढळून आली. धान्याचें दुकान चालविण्याची जबाबदारी अंगावर घेतलेल्या बालकांकडून जर कां या जबाबदारींत कांहीं कुचराई झाली तर बाकीच्या सर्व लोकांना उपाशी मरावें लागलें असतें. शहरासंबंधीच्या खेळाची जी एक ठराविक वेळ होती त्या वेळीं जर हा दुकानदार दुसऱ्या कसल्यातरी कामांत गुंतलेला असेल, तर अशा वेळीं आपली ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं तो दुसऱ्या कोणाची तरी योजना करी. कांहीं वेळां या दुकानाच्या शेजारींच असलेल्या वीजखात्याची जबाबदारी असलेला शेजारी आपल्या कामाबरोबरच या दुकानाचीही व्यवस्था पाही. दुकानमालकाच्या गैरहजेरींत गिऱ्हाइकांनीं कोठें जावें यासंबंधींच्या सूचना दुकानाच्या दरवाज्यावर लिहिलेल्या आढळत.

अशा प्रकारें हीं बालकें कांहीं काळपर्यंत हा खेळ खेळलीं. हा खेळ म्हणजे वैयक्तिक आचाराची मोकळीक ठेवूनही सामूहिक जबाबदारीच्या जाणिवेनें होय—निर्माण झालेला सर्वसामान्य समजूतदारपणाच होय.

प्रत्येक आठवड्यानंतर अथवा दोन आठवड्यांनंतर हें शहर मोडून पुन्हां नव्यानें स्थापण्यांत येई. किंबहुना या कार्यक्रमांतील हाच महत्त्वाचा व मौलिक भाग होता. त्यामुळें बालकांनीं या आपल्या ताज्या

शहरप्रस्थापनेच्या कार्याला आरंभ करण्यापूर्वी आदल्या दिवशीं काढलेल्या सहलींत अथवा चर्चेत उपलब्ध झालेल्या नवीन माहितीची भर घालून तदनुसार फेरफार करण्यास अवसर मिळत असे. तसेंच प्रत्येक वेळीं ताज्या शहरप्रस्थापनेच्या वेळीं बालकांना आपापलीं कामें बदलण्याचा मोका मिळे.

खानावळ चालविण्याचें काम दिलेल्या सात वर्षांच्या एकाद्या बालकाला प्रत्येक वेळीं सतत तेंच काम करावें लागल्यास त्याला त्या कामांत हौस वाटणार नाहीं. अशा प्रकारें स्वतःच निवडलेल्या या कामाचा कंटाळा येण्यापूर्वीच त्या बालकाची त्यांतून मुक्तता करणें हें शिक्षिकेचें काम होतें आणि म्हणूनच शहर उभारणीच्या प्रत्येक वेळीं सर्व बालकांनीं चाळी तयार करण्याचाच प्रयत्न करावा असें त्यांच्या शिक्षिका त्यांना हेतुपुरस्सर सांगत. हेतू हाच कीं, एकाद्या बालकाला आपलें पूर्वीचें काम बदलावयाचें असेल तर थोडासा फेरफार करून त्याच्या या इमारतीचें राहत्या घरापासून तो दुकानापर्यंत अथवा वीज-पुरवठा केंद्रापर्यंत कोणतेंही रूपांतर करतां यावें. अशा प्रकारें या पद्धतीनें थकवा अथवा कंटाळा यांचा प्रश्न सोडवून टाकण्यांत आला व म्हणूनच आपल्या या वर्षाच्या शेवटच्या दिवसापर्यंत या बालकांमध्यें या शहर-उभारणीच्या खेळाबाबत हौस राखली गेली होती.

आतां या बालकांच्या माहिती संकलित करण्यासाठीं काढलेल्या सहली वारंवार होऊं लागल्या, त्या मागल्या वर्षापेक्षां अधिक दूरवरच्या होत्या, अधिक उपयुक्त होत्या. या वर्षांतील त्यांच्या सहली या बहुधा त्यांच्या शहरउभारणीच्या कार्यक्रमांत निर्माण झालेल्या एकाद्या प्रश्नाचें प्रत्यक्ष उत्तर मिळावें म्हणूनच काढलेल्या होत्या. घरांत वीज कशी न्यावयाची या साध्यासुध्या प्रश्नासाठीं देखील शहराच्या विद्युत्गृहाकडे सहल काढण्यांत आली. त्यायोगें त्यांना वीज उत्पादन करणारीं यंत्रें, डायनमे व विशेषेंकरून शहरच्या वीजपुरवठ्याची व्यवस्था पहाणारे तेथील लोक यांचा परिचय झाला, त्यांनीं बालकांना पाहिजे असलेली माहिती पुरविली.

आपल्या या माहितीच्या संकलनाचें कार्य करण्यासाठीं शहरांतून फिरत असतां त्यांना माहिती तर मिळालीच परंतु त्याहीपेक्षां अधिक महत्त्वाची

गोष्ट म्हणजे त्यांना एकंदर परिस्थितीची कल्पना आली. त्यांनीं मोर्चे, सभा आदि गोष्टी पाहिल्या. शाळेंत परत आल्यानंतर केवळ मालाचें वांटप कसें केलें जातें याचीच चर्चा न करतां आर्थिक व समाजिक प्रश्नांवर देखील आपल्यापरि चर्चा केली.

या बालकांपैकीं कांहीं बालकें शहराच्या सभागृहाच्या बाजूनें चाललीं असतां त्यांना तेथें लोकांची गर्दी आढळली. ते जमलेले लोक पुढेंपुढें सरकण्याचा प्रयत्न करीत होते व पोलिसांचें कडें त्यांना मागें रेटण्याचा प्रयत्न करीत होतें. हे लोक येथें काय करीत आहेत हें समजून घेण्यास हीं बालकें उत्सुक झालीं; त्यांच्या शिक्षिकेनें काय झालें तें कोणाला तरी विचारून घेण्यास बालकांना सांगितलें. या बालकांपैकीं एका धीट असलेल्या बालकानें जमावांत शिरून तेथील एका गृहस्थाच्या कोटाच्या टोंकास धरून हालविलें व हा काय प्रकार आहे असें त्या गृहस्थाला विचारलें. तो गृहस्थ बालकांच्या जवळ आला व त्यानें सांगितलें कीं, आपल्या नागरिकत्वाच्या हक्काशीं निगडित असलेल्या कांहीं बाबींसाठीं नगराध्यक्षाची भेट घेण्याचा जमावाचा प्रयत्न चालला आहे व पोलीस त्यांना अडवून ठेवीत आहेत.

झालें. माहिती संकलित करण्याला क्षेत्र मिळालें ! नगराध्यक्ष म्हणजे काय, नगरपिते कोण, त्यांना हे पदाधिकार कोणीं दिले व त्यांचे काम काय इत्यादि माहिती मिळविण्यास बालकें आतुर झालीं. नागरिकाचे हक्क कोणते व त्या हक्कांचा शहरच्या शासनपद्धतीशीं काय संबंध आहे याचें ज्ञान त्यांना करून घ्यायचें होतें. या घटनेनें हा जो नागरिकशास्त्राचा भाग बालकांनीं स्वतःच विचारूं केला व ज्याचें ज्ञान त्यांना देणें हा त्यांच्या अभ्यासांतील एक भाग ठरला तो शिक्षिकांच्याकडून सुचविला गेला नसता-किंबहुना तें तितकेंसें योग्यही ठरलें नसतें. आणि या बालकांच्या मनांत निर्माण झालेल्या या प्रश्नाचें समाधान करण्यासाठीं त्यांना शहरच्या शासनपद्धतीसंबंधीं जी माहिती दिली गेली, ती त्यांच्यापैकीं कोणीही कधींच विसरलें नसेल अशी माझी खात्री आहे.

अशा रीतीनें कांहीं ना कांहीं तरी ज्ञान मिळविण्याच्या त्यांच्या उत्सुकतेमुळें हीं बालकें या वर्षी नेहमींच कोणत्या ना कोणत्या तरी कामांत अगदीं

गढून गेलीं होतीं. सहलींच्या वेळीं त्यांना जें ज्ञान उपलब्ध झालें नाहीं, तें त्यांनीं वैयक्तिकरीत्या चर्चेसाठीं आणिलें व चर्चेतून मिळविलें. एके दिवशीं त्यांच्यापैकीं एका बालकानें बातमी आणली कीं शहरच्या पूर्वेकडील बाजूकडे नवीन क्रीडांगणें तयार करण्यांत आलीं आहेत. उद्यानाधिकारी मि. रॉबर्ट मोझेस यांनीं आपल्या मुलखतींत या क्रीडांगणांत भरपूर जागा समाविष्ट करण्यांत आल्याचें आणि कोणकोणते खेळ तेथें खेळतां येतील व लहान बालकांसाठीं खेळण्याची कोणती सोय केली आहे तें सांगितलें. झालें. लगेच वर्गांत एकमतानें ठरलें कीं, मि. मोझेस यांना एक पत्र लिहून बालकांसाठीं ते जें कार्य करीत आहेत त्याबद्दल आभार प्रदर्शित करावयाचे. आमच्या शाळेच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेंत देखील अशींच क्रीडांगेंण तयार करण्यास उद्यानाधिकाऱ्यांना स्फूर्ति यावी ही देखील त्या पत्रापाठीमागें कांहींशी आशा होती. या पत्राला अत्यंत कौतुकास्मक असें उत्तर आलें व अल्पावधींतच 'वॉशिंग्टन स्क्वेअर' मध्यें छोटीं छोटीं क्रीडांगणें तयार करण्यांत आलीं, या क्रीडांगणांत अगदीं लहान बालकांसाठीं वाळूचे खड्डे तयार करण्यांत आले. या बाबतींत या सात वर्षांच्या छोट्या बालकांच्या पत्राचा मि. मोझेस यांच्यावर कांहीं परिणाम झाला कीं काय, याचा आम्ही केव्हांच तपास केला नाहीं. मात्र या बालकांनीं आपलें नागरिकत्वाचें कर्तव्य बजावलें होतें.

अशा प्रकारें या बालकांत सामाजिक जाणीव निर्माण होत असली तरी त्यांना लिहिणें, वाचणें व गणित हे विषय शिकविण्यास प्रारंभ करण्याला अजून कांहीं अवधी होता. गणित विषयानें त्यांच्या जीवनांत स्वाभाविकपणेंच प्रवेश केला. शाळेंतील वस्तु-भांडारांतून वस्तु विकत घेतांना व सहलींच्या वेळीं गाड्यांचें भाडें देतांना हीं बालकें नाण्यांचा व्यवहार करीत होतींच. वर्गासाठीं झालेल्या खर्चाचा हिशेब लिहिण्यास तीं शिक्षिकांना मदत करीत होतींच. शहरांतील रस्त्यांवर असलेल्या पाट्यांवर व वाहनांच्या परवाना फलकांवर, सिनेमा व नाट्यगृहांच्या तिकिटांवर, तसेंच बस, बोट व आगगाड्या यांच्या तिकिटांवर नंबर लिहिलेले होतेच व त्यांच्याशीं या बालकांचा परिचयही झाला होता. बँका अस्तित्वांत आल्या व बँकांतून

पैसे काढण्यापूर्वी तींत पैसे ठेवावे लागतात ही गोष्ट कांहीं बालकांना माहीतही झाली होती. आणि शेवटीं हीं बालकें शहरांत मालविक्रीचा जो व्यवहार करीत होतीं त्याबद्दल खऱ्याखुऱ्या किंमती ठरवून टाकण्या-संबंधीं त्यांनीं मोठ्या गंभीरपणें विचार चालविला. हा विचार तीं इतक्या गंभीरपणें करीत होतीं कीं, नुसत्या किंमतींच्या बाबींनेंच कित्येक वेळां त्यांच्यांत चर्चा सुरू होई व तत्संबंधीं संशोधनही सुरू होई.

गेल्या कांहीं वर्षांपासून पालकांनीं आम्हांला वारंवार एकच प्रश्न विचारून भंडावून सोडलें होतें व तो प्रश्न म्हणजे "माझें बालक भूगोल शिकण्यास केव्हां आरंभ करणार आहे?" होय. वास्तविकपणें पहातां या बालकांनीं आपल्या वयाच्या सातव्या वर्षांत पदार्पण करण्यापूर्वींपासूनच एकप्रकारें भूगोलाचा अभ्यास करण्यास आरंभ केला होताच. सहा वर्षांच्या वयाच्या बालकांच्या वर्गांत असतां त्यांनीं खडूच्या रेषा ओढून हडसन नदी व पूर्वेकडील नदी व वरच्या बाजूकडील न्यू यॉर्कचा उपसागर काढून नकाशे तयार केले होतेच. आपल्या सहलींवर गेलें असतां त्या त्या स्थळा-पासून आपापलीं घरें कोठें आहेत व घरांपासून आपण कोठल्या स्थळीं आहोंत, याची त्यांना जाणीव असे. ह्या भूमिरूपी नकाशाचें कागदावरल्या नकाशांत परिवर्तन करणें ही कांहीं आतां फारशी कठीण गोष्ट नव्हती.

स्वयंपाक करण्याबरोबरच बाजारहाट करण्याची जबाबदारी असल्यानें हें काम या बालकांना 'खरें काम' अशा प्रतिष्ठेचें वाटूं लागलें व या कामांत त्यांनीं चांगलेंच यश मिळविलें. सफरचंदाची पचडी तयार करण्या-पासून पाव वगैरे तयार करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आणि ज्या वेळीं त्यांनीं स्वतः तयार केलेला रुचकर पाव आपापल्या घरीं नेला त्या वेळीं तो या बालकांनींच तयार केला आहे यावर त्यांच्या पालकांचा विश्वा-सच बसेना.

वेशपरिवर्तन हा या बालकांचा नाट्याविष्कार ठरला. बव्हंशीं नाट्यगृह हा त्यांच्या शहराच्या खेळांतील एक भाग होता व त्यांच्यापैकीं कांहीं बालकें 'लहानग्या लोकां'चा खेळ लावीत व त्यासाठीं या दाटुमाटूच्या शहरांतील लाकडी रहिवाश्यांपैकीं कांहींना नट म्हणून बोलाविण्यांत येई व

बाकीच्यांना खेळण्याच्या नाट्यगृहांत ढकलण्यांत येई. लौकरच तीं सर्व बालकें नाटकाच्या खेळाला सुरवात करीत. या नाटकाचा प्लॉट अगदीं साधासुधा असे. त्यासाठीं तीं संगीत शिक्षिकांना नृत्यें, गीतें, व प्रासंगिक संगीत बसविण्यास सांगत. त्यांनीं स्वतः नाटकासाठीं लागणारे कपडे व सीनसीनरीचे पडदे तयार केलेले असत व आपल्या या नाटकाचा खेळ पहाण्यासाठीं सहा वर्षांच्या व आठ वर्षांच्या बालकांना बोलाविण्यांत येई.

या नाटकानंतर अगदीं शांततेची वेळ असे, त्या वेळीं प्रत्येक बालक आपापल्या मनाप्रमाणें कांहीं ना कांहीं तरी उद्योग करीत राही. कोणी चित्रें काढी, कोणी शाडूच्या निरनिराळ्या आकृति बनवी, कोणी एकादी गोष्ट सांगे आणि नंतर तीं सर्व आपण स्वतः गोष्टी व गाणीं रचून लिहून काढीत, पुस्तकालयांत जात व मनोरंजनासाठीं पुस्तकें वाचीत.

---

## ८. अष्टवर्षीय काम पत्करतात

अष्टवर्षीयांचें ठोकळ्यांसंबंधींचें ममत्व कधीं कधीं मोकाट सुटतें आणि ठोकळ्यांनीं बांधकाम करण्यापेक्षां ते बालिशपणाकडे वळतात. त्या बालिशपणाचा अंत फेंकाफेंकी आणि शेवटीं मारामारी यांच्यांत झाल्याविना राहत नाहीं. ते अजाणता आपल्या प्रत्येक कृतींतून असें अभिव्यक्त करीत असतात कीं त्यांना आतां या पोरकट खेळांचा कंटाळा आला असून ते कोणत्याहि खरोखरच्या कामासाठीं कंबर कसायला तयार आहेत. त्यांनीं आम्हांला आपल्या निःशब्द भाषेंत जेवढें सांगतां येणें शक्य होतें, तेवढें सांगून काम करण्याची तयारी दर्शविली. आपल्या घराच्यापुढें लेमनविक्रीची सोय करण्याची किंवा एक पेनी तिकीट लावून खेळ करून दाखविण्याची माझी लहानपणीची वांछा कदाचित् मला आठवली असावी. या वयाच्या मुलांच्यामध्यें खात्रीनें हेंच चाललेलें असतें. या वयाच्या-अष्टवर्षीय बालकांच्या मनांतल्या कार्यरत होण्याच्या प्रामाणिक आतुरतेचा फायदा तत्परतेनें घेण्यास आईबाप पिढयानुपिढया तयार असतात. सुमारें आठ वर्षांच्या वयांतच आपण थोडे फार सहाय्यकर्ते होण्यास प्रारंभ करतों.

पण आपण थोरांना हलक्या वाटणाऱ्या व नावडत्या अशा कामापासूनच सुरवात करतों; आणि तें काम आपल्याला किती तरी महत्त्वाचें वाटतें. खेळ रंगांत आला असतांना आम्हांला निरोप पोंचविण्यासाठीं बोलावण्यांत येई. आम्हीं गाजरें किसलीं, बटाटे सोलले.

आम्हांला जर स्वयंपाक करण्याची संधि मिळाली असती तर आम्हीं आमचीं ताटें देखील घांसलीं, धुतलीं असतीं. पण स्वयंपाकाच्या कलेसाठीं थोडेसें आधीं त्यासंबंधीं शिकावें लागलें असतें. तसें करतांना अन्नसामुग्रीची नासधूस झाली असती व स्वयंपाकघरांत गोंधळ उडाला असता. नेहमीच्या कंटाळवाण्या कामापेक्षां वेगळेंच पण साहसी कल्पक वृत्तीला चालना देणारें काम मीं या अष्टवर्षीयांसाठीं शोधण्याचा निर्धार केला होता. हे अष्टवर्षीय आतां व्यावहारिक दृष्ट्या बालपणाच्या तथाकथितामधून पार पडले होते.

त्यांना शाळेचें दुकान चालविण्यासाठीं देण्यांत यावें अशी सूचना त्यांच्या शिक्षिकेकडून आली. तिनें त्यांना लुटुपुटीच्या दुकानाचा खेळ खेळतांना बघितलें होतें. आणि त्यांना खरेदी–विक्रीच्या कार्यपद्धतीमध्यें गोडी वाटत असल्याचें तिला दिसून आलें होतें. हीं बालकें घडाघडा वाचूं शकत नसत व त्यांना फारच थोडें लेखी गणित येत होतें. शाळेला लागणाऱ्या मालाची खरेदी–विक्री करतांना त्यांना हें सगळें शिकतां येण्याजोगें होतें.

पहिल्यांदा बिकट सुतार–काम आणि अंगमेहनतीची सुसंबद्ध योजना यांचें बरेंच काम उभें झालें. शाळेच्या सभागृहाकडे उघडणारी खिडकी असलेल्या वर्ग भरणाऱ्या खोलीचा एक कोपरा दुकानासाठीं विभागण्यांत आला.

खिडकीची पाळी मागील टेबलासह 'कॉउन्टर'प्रमाणें उपयोगांत आणतां आली. मुलांनीं दुकानांतल्या कोपऱ्याच्या भिंतीशीं रांगेनें फडताळें लावून ठेवलीं; त्यांत कागद, पेन्सिली, क्रेयान्स, चित्रें काढण्याचे कागद, अंगुस्तान, रंग, ब्रश, वगैरे ठेवण्यांत यावयाचे होते.

त्यांनीं आपल्याला लागणाऱ्या मालांत गुंतविण्यासाठीं पैसा हवा असा निर्णय घेतला, आणि एखाद्या कसलेल्या व्यापाऱ्याच्या बुद्धीनें तो पैसा शाळेच्या कार्यालयाकडून कर्जाऊ घेतला. कार्यालय त्यांची बँक बनली व शाळेला लागणाऱ्या सर्व वस्तू त्यांच्यासाठीं घाऊक दरांनीं विकत घेण्यांत आल्या. त्याचप्रमाणें घाऊक विक्री करणाऱ्या एका दुकानाचें सहकार्य

मिळविलें. त्या दुकानांत यांना घाऊक भावांत लागेल तेवढा कमी माल देखील मिळत असे आणि शिवाय त्यांची आगामी मागणी पुरी करण्याच्या दृष्टीनें त्यानें पुष्कळच माल भरून ठेवला होता.

अशा रीतीनें अष्टवर्षीयांचें दुकान निघाल्यावर आणि तेथें विक्री सुरू झाल्यावर देखील, या साहसी योजनेंत मुलांच्या कल्पकतेमुळें आणखीही सुधारणा होत गेल्या. बाहेरील स्टेशनरी दुकानांना दिलेल्या भेटींच्यामुळें आपल्या 'स्टॉक'ची काळजी कशी घ्यावी हें तीं शिकलीं. स्वयंसेवकांनीं आपल्या दुकानांतल्या उणीवा भरून काढण्यासाठीं कष्ट घेतले. कारकुनांना बसायला लागणारीं स्टूल्स, एक रोकड-पेटी, वरच्या फळ्यांवर ठेवलेल्या वस्तूंची चिमुकल्या विक्रेत्यांना काढघाल करतां यावी म्हणून लागणारी शिडी, वेगवेगळ्या आकाराचे वश ठेवण्यासाठीं करण्यांत आलेली निरनिराळे खण असलेली पेटी आणि रोकड–कारकुनासाठीं लागणारें खणाचें टेबल या सगळ्या जिनसा त्यांनीं बनविल्या. लहानग्या दुकानदारांना वाचन, लेखन व हिशेब यांच्यांत प्राविण्य मिळविणें आवश्यक झालें.

पहिल्यांदा विक्रीला आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तूंची व त्यांच्या किंमतींची यादी करावी लागली. प्रत्येक अष्टवर्षीयानें अतिदक्षतेनें त्याची नक्कल करून घेतली व शाळाभर त्या वांटण्यांत आल्या. शिवाय एक सविस्तर मोठ्या किंमतींची यादी बालकांच्या उपयोगासाठीं दुकानांत लावण्यांत आली.

दुहेरी विक्रीपत्रें लिहिण्याची पद्धति त्यांना त्यांच्या शिक्षिकेनें शिकवली. या व्यापारी चोपडीवर कार्बन कागद घालून लिहीत बसण्याचा कंटाळा बालकांना कधींही आला नाहीं, असेंच हुबेहुब दुहेरी विक्रीपत्र बड्यांच्या दुकानांत देखील देण्यांत येत असे. गणिताच्या परवचाऱ्या वेळीं जीं उदाहरणें तीं सोडवींत, तींच येथें त्यांना दुकानांत उपयोगी पडत.

जर एकादेंच बालक गुणाकाराचीं कोष्टकें शिकण्यांत मंद आहे असें आढळून आलें, तर त्याच्या गटांतलीं बालकें मिळून त्याला लवकरच सुधारून घेत. एक लहान मुलगी इतकी मागें रेंगाळली होती कीं तिच्यानें विक्रीपत्रें जलद लिहिलीं जात नसत त्यामुळें गिऱ्हाईकें कातावलीं नसलीं

तरी कुरकुरूं लागली. तिला साधीं कोष्टकें देखील येत नाहींत असें कळून आल्यावर, तिच्या कामांतल्या सहकाऱ्यांनीं तिच्याकडून काम काढून घेतलें. एका रात्रींतून तिनें कांहीं कोष्टकें शिकून घेतलीं. बऱ्याचशा अष्टवर्षीयांना लिहिण्यावाचण्याची व आंकडेमोडीची फारशी आवड नसते हें लक्षांत ठेवलें पाहिजे परंतु दुकानाचें आकर्षण न आवरतां येण्याजोगें व नेत्रांना दिपविणारें होतें आणि त्याच्यांतच वस्तूंची यादी वाचण्याची, विक्रीचे हिशेब व ताळेबंद लिहिण्याची आणि विक्रीपत्रें लिहून तयार करण्याची गरज गुरफटलेली होती. तुम्हांला जर हें सगळें येत नसेल, तर तुम्हांला दुकानांत काम करण्याची मजा लुटतां यायची नाहीं. दुकानांतलें काम, नमुने काढणें, ड्राइंग, रंग भरणें, यांसारखीं सोपीं कामें तुलनेच्या दृष्टीनें —चार अशांची किंमत प्रत्येकीं सहा सेंट प्रमाणें काढणें, किंवा सात सेंट एका नोटबुकाला व पांच सेंट एका पेन्सिलीला तर मिळून किती हें काढणें, —याचें शिक्षण अतिशय महत्त्वाचें व तांतडीचें वाटूं लागलें.

एक रोकड—कारकून व इतर दोनतीन कारकून यांची मिळून एक दुकान समिती होती व ती पाळीपाळीनें बदलत असे व दुकान दररोज सकाळीं अर्धा तास उघडें राहत असे. दुकानाच्या संचांतली प्रमुख व्यक्ति म्हणजे रोकड-कारकून. प्रारंभीं त्याला शिक्षिकेची मदत ताळेबंद जमविण्यासाठीं लागत असे. बऱ्याचशा बालकांनीं नंतर एका वर्षाच्या अवधींत या कामीं प्राविण्य मिळविलें व मंद गतीनें शिकणारांना मदत केली, तें कसेंही असलें तरी या सर्वच बालकांनीं वस्तू व पैसे यांची देवघेव करण्याचा, विक्रीपत्रें लिहून त्यांच्या वरच्या बेरजा करण्याचा आणि व्यावसायिकपणांतल्या कार्याचा भार उचलून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली.

दर आठवड्याला प्रत्येक बालकाचा ताळेबंद बघून घेण्यांत येई आणि मग जमाखर्च तपाशीत. त्या आठवड्याचा रोकड—कारकून खोलीच्या पुढें उभा राहून मोठ्या आवाजांत आपल्या हिशेब—बुकांतून दररोजच्या विक्रीची एकूण रक्कम वाचून दाखवायचा आणि ती प्रत्येक बालक आपल्या कागदावर उतरून घ्यायचा; मग त्याची बेरीज केल्यावर गेल्या आठवड्याच्या शिल्कींत ती मिळवायचा. मग वर्गाचा खजिनदार त्याच

पद्धतीनें आठवडाभर झालेल्या खर्चाचा तपशील वाचून दाखवायचा. हा देखील तसाच एकूण बेरीज केल्यावर एकूण रकमेंतून वजा करण्यांत येई. अशा रीतीनें हाताशीं असलेल्या शिलकेचा उतारा नमूद होई.

मग शिलकेंत असलेली रक्कम प्रत्यक्ष मोजून घेण्याचा आणि त्याचा कागदी आंकड्यांशीं ताळमेळ जमविण्याचा रोमहर्षक प्रसंग आला. कागदावरील रकमेचे आंकडे आणि पैशाच्या पेटींतलीं नाणीं बघणें म्हणजे देखील त्या बालकांच्या उद्योगांतला महत्त्वाचा प्रसंग होता. हा विजयसमारंभ साजरा करण्यासाठीं बालकांनीं आपल्या न्याहारीची सामुग्री जेवणघरांतून स्वतःच्या वर्गाच्या खोलींत आणली व एक खासगी मेजवानी झोडली.

दुकान अर्धा तास व्यवहार करीत असे, तरी त्याच्या व्यतिरिक्त त्याच्यावर बरेचसे बिकट कष्ट करण्याची गरज भासत असे. घाऊक दुकानांतून आणलेल्या मोठ्या बरण्यांतून लहानसहान बरण्यांमध्यें रंग भरून ठेवावा लागत असे, कागद देखील असेच मोजून ठेवून विक्रीला तयार ठेवावे लागत, फडताळें आणि कपाटें सतत व्यवस्थितपणें भरून ठेवावीं लागत, खास विक्री किंवा सवलतीच्या दरांचा बदल जाहीर करण्यासाठीं वारंवार मोठीं पत्रकें किंवा अक्षरें लिहिणें आवश्यक असे. त्याचप्रमाणें घाऊक दुकानांचीं बिलें चुकतीं करणें, माल विकत घेण्यासंबंधीं पोस्टानें येणारीं पत्रें वाचून त्यांना माल व बिलें पाठविणें, व्यवसायविषयक पत्रव्यवहार करणें, या गोष्टीही कराव्या लागत.

दुकानासाठीं माल विकत घेणें हें देखील एक कामच होतें. दर आठवड्याला वेगवेगळीं मुलें हा खरेदीचा उद्योग करीत व त्यासाठीं आपल्या विद्यार्थी–शिक्षिकेबरोबर घाऊक विक्रीच्या दुकानांत जात. घरची परवानगी घेऊन तीं स्वतः देखील जाण्याच्या योग्यतेचीं बनलीं होतीं. वेळ वांचविण्यासाठीं टेलिफोन वापरण्याची कला देखील ते शिकले होते. त्यांनीं इतक्या तन्मयतेनें व व्यवस्थितपणें आपलें काम केलें नसतें तर आमच्या घाऊक विक्रीच्या दुकानांनीं स्वतःच्या सुरक्षितपणासाठीं कांहीं तरी तक्रार केली असतीच, पण तशी एकही तक्रार आली नाहीं. सांगितल्याशिवायच

तरी कुरकुरूं लागली. तिला सावी कोष्टकें देखील येत नाहींत असें कळून आल्यावर, तिच्या कामांतल्या सहकाऱ्यांनीं तिच्याकडून काम काढून घेतलें. एका रात्रींतून तिनें कांहीं कोष्टकें शिकून घेतलीं. बऱ्याचशा अष्टवर्षीयांना लिहिण्यावाचण्याची व आंकडेमोडीची फारशी आवड नसते हें लक्षांत ठेवलें पाहिजे परंतु दुकानाचें आकर्षण न आवरतां येण्याजोगें व नेत्रांना दिपविणारें होतें आणि त्याच्यांतच वस्तूंची यादी वाचण्याची, विक्रीचे हिशेब व ताळेबंद लिहिण्याची आणि विक्रीपत्रें लिहून तयार करण्याची गरज गुरफटलेली होती. तुम्हांला जर हें सगळें येत नसेल, तर तुम्हांला दुकानांत काम करण्याची मजा लुटतां यायची नाहीं. दुकानांतलें काम, नमुने काढणें, ड्राइंग, रंग भरणें, यांसारखीं सोपीं कामें तुलनेच्या दृष्टीनें —चार ब्रशांची किंमत प्रत्येकीं सहा सेंट प्रमाणें काढणें, किंवा सात सेंट एका नोटबुकाला व पांच सेंट एका पेन्सिलीला तर मिळून किती हें काढणें, —याचें शिक्षण अतिशय महत्त्वाचें व तांतडीचें वाटूं लागलें.

एक रोकड—कारकून व इतर दोनतीन कारकून यांची मिळून एक दुकान समिती होती व ती पाळीपाळीनें बदलत असे व दुकान दररोज सकाळीं अर्धा तास उघडें राहत असे. दुकानाच्या संचांतली प्रमुख व्यक्ति म्हणजे रोकड-कारकून. प्रारंभीं त्याला शिक्षिकेची मदत ताळेबंद जमविण्यासाठीं लागत असे. बऱ्याचशा बालकांनीं नंतर एका वर्षाच्या अवधींत या कामीं प्राविण्य मिळविलें व मंद गतीनें शिकणारांना मदत केली, तें कसेंही असलें तरी या सर्वच बालकांनीं वस्तू व पैसे यांची देवघेव करण्याचा, विक्रीपत्रें लिहून त्यांच्या वरच्या बेरजा करण्याचा आणि व्यावसायिकपणांतल्या कार्याचा भार उचलून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली.

दर आठवड्याला प्रत्येक बालकाचा ताळेबंद बघून घेण्यांत येई आणि मग जमाखर्च तपाशीत. त्या आठवड्याचा रोकड—कारकून खोलीच्या पुढें उभा राहून मोठ्या आवाजांत आपल्या हिशेब—बुकांतून दररोजच्या विक्रीची एकूण रक्कम वाचून दाखवायचा आणि ती प्रत्येक बालक आपल्या कागदावर उतरून घ्यायचा; मग त्याची बेरीज केल्यावर गेल्या आठवड्याच्या शिलकींत ती मिळवायचा. मग वर्गाचा खजिनदार त्याच

पद्धतीनें आठवडाभर झालेल्या खर्चाचा तपशील वाचून दाखवायचा. हा देखील तसाच एकूण बेरीज केल्यावर एकूण रकमेंतून वजा करण्यांत येई. अशा रीतीनें हातार्शी असलेल्या शिलकेचा उतारा नमूद होई.

मग शिलकेंत असलेली रक्कम प्रत्यक्ष मोजून घेण्याचा आणि त्याचा कागदी आंकड्यांशीं ताळमेळ जमविण्याचा रोमहर्षक प्रसंग आला. कागदावरील रकमेचे आंकडे आणि पैशाच्या पेटींतलीं नाणीं बघणें म्हणजे देखील त्या बालकांच्या उद्योगांतला महत्त्वाचा प्रसंग होता. हा विजय-समारंभ साजरा करण्यासाठीं बालकांनीं आपल्या न्याहारीची सामुग्री जेवण घरांतून स्वतःच्या वर्गाच्या खोलींत आणली व एक खासगी मेजवानी झोडली.

दुकान अर्धा तास व्यवहार करीत असे, तरी त्याच्या व्यतिरिक्त त्याच्यावर बरेचसे बिकट कष्ट करण्याची गरज भासत असे. घाऊक दुकानांतून आणलेल्या मोठ्या बरण्यांतून लहानसहान बरण्यांमध्यें रंग भरून ठेवावा लागत असे, कागद देखील असेच मोजून ठेवून विक्रीला तयार ठेवावे लागत, फडताळें आणि कपाटें सतत व्यवस्थितपणें भरून ठेवावीं लागत, खास विक्री किंवा सवलतीच्या दरांचा बदल जाहीर करण्यासाठीं वारंवार मोठीं पत्रकें किंवा अक्षरें लिहिणें आवश्यक असे. त्याचप्रमाणें घाऊक दुकानांचीं बिलें चुकतीं करणें, माल विकत घेण्यासंबंधीं पोस्टानें येणारीं पत्रें वाचून त्यांना माल व बिलें पाठविणें, व्यवसायविषयक पत्रव्यवहार करणें, या गोष्टीही कराव्या लागत.

दुकानासाठीं माल विकत घेणें हें देखील एक कामच होतें. दर आठवड्याला वेगवेगळीं मुलें हा खरेदीचा उद्योग करीत व त्यासाठीं आपल्या विद्यार्थी-शिक्षिकेबरोबर घाऊक विक्रीच्या दुकानांत जात. घरची परवानगी घेऊन तीं स्वतः देखील जाण्याच्या योग्यतेचीं बनलीं होतीं. वेळ वांचविण्यासाठीं टेलिफोन वापरण्याची कला देखील ते शिकले होते. त्यांनीं इतक्या तन्मयतेनें व व्यवस्थितपणें आपलें काम केलें नसतें तर आमच्या घाऊक विक्रीच्या दुकानांनीं स्वतःच्या सुरक्षितपणासाठीं कांहीं तरी तक्रार केली असतीच, पण तशी एकही तक्रार आली नाहीं. सांगितल्याशिवायच

तीं फडताळें व फळ्या घासून पुसून स्वच्छ ठेवीत आणि अतिरेकीपणानें कधीं कधीं फरशी देखील पुसून काढीत, मग त्याच्या आधीं तेथला झाडूवाला सगळी फरशी स्वच्छ करून गेला असला तरी, तीं आपलें हें कार्य करीत.

एखाद्या यशस्वी योजनेंत अनपेक्षितपणें एक दोनदां नफ्याचा हिस्सा वांटण्यांत येई. याचा उद्देश सबंध शाळेंत दुकानाबद्दलची जबाबदारीची भावना पसरविण्याचा असे. प्रत्येक गटाला आतां स्वतःच्या खर्चाची रक्कम मिळत असे. ही रक्कम पालकांनीं बालकांच्या गरजेच्या वस्तू घेण्यासाठीं दिलेल्या निधीमधून घेण्यांत येई. ऑफिसमधून आणखी पैसे घेण्यापूर्वी आधीं घेतलेल्या पैशाच्या खर्चाचा तपशील प्रत्येक गटाला द्यावा लागत असे. अर्थातच प्रत्येक गटाला स्वतःचा जमाखर्च ठेवणें भाग पडे. नव्या गटासाठीं शिक्षिका हिशोबाचें काम सांभाळीत, पण जुन्या गटांना प्रत्येकीं आपला स्वतःचा खजिनदार ठेवावा लागे, त्याची मुदत फक्त आठवडा-भरच असे. जर एखादा खजिनदार मंद किंवा बिनहिशेबी निघाला तर त्या गटाला खर्चासाठीं पुढचा वांटा मिळायला ताटकळत राहावें लागे. अर्थातच ही गैरसोय कोणीही मुकाट्यानें सहन करायला तयार नसे. दुसरें असें कीं कधीं कधीं खजिनदार देखील गटाच्या खर्चाला आळा घालण्याचा प्रयत्न करून उधळपट्टी थांबवीत असे.

आमचीं पहिल्या गटवारीचीं कामें प्रचंड यशांत परिणत झालीं. बालकांच्या समाधानामुळें जरा देखील संशयाला जागा उरली नाहीं. आपल्या दुकानामधील कांहीं वस्तूंचे मूळ शोधण्याच्या जिज्ञासेमुळें तीं माहिती मिळविण्याच्या मागें वाहवत गेलीं. आपल्याला अत्यंत महत्त्वाची वस्तु वाटणाऱ्या कागदाचें मूळ शोधण्यासाठीं तीं कागदाची गिरणी बघायला गेलीं. तेथें त्यांनीं चोथ्यापासून तों तयार कागद हातीं पडेतोंपर्यंतच्या सर्व कृती नीट बघून घेतल्या. गिरणीच्या मुकदमानें त्यांना चोथा करण्यासाठीं लागणारीं झाडें आदि रान्डाक्स व कानडा येथें होतात असें सांगितलें होतें. शाळेंत परत आल्यावर त्यांनीं नकाशावरून तो चोथा आणण्याचे रस्ते—लोह आणि जलमार्ग—नीट बघून घेतले आणि त्यासंबंधीच्या

मोठ्यांनीं वाचलेल्या कथा श्रवण केल्या. स्वतः तशाच गोष्टी रचल्या, संगीताच्या तासांत त्याचीं गाणीं म्हटलीं, अभिनय करून दाखविला, विज्ञानाच्या तासाच्या वेळीं चिंध्यापासून कागद तयार करण्याचा प्रयोग करून बघितला.

आपल्या दुकानामुळें त्यांना आपल्या पूर्वींच्या काळांतल्या दुकानांचे प्रकार तपासून बघण्याची इच्छा झाली, आपल्या मॅनहॅटन बेटावरल्या पहिल्या दुकानाचा इतिहास त्यांनीं समजून घेतला. रेड इंडियनांमधल्या वस्तूंच्या अदलाबदली पद्धतीबद्दल आणि 'फर'च्या व्यवसायाच्या केंद्राबद्दल माहिती मिळविली. मॅनहॅटन बेटावर पहिल्यांदा वसाहत करणाऱ्या डच लोकांच्या ऐतिहासिक कथा त्यांनीं स्वतःच वाचल्या; कांहीं अधिक निराळे वृत्तांत वर्गांत शिक्षिकांनीं वाचून दाखविले. त्यांनीं गोरे आणि रेड इंडियन्स यांच्यामधील संबंधांबद्दलची माहिती गोळा केली. पुन्हां त्यांनीं नकाशांचा आधार घेऊन फरच्या व्यापारी लोकांचे मार्ग काढले व त्यांची तुलना आधुनिक लोह मार्गांशीं केली. मार्ग निश्चित करण्याच्या बाबतींत आडव्या आलेल्या प्रत्येक नदीवर व पहाडावर त्यांनीं खुणा केल्या. त्यांनीं हडसन नदीवर डच व्यापाऱ्यांना, सेंटलॉरेन्सवर फ्रेंच लोकांना आणि न्यू इंग्लंडमध्यें इंग्रजांना होणाऱ्या फायद्यांचा तौलनिक दृष्ट्या विचार केला आणि स्वतःच्या मतांना मग नकाशांची पुष्टि मिळवून घेतली.

बालकांना स्वतःचा खेळ आणि काम यांच्या मधला तोल सांभाळतां येऊं लागला. आंगणांत तीं रेड इंडियन्सचा आणि फर गोळा करणाऱ्यांचा खेळ खेळूं लागलीं, घरांत त्यांनीं डच कुटुंबाच्या संसाराचा खेळ खेळणें सुरू केलें. पोशाख तीं स्वतःच्या मनानें तयार करीत. कधीं कधीं महॉक खोऱ्यांत 'फर'चा तलास लावण्यासाठीं गेलेल्या बापाच्या कथेचा धागा घेऊन तीं पुढें प्रवासाला निघालेल्या आणि जंगलांत वसाहत करणाऱ्या कुटुंबाचें सोंग आणीत. मोठ्यांनीं वाचलेल्या कथासंपत्तीची पार्श्वभूमि त्यांना मिळत असे. त्यांनीं या आपल्या नव्या अनुभवांचीं चित्रें काढलीं, त्यांच्यावर नाच बसविले, गाणीं रचलीं व त्या नमुन्याचें वातावरण निर्माण करण्याचा यत्न केला.

---

## ९. बालकांसाठीं अधिक कार्यक्रम

आठ वर्षांच्या बालकांच्या गटानें एक वर्षाच्या ( शालेय ) काळापावेंतोंचा दीर्घ मुदतीचा एकादा मोठ्या स्वरूपाचा कार्यक्रम हातीं घेऊन तो पार पाडण्यास आपण समर्थ आहोंत; इतकेंच नव्हे तर असा कार्यक्रम म्हणजे सर्व प्रकारच्या शिक्षणाची एक स्वाभाविक पायरी आहे असें सिद्ध केल्यानंतर ही चैतन्यमय कल्पना वरच्या वर्गांत देखील पसरत जाणें अपरिहार्य होतें. आतां बालकांसाठीं अशा प्रकारचे कार्यक्रम असावेत किंवा नाहीं या प्रश्नाचा विचार करण्याचें प्रयोजनच नव्हतें; तर असे कार्यक्रम कोणते असावेत हाच प्रश्न होता.

आमच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें आम्हीं या प्रश्नाचें उत्तर त्या बालकांकरवींच मिळविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान या बालकांच्या मनांत त्यांचे स्वतःचे असे कांहीं प्रश्न निर्माण झाले होते. या वेळीं वसंत ऋतूचा काळ होता व पुढल्या वर्षीं तीं नवव्या वर्षांत पदार्पण करणार होतीं आणि याचाच त्यांच्या मनांत विचार चालला होता. आपला पुढला कार्यक्रम कोणता असावा ?

वस्तुसंग्रहालयापासून मिळालेल्या अनुभवांतून टपालानें येणाऱ्या मागण्यांची आवश्यकता भासूं लागली. तसेंच वर्गा–वर्गांतून येणारे ‘ टेलिफोन कॉल्स ’ हाही एक मोठा प्रश्नच होता. त्यासाठीं शाळेची टपाल–कचेरी स्थापन करणें ही आवश्यक गोष्ट ठरली. म्हणून या अध्वर्यूंनीं ( आतां हीं

बालकें स्वतःला असें म्हणवून घेऊं लागलीं होतीं ) शाळेची टपाल-कचेरी सुरू केली.

पोस्ट-ऑफिसला लागणाऱ्या आवश्यक साधनसामुग्रीची कल्पना येण्यासाठीं त्यांनीं पोस्ट-ऑफिसच्या एका जवळच्या शाखेला भेट दिली. त्यानंतर त्यांनीं आपल्या वर्गाच्या जागेतील एका कोंपऱ्याला आवश्यक ती जागा मापून घेऊन तेथें पोस्ट-ऑफिस बनविण्यास आरंभ केला. पोस्ट ऑफिससाठीं लागणाऱ्या शेल्व्हज, काऊंटर, लहान तोंडांच्या खिडक्या, पैशांची पेटी व प्रत्येक मजल्यासाठीं एक टपाल पेटी आदि सामान बनविण्यासाठीं तीं खपूं लागलीं. शाळेमध्यें वापरण्यासाठीं छापाचीं पाकिटें तयार करण्याचे त्यांनीं प्रयोग केले व लिनोलियमच्या ( कॅन्व्हासवर अळशीच्या तेलाचीं जाड पुटें चढवून तयार केलेला चिवट पदार्थ ) चकत्या कापून व त्या एका मूठ बसवलेल्या ठोकळ्यावर बसवून दोन ठसे तयार केले-एक पहिल्या वर्गाच्या टपालासाठीं व दुसरा दुसऱ्या वर्गाच्या टपालासाठीं ! नंतर त्यांनीं टपाल एकत्र करण्याच्या व तासा-तासाला टपालाचा बटवडा करण्याच्या वेळा निश्चित केल्या. तसेंच टपालाचें सामान विकण्यासाठीं रोज अर्धा तास पोस्ट-ऑफिस उघडण्यांत येऊं लागलें.

कालांतरानें एकामागून एक येणाऱ्या बालकांच्या महत्त्वाकांक्षी गटांनीं पोस्ट-ऑफिसाच्या योजनेंत नवीन नवीन सुधारणा घडवून आणल्या. शिक्षिकांच्या, पालकांच्या व शाळेच्या ऑफिसच्या सोयीसाठीं त्यांनीं अमेरिकेचीं पोस्ट-तिकिटें, पोस्टाचीं कार्डें व पोस्टाचीं पाकिटें विकण्यास आरंभ केला. लौकरच त्यांनीं तांतडीच्या संदेशांसाठीं खास बटवड्याच्या योजनेचें उद्‌घाटन केलें. आणि शेवटीं सगळ्यांत अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी एक योजना त्यांनीं साकार केली ती म्हणजे ' पार्सल पोस्ट सर्व्हिस ' ची ! या योजनेला पालकांनीं ख्रिसमसच्या सणासारख्या प्रसंगीं मिठाई वगैरेसारख्या भेटींचीं पुडकीं पाठविण्यास सुरवात केली त्या वेळीं महत्त्व प्राप्त झालें. या कामाचा खरा हंगाम डिसेंबरमध्येंच असे. त्या वेळीं त्यांच्या या उत्साहाला पुरून उरण्याइतकें काम या बालकांना मिळत असे.

या अशा पुडक्यांचें वजन करणें, स्थानिक पोस्ट–ऑफिसांतून मिळविलेल्या व दर कायम केलेल्या पोस्टल–झोन चार्टवरून त्यांचा आकार करणें, तो आकार त्या पुडक्यांवर लिहिणें, पुडक्यांना त्या किंमतीचीं तिकिटें चिकटविणें व एवढें झाल्यानंतर तीं सर्व पुडकीं स्थानिक पोस्ट ऑफिसांत टपाल–रवानगीसाठीं घेऊन जाणें वगैरे कामें तीं करूं लागलीं. यायोगें त्यांना आपल्या देशाची बरीच माहिती झाली, देशांतील शहरें व गांवें यांची माहिती त्यांना झाली. तसेंच टपालानें पाठवावयाच्या पुडक्यांचा आकार वगैरे काढण्याच्या कामामुळें त्यांना गुणाकार वगैरेंचें चांगलेंच ज्ञान प्राप्त झालें.

वस्तु–संग्रहालयाच्या कामाची जाणीव करून घेण्यासाठीं त्यांनीं जशा शहरांतील मोठ्या स्टोअर्सची पहाणी केली तशीच आतां तीं पोस्ट–ऑफिसांत तेथील कामाची जाणीव करून घेण्यासाठीं अधूनमधून जाऊं लागलीं. केवळ स्थानिक पोस्ट–ऑफिस शाखेंतच तीं जात असत असें नव्हें तर ‘ रेल्वे–मेल ’ गाड्या, जहाजांच्या धक्क्यावरील पोस्ट-ऑफिसें व न्यू यॉर्क शहरांतील प्रमुख अशा पोस्ट–ऑफिसांत तीं जाऊं लागलीं. न्यूयॉर्क शहरच्या पोस्ट–मास्तरला त्यांनीं पोस्ट–ऑफिसला भेट देण्यासंबंधीची परवानगी मागण्यासाठीं एक पत्र लिहिलें होतें. या पत्राला उत्तर देतांना त्या पोस्ट–मास्तरनें एका अटीवर ही परवानगी देऊं केली होती व ती अट म्हणजे पोस्ट–ऑफिस पहाण्यापूर्वीं बालकांनीं त्याच्या ऑफिसांत जाऊन प्रथम त्याला मुलाखत दिली पाहिजे. या कामसू व मोठ्या पोस्ट–अधिकाऱ्यानें वेळांत वेळ काढून बालकांबरोबर त्यांच्या शाळेंतील पोस्ट–ऑफिसासंबंधीची चर्चा करण्यांत वेळ खर्च केला व नंतर त्या सर्वांची ‘ पोस्ट–ऑफिस-मदतगार ’ म्हणून नोंद केली. त्यानें त्यांना पत्राला चिकटविण्याचें तिकीट कसें चुकीच्या रितीनें चिकटविलें जातें, अपूर्ण व न वाचतां येण्यासारखे पत्ते कसे लिहिले जातात, तसेंच आणखीहि कांहीं निष्काळजी गोष्टी दाखविल्या व त्यांच्यामुळें टपाल–रवानगीच्या कार्यांतील कार्यक्षमतेला कसा अडथळा निर्माण होतो याची माहिती करून दिली आणि पत्रावर योग्य ठिकाणीं

तिकिटें कशीं चिटकवावींत तथा नीट पत्ता कसा लिहावा या संबंधीच्या ज्ञानाचा प्रसार करण्याचें त्यांच्याकडून त्यानें अभिवचन घेतलें.

कालांतरानें आमची शाळा वाढल्यानंतर शिक्षिकांना वाटलें कीं, वस्तु-संग्रहालयाचें काम हें आठ वर्षें वयाच्या या बालकांच्या मानानें थोडेसें न झेंपण्यासारखें आहे व लगेच आठ आणि नऊ वर्षांच्या बालकांच्या कामांत फेरबदल करण्यांत आला. आठ वर्षांचीं बालकें आतां पोस्ट–ऑफिसचें काम करूं लागलीं होतीं; अर्थात् हें काम करतांना त्यांना माहिती–संकलन करण्यासाठीं फार दूर जाण्याचें प्रयोजन नव्हतें. तीं आपल्या घराच्या आसमंतांतूनच माहिती गोळा करूं लागलीं–आल्बानी, बोस्टन, फिलाडेल्फिया या शहरांकडे जाणारे टपालाचे मार्ग, त्या ठिकाणीं राहाणारे लोक व त्यांची जीवनपद्धति यांचीच माहिती प्रामुख्यानें तीं गोळा करूं लागलीं. नऊ वर्षांच्या बालकांनीं आपलें वस्तु–संग्रहालयाचें काम संभाळतांना सँटा फे ट्रेलसारख्या व्यापारी मार्गांचा अभ्यास करणें, या व्यापारी मार्गांवरील निवासी लोकांच्या पश्चिम बाजूकडील हालचाली, वस्तु-संग्रहालयांत येणाऱ्या वस्तूंचीं उत्पादन-स्थळें त्या उत्पादनाला आवश्यक असलेली भौगोलिक परिस्थिति इत्यादि गोष्टींचें ज्ञान मिळवूं लागलीं. पूर्वीच्या एतद्देशीयांनीं कागद, साबू, मेणबत्ती या वस्तू कशा बनविल्या याचे प्रयोग करून तीं पाहूं लागलीं. टेलिग्राफ व टेलिफोन यांत विजेचा उपयोग कसा करण्यांत येतो आणि स्टीम एंजिनांत वाफेचा उपयोग कसा केला जातो या संबंधीचे प्रयोग तीं बालकें आपल्या प्रयोगशाळेत करीत.

जर कोणती गोष्ट जास्त महत्त्वाची असेल तर ती म्हणजे बालकें काय शिकलीं ही नव्हे तर अभ्यास कसा करावा हें जें तीं शिकलीं तेंच होय–प्रत्यक्षपणें वास्तविक बाबी कशा संकलित करावयाच्या हें तीं त्यांना आढळणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून शिकलीं. तीं जें कांहीं शिकत होतीं तें सर्व नीट समजावून घेणें, त्याचा अविष्कार करणें, त्याचे आपल्या चित्रांत, गोष्टींत, गाण्यांत व खेळांत उपयोग करणें, तें सर्व अशा प्रकारें ग्रहण करावयाचें, आपल्या स्वतःच्या कार्यासाठीं शिकण्याच्या इच्छेनुसारच्या प्रेरणेनें तें अशा तऱ्हेनें आत्मसात करावयाचें कीं, जें जें मिळविलें तें तें सर्व निरंतर त्यांचेंच व्हावें.

दशवर्षीय बालकांसाठीं आम्हीं हात—छापखान्यानें छापण्याच्या कामाचा प्रयत्न करून पाहिला. परंतु त्याचें तंत्र हें या बालकांच्या मानानें अत्यंत कठीण असल्याचें आढळून आलें. सप्तवर्षीय बालकांच्या शिक्षिकेनें त्यांच्या-साठीं दुसरें कार्य शोधून काढलें व तें अत्यवश्यक व तांतडीचेंही होतें. नुकत्याच वाचण्यास शिकणाऱ्या बालकांसाठीं जें ' रीडींग चार्टस् ', ' फ्लॅश कार्ड्स् ' व वाक्यांच्या पट्ट्या हीं सर्व सामुग्री हातीं लिहून बनवावी लागत असल्यानें या कामाचा तिला बोज झाला होता; म्हणून हें काम आपल्या सूचनांप्रमाणें दशवर्षीय बालकांच्याकडून करवून घेण्यांत तिला एक प्रकारें आनंद वाटला असता. अर्थात् हें काम वाटतें तितकें सोपें नव्हतें, कारण त्यांत काळजीपूर्वक मोजमाप व सुंदर व परिपूर्ण अशीं अक्षरें काढलीं जाणें आवश्यक होतें. परंतु आपलें अक्षर हे आपल्यापेक्षां लहान असलेल्या बालकांकडून ' मॉडेल ' म्हणून वापरलें जाणार व शिक्षि-केला तिच्या कार्यांत आपणांकडून एके परी मदत केल्यासारखें होणार, या कल्पनेनें खूष होऊन दशवर्षीय बालकांनीं मोठ्या उत्साहानें तें काम आपल्या अंगावर घेतलें. त्यांच्यापेक्षां लहान वयाच्या बालकांना मदत करण्यासंबंधीची कोणतीही एकादी विनंति त्यांना करतांच त्या विनंती-नुसार काम किती सहानुभूतिपूर्वक तीं करीत असत हें पहाणें अत्यंत मनो-रंजक होतें. बालकें ज्या वेळीं माहिती संकलित करण्यासाठीं सहली काढीत त्या वेळीं त्यांना त्या त्या स्थळीं मोठ्या माणसांकडून जें स्वेच्छापूर्वक व विचारपूर्वक सहकार्य मिळे तसेंच हें होतें.

त्यांना मिळालेल्या या नवीन कामाबद्दल त्यांच्या शिक्षिकेलाही आनंद झाला. या कामाच्या योगें या बालकांना आपलें अक्षर सुधारण्यास व शाईचा वापर करण्याचें शिकण्यास संधि मिळेल या विचारानें तिला बरें वाटलें. मोज-माप घेणें व योग्य ती जागा सोडणें, आपल्या कामांच्या किंमती ठरविणें, यायोगें बालकांना जमाखर्चाव्यतिरिक्त गणिताचें अनुभवजन्य ज्ञान प्राप्त होईल व अपूर्णांकांशीं त्यांचा परिचय होईल. कौशल्याची बाब सोडली तरी लिहिण्याच्या व नोंदी करण्याच्या सरावानें अतिपूर्व व अतिप्राचीन अशा प्रकारचें एक सुस्थित क्षेत्र निर्माण होणार होतें; बालकांनींही या कामीं

चांगलीच तत्परता दाखविली. अजब वस्तुसंग्रहालयांत सहलीसाठीं गेलें असतां हीं बालकें नेहमीं ईजिप्तच्या पुराण-संग्रहाभोंवतींच अथवा मध्य-युगीन शस्त्रागाराभोंवतींच घोटाळत असत. तसेंच शाळेंतील पुस्तकालयांत तीं स्त्रीदाक्षिण्याच्या प्रणय-कथा शोधून त्या वाचण्यांत गर्क असत.

या वर्गांतील सर्व बालकांनीं किते गिरवायला प्रारंभ केला. विशिष्ट अक्षरें असलेल्या फलकाचें मोजमाप कसें घ्यावयाचें व तो कसा लिहून तयार करावयाचा यासंबंधीं त्यांना मार्गदर्शन करण्यांत येई.

बालकांनीं तयार केलेल्या या कामांच्या किंमती ठरविणें हा खरोखरीच एक अंकगणितशास्त्रविषयक कठीण प्रश्न होता. प्रत्येक बालक आपण लिहिलेल्या फलकावरील अक्षरांइतकींच अक्षरें दुसऱ्या एका कागदावर लिहून काढी व यासाठीं त्याला जो वेळ लागे तो वेळ मोजण्यांत येई. त्यानंतर सर्व बालकें सरासरी वेळ काढीत-तासाला अमुक इतकीं अक्षरें आणि नंतर दर तासीं पंधरा सेंट या शाळेनें मान्य केलेल्या दरानुसार अक्षरांच्या संख्येची किंमत काढण्यांत येत असे. यायोगें आपला वैयक्तिक वेळ न मोजतां आपल्या स्वतःच्या वेगानें प्रत्येक बालकाला आपलें काम उरकतां येई. या कामीं खर्च करण्यांत येणारा वेळ सूचनांनुसार बदलतां येई परंतु कोणत्याही दिवशीं कोणाही बालकानें लिहिण्याच्या कामीं एका तासापेक्षां जास्त वेळ कधींही खर्च केला नाहीं—क्वचित चाळीस मिनिटां-पेक्षां जास्त, तसेंच कधीं कधीं असलें कांहींही काम नसे. ज्या दिवशीं अशीं कांहींच कामें नसत त्या दिवशीं तीं सुंदर हस्ताक्षर काढण्याच्या सरावांत निमग्न असत. हें काम त्यांना फार आवडत असे व आपल्या नियुक्त कामाचाच तो एक भाग आहे अशा समजुतीनें तीं तें काम करीत.

अष्टवर्षीय बालकांचें वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याच्या आरंभापासूनच आम्ही एक तत्त्व कायम केलें होतें तें हें कीं, हीं बालकें शाळेचेंच काम करीत आहेत; अर्थात् त्यांना नियमित वेतन देण्यांत आलेंच पाहिजे. दर-तासीं पंधरा सेंट या प्रमाणें स्टोअर कीपर्स व पोस्टाचें काम करणाऱ्या बालकांना प्रत्येक महिन्याच्या शेवटीं प्रत्येकीं पंधरा सेंट मिळत असत, कारण साधारणतः प्रत्येक बालकाला महिन्यांतून फक्त एक तासच हें काम

करावें लागत असे आणि प्रत्येक महिन्याच्या शेवटीं आपल्या या पंधरा सेंट वेतनाचें पाकीट घरीं नेतांना त्यांना होणारें समाधान हें मोठ्या माणसांना आपला पगार घरीं नेतांना होणाऱ्या समाधानापेक्षां कोणत्याही प्रकारें कमी सुखावह नव्हतें.

दशवर्षीय बालकांना त्यांच्या कामाबद्दलचा मोबदला एकत्र करून देण्यांत येत असे व नंतर तीं तो आपापसांत वांटून घेत. ज्या वेळीं त्यांना आपलें काम हें तितकेसें फायदा देणारें नाहीं असें आढळून आलें तेव्हां त्यांनीं खिसमसचीं भेट—पत्रिका तयार करण्याचें काम सुरू केलें. तीं सर्वजण मिळून हें काम करीत असत. त्यासाठीं तीं आपल्यामधील कोणाकडे तरी बिझिनेस मॅनेजरचें काम सोंपवीत. या मॅनेजरनें काम मिळवून आणावयाचें व तें सर्व वर्गाला द्यावयाचें. तसेंच कोणातरी एकाकडे पैसे वसूल करण्याचें काम देण्यांत येत असे. यानें तयार झालेल्या कामाचे पैसे वसूल करावयाचे व त्याचा चोख हिशेब ठेवायचा.

लेखनाचें काम हीं दशवर्षीय बालकें मोठ्या आवडीनें करीत होतीं. परंतु आमच्या शिक्षकांनीं मात्र त्यावर टीका केली; त्यांचें म्हणणें असें कीं; या कामानें बालकांना शारीरिक व्यायाम मिळत नाहीं, तसेंच प्रत्यक्ष व्यवहार्य जबाबदारीशीं देखील त्यांचा संबंध येत नाहीं. ही उणीव भरून काढण्यासाठीं अल्पावधींतच या बालकांनीं दुसरें एक काम अंगिकारलें व तें म्हणजे भोजनग्रहाचें भोजनग्रहांत जेवणाच्या वेळीं वाढपी-काम करण्यासाठीं त्यांनीं एक वाढपी-पथक बनविलें व या वाढप्यांच्या प्रमुखाचें काम ते आळीपाळीनें करीत. हें काम करतांना त्यांना त्यांत एक प्रकारें प्रतिष्ठाच वाटत असे. या कामांत त्यांचें इतकें मन लागलें कीं तीं कांहीं खास मेजवान्यांच्या वेळीं आणि शाळेच्या सामूहिक भोजनाच्या प्रसगीं आपल्या आवडीचे असे कांहीं पदार्थ तयार करण्याचीही संधि मिळावी म्हणून ते विनंति करीत असत.

दरम्यान लेखनाचें काम झपाट्यानें वाढूं लागलें. नवीन नवीन सूचना व प्रार्थना येऊं लागल्या. वर्गाच्या दरवाज्यांवर लावण्यासाठीं फलक, भोजनगृहांत ठेवण्यासाठीं पदार्थांची नामावली, संगीताच्या वर्गांत भिंती-

वर लटकविण्यासाठीं गाण्याच्या ओळींचे मोठेसे फलक इत्यादि. यांतील शेवटच्या त्यांच्या सूचनेमुळें या बालकांना वेचक चित्राकृति वा दाखले आणि कलाकुसर करून काढलेलीं मोठीं अक्षरें यांच्या निर्मितीची संधि मिळाली.

या कामासाठीं त्यांना जर कोठें प्रेरणा मिळाली असेल तर ती मॉर्गन लायब्ररी व मुख्य सार्वजनिक वाचनालय येथील जुन्या हस्तलिखितांतील अशा प्रकारचीं कलाकुसरीचीं अक्षरें पाहूनच. वळणदार अक्षरांचे आकार गिरवितांना त्यांच्यांत लिखाणाच्या व्युत्पत्तीसंबंधीची चर्चा चालत असे. या चर्चेत हिंदुस्थानांतील रहिवाश्यांच्या चित्राकृति लिपीपासून तथा इजिप्तच्या प्राचीन रहिवाश्यांच्या चित्रात्मक संकेत लिपीचा समावेश करून थेट सेमेटिक लोकांच्या पहिल्याच व मूळच्या मूळाक्षरांपावेतों सर्व समावेश असे. भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरून जाणाऱ्या या लेखन–विकासाचें व पाश्चात्य संस्कृतीच्या विकासाच्या या मूलगामी बाबींचें हीं बालकें ज्ञान मिळवीत असतांनाच त्यांच्या शाळेच्या भिंतीवर फोनेशिअन, हिब्रू, ग्रीक व रोमन मूळाक्षरांचे फलक आढळून येऊं लागले.

या नव्या ज्ञानाची आपल्या देशाच्या मूळच्या संस्कृतीशीं तुलना करूं शकण्याइतकीं तीं चाणाक्ष होतीं. मला या बाबतींत एक प्रसंग आठवतो— हीं बालकें फोनेशिअन लोकांच्या जीवनासंबंधीची हकीकत ऐकत होतीं. या हकिकतींत एक विधान असें आलें कीं, 'चांचेगिरी हा एक भयंकर गुन्हा आहे असे ते लोक मानीत असत.' परंतु हें विधान पुरें होतें न होतें तोंच बालकांतून कोणीसें म्हटलें " समुद्रावर जीवन जगणाऱ्या लोकांमध्यें तें तसें मानणें स्वाभाविकच असणार. आपल्या पश्चिमी धनगरांच्या जमातींत गुराढोरांची चोरी करणें हा भयंकर गुन्हा नाहीं कां मानण्यांत येत! त्यांतलाच प्रकार हा ! "

प्राचीन संस्कृतीपासून मध्य युगीन संस्कृतीपर्यंत त्यांची मजल गेली व या संस्कृतींच्या रोमांचकारी प्रलोभनांत त्यांचीं मनें अडकून पडलीं. त्यांच्या शिक्षिकेला शेवटीं त्यांना सांगणें भाग पडलें कीं, ज्यांचें जीवन या लोकांच्या

जीवनापेक्षां अगदीं खडतर होतें असेही कांहीं लोक या काळांत होते. सरंजामशाहीच्या जगतांतील कार्यांची व कोणाकडून तें कार्य केलें गेलें या संबंधीच्या त्यांच्या शोधांतून त्यांच्या मनांत या सरंजामशाहीच्या गुलामांसंबंधीं सहानुभूति निर्माण झाली आणि लौकरच तीं सद्यःकालापर्यंत लोकशाही कल्पनांचा विकास कसा होत गेला याचा मागोवा काढूं लागलीं.

या दशवर्षीय बालकांसाठीं आम्ही जो छापखान्याचा अयशस्वी प्रयोग केला त्या कामाचा अकरा वर्षे वयाच्या बालकांकडे वारसा आला. सप्तवर्षीय बालकांचें वाचन–साहित्य छापण्यासाठीं छापखाना उघडण्याची जी आवश्यकता निर्माण झाली होती तिच्या व्यतिरिक्त शाळेचें जें कांहीं छापण्याचें काम होतें तेंही या बालकांनीं आपल्याच अंगावर घेतलें व पुढें पुढें तर पालकसंस्थेचें छपाई-कामही तीं करूं लागलीं. वर्षाच्या शेवटीं तर त्यांनीं आपल्या कामांतील प्राविण्याचा पुरावा म्हणून कथा व कविता यांचें एक नियतकालिक देखील प्रसिद्ध केलें. या नियतकालिकांत छापण्यासाठीं त्यांनीं जे चित्रांचे ठसे उपयोगांत आणले ते त्यांनीं स्वतः लिनोलियम तथा लाकूड यांवर खोदून तयार केले होते.

छपाईकाम करणाऱ्या या आपल्या पहिल्याच गटानें कारागिरांच्या एकाद्या जुन्या व्यवसायी संस्थेप्रमाणें आपल्या या कामाची व्यवस्थित योजना केली होती. उमेदवारांसाठीं परीक्षांचें आयोजन करणें, प्रवासी प्रतिनिधी, व छापाई कामांत प्रावीण असलेले, अशा प्रकारें त्यांनीं वर्गवारी केली होती. त्यांच्या गेल्या वर्षाच्या मध्ययुगीन आकर्षणापासून या छपाईच्या कामानें त्यांना छापखान्याच्या शोधांत व कला व विद्यांच्या पुनरुज्जीवनाच्या काळांत आणि धर्मयुद्धें, मार्कोपोलोची कथा व चीनशीं व्यापारी दळणवळण या गोष्टींनीं त्यांना भूगोलाचे व इतिहासाचे ज्ञानांत आणून सोडलें—त्यांना ज्ञान सर्वव्यापी झालें.

गुणाकार व भागाकार यांच्या योगानें एकादें उदाहरण सोडविण्याचे कामीं त्यांचें गणिताचें ज्ञान हें निश्चित स्वरूपाचें झालें. छपाईच्या सामुग्रीच्या खरेदी-विक्रीच्या गुंतागुंतीच्या हिशेबाच्या सरावामुळें त्यांच्या या ज्ञानांत मोलाची भर पडली. दशवर्षीय बालकांनीं आपल्या भाषाज्ञानाचें काम

अत्यंत सरळ व सोप्या रितीनें चालविलें असतां इकडे अकरा वर्षांच्या या बालकांचा या छपाई–कामामुळें प्रगत अशा इंग्रजी भाषा-तंत्राशीं मोठ्या झपाट्यानें परिचय होत होता.

बारा वर्षांच्या बालकांसाठीं कोणतें काम असावें यासंबंधीची माझी सूचना लाकडाचीं खेळणीं करण्यासंबंधीची होती. बालकांना आयत्या ठोक ळ्यांच्या रचनेसाठीं लहान लहान लाकडी बाहुल्या व लाकडी प्राणी यांची अवश्यकता असल्यानें हींच खेळणीं प्रथम तयार करण्यास लावावें अशी माझी इच्छा होती. या बालकांनीं आपली ' नेव्हर बस्ट टॉय कंपनी ' स्थापन केली व आपल्या स्वतःच्या इच्छेनुसारच्या नमुन्याप्रमाणें बाहुल्या व प्राणी तयार करण्यास सुरवात केली. जशी मागणी येईल तसें हें काम तीं करीत असत. नाताळच्या सणांत त्यांच्या या कंपनीची जाहिरात पालकांमध्यें झाल्यानंतर लौकरच त्यांच्या या कामाला तेजी आली.

खेळणीं बनविण्याच्या कामानंतर त्यांनीं विणकाम सुरू केलें व त्यानंतर कांहीं वर्षांनीं या गटांतून साहित्यिकांची निर्मिती झाली. या बालसाहित्यिकांनीं अगदीं वेगळ्या व अभिनव अशा प्रकारचें काम अंगिकारिलें व तें म्हणजे 'बुकवर्म्स् डायजेस्ट' या मासिकाचें प्रकाशन होय. त्यांत त्यांनीं पुस्तकें प्रकाशित करणाऱ्या कंपन्यांकडून आलेल्या बालकांच्या पुस्तकांचें परीक्षण देणें सुरू केलें. तसेंच शाळेतील पुस्तक संग्रहालयापासून त्यांना कोणते अनुभव मिळाले यासंबंधीचें ज्ञान त्यांच्यापेक्षां लहान बालकांना करून देण्यासाठीं त्यांनीं ' ओल्ड फेव्हरिट्स् ' या नांवाचें सदर या मासिकाला जोडलें.

आम्हीं ' शब्द-ज्ञान ' या नांवाचा एक नवीन अभ्यासक्रम सुरू केला. या अभ्यासक्रमांत बालकांना शब्दांचा इतिहास व इंग्रजी भाषेची रचना या गोष्टी शिकविल्या जात. शब्दांतील वर्ण-जुळणीची बालकांना आवड उत्पन्न होऊन पूर्ण जाणीव व्हावी, यासाठीं वरील योजनेचें आम्हीं प्रयोजन केलें होतें; परंतु या बाबतींत आमचा हा जो हेतु होता त्यापेक्षांही बालकांनीं आपली प्रगती शब्दांचे फारच पुढें केली. लॅटिन व ग्रीक शब्दांचे मूळ धातु, शब्दांचे अक्षरशः मूळ अर्थ व त्यांत शतकानुशतकें परिवर्तन होऊन बनलेले

रूढार्थ आद्य व अंत्य प्रत्यय जोडून शब्दांच्या नवीन रचना करणें आदि गोष्टींत त्यांचें मन लागलें.

किंबहुना हीं बालकें सध्यां दैनिक वृत्तपत्रें वाचीत असावींत म्हणूनच कीं काय त्यांचें मन आतां तत्कालीन दैनंदिन घडामोडींकडे धांवूं लागलें, अशा घडामोडींची त्यांना माहिती असलेली दिसून आली व लगेच आम्हीं त्या गोष्टीचा चांगलाच फायदा करून घेतला. बालकांच्या या माहितीच्या विषयाला सुरवात करण्यासाठीं दैनिकांत खळबळजनक अशा प्रमुख बातमीच्या शीर्षकांसंबंधीचा उल्लेख करून करीत असूं. सद्यःकालीन सामाजिक व आर्थिक समस्यांबद्दलच्या कुतूहलानें त्यांना औद्योगिक क्रांतीपर्यंत इतिहासांत नेलें व तेथून पुन्हां सद्यःकालीन परिस्थितीच्या घेऱ्यांत आणून सोडलें.

त्यांच्या वयाच्या तेराव्या व त्यांच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षीं या बालकांनीं आपल्या या शैक्षणिक यशाचा आढावा घेतला व ज्या बाबतींत त्यांच्या प्राप्त ज्ञानाला उजाळा देणें आवश्यक होतें त्या बाबींवर आपलें लक्ष केंद्रीभूत केलें. बहुंशीं त्यांनीं आपल्या पश्चात् आपली साक्ष ठेवावी म्हणून कायम स्वरूपाच्या अशा कांहीं सुधारणा केल्या. कांहींनीं भोजनगृहाला रंग दिला व भोजनासाठीं नवीन टेबलें बनविलीं तथा खिडक्यांसाठीं नवीन पडदे तयार केले. युद्धकाळांत त्यांनीं सुतार, रंगारी, इलेक्ट्रीशिअन आदींच्या ऐवजीं स्वतःच मोडतोड दुरुस्त केली.

या तेरा वर्षांच्या बालकांच्या या वर्षींच्या कार्यक्रमांत जर प्रमुख कार्यक्रम कोणता अंगिकारिला गेला असेल तर तो म्हणजे फोटोग्राफी होय. या वर्षांतील सुमारें तीस तासांच्या अल्पावधींत त्यांच्यापैकीं प्रत्येकानें 'डेव्हलपींग', 'एन्लार्जींग' व 'प्रिंटींग' हीं फोटोग्राफीचीं तीनही प्रमुख तंत्रें हस्तगत केलीं व या कार्यक्रमांतील आपला भाग पार पाडला. 'डार्क रूम' मधील प्रत्यक्ष अनुभवांतून वस्तु-विज्ञान व रसायनशास्त्र यांचे पुष्कळसे साधे प्रयोग निर्माण झाले.

अमेरिकेच्या इतिहासाच्या सनावळीनुसार अभ्यासाबरोबरच या बालकांनीं तत्कालीन घडामोडींपासून त्यांचीं कारणें व परिणाम शोधून काढण्यापर्यंत मजल गांठली. त्यांच्या स्वतःच्या देशांतील उद्योगधंद्यांच्या विकासाकडे त्यांचें मन आकर्षिलें गेलें व त्यांच्या मार्गाला नवीन वळण मिळालें. त्यासाठीं त्यांनीं अनेक सहली काढल्या. फोर्ड असेंब्ली प्लँट या कारखान्याची पहाणी करण्यास गेल्या वेळीं तेथील मोठ्या प्रमाणावर चाललेल्या उत्पादनाचा या लहानग्या मनांवर विस्मयजनक परिणाम झाला. कारण, फावल्या वेळीं कलात्मक असें कांहीं तरी उत्पादन करणारे ते देखील छोटे कामगारच होते.

केवळ तेरा वर्षांच्या या बालकांचीच ही गोष्ट नव्हे; तर त्यांच्यापेक्षां लहान असलेल्या बालकांच्या मनांवर देखील याचा परिणाम झाला. अशाच एका अकरा वर्षें वयाच्या बालकानें एका मोठ्या दैनिकाची कचेरी पाहून आल्यानंतर तिचें जें वर्णन केलें तें असें:—

विकट अमर्याद भव्य उभा छापखाना ।
आणि गर्जना तयाची मंद पार्श्वभूमि ।।
तरल स्वैर लघुनिनाद जसे ऐकतांना ।
नादवस्त्र विणलेलें कानीं ये नामी ।।

पोस्ट-ऑफिस, वस्तुभांडार, छापखाना, फोटो-स्टुडिओ या कार्यक्रमांनीं आमच्या शाळेंतील बालकांना समाधान झालें. म्हणून या गोष्टी कांहीं निराळ्या वातावरणांत रहाणाऱ्या बालकांच्या बाबतींत तितक्याच समाधानकारक ठरणार नाहींत; किंबहुना अशा भिन्न वातावरणांतील बालकांच्या बाबतचें तें योग्य उत्तर ठरणार नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या छोट्याशा गांवांतील शाळेमधील आठ वा नऊ वर्षांच्या बालकांच्या बाबतींत कोंबड्यांच्या लहान पिलांची उपज करण्याचा व्यवसाय हा समाधानकारक कार्यक्रम ठरेल. तसेंच मोठ्या बालकांसाठीं आमच्या शाळेंतील शालोपयोगी साहित्याच्या वस्तुभांडारापेक्षां मोठ्या प्रमाणावरील एखाद्या सहकारीवस्तुभांडाराची योजना योग्य ठरेल.

प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमांत अशा प्रकारचे कार्यक्रम असणें हें आवश्यक असल्याची आमची अनुभवसिद्ध खात्री आहे. आपल्या या कार्यक्रमांत बालकांचें लक्ष लागण्यानें ज्याप्रमाणें निरोगी झाडें आपली मुळें जमिनींत चौफेर पसरून आपल्या वाढीला आवश्यक ते पदार्थ शोषून घेतात त्याचप्रमाणें बालकांना आपल्या शैक्षणिक विकासासाठीं आवश्यक ज्ञान आपल्या भोंवतालच्या जगांतून घेतां येतें. आमच्या शाळेतील बालकांचें मन अशाप्रकारें त्यांच्या कार्यक्रमांत निमग्न झालें कीं, त्यांच्या ज्ञानप्राप्तीच्या कार्यांत त्यांना आवड उत्पन्न झाली आहे या गोष्टीचें आम्हांला समाधान झालें.

# १०. वाचनाचा अभ्यास

बालकांच्या निरनिराळ्या गटांनुसार त्यांच्या त्यांच्या कार्यक्रमाचा जम ठीक बसल्यानंतर आम्हांला असें आढळून आलें कीं, हे कार्यक्रम म्हणजे त्यांच्या त्यांच्या प्रत्येक वर्षाच्या अभ्यासक्रमाचा केवळ गाभाच आहेत असें नव्हे तर त्यांच्यायोगें मानवी ज्ञानाच्या विस्तृत क्षेत्रांत एक प्रकारची निवडक प्रवृत्तीही निर्माण केली गेली. आमच्या या आठ वर्षांच्या वयाच्या पोस्ट–कामगारांनीं टपाल–मार्गांचा मागोवा घेतांना एका बाजूला त्या मार्गावर राहाणाऱ्या रहिवाश्यांचा व त्यांच्या जीवनक्रमाचा आढावा घेतला तर दुसऱ्या बाजूला शहरच्या प्रमुख पोस्ट–ऑफिसांत बसविलेल्या वायुवाहक नळ्या पाहिल्या असल्यानें आपल्या शाळेंतील विज्ञानशास्त्राच्या वर्गांतील हवेच्या दाबाच्या प्रकाराचा शोध लावीत होतीं.

आमच्या शाळेंतील विषयांमध्यें अशा प्रकारें सर्वसामान्य शाळेंत जे विषय शिकविले जातात त्यांचा समावेश झाला होता. किंबहुना त्यापेक्षांही जास्तच ! जर कांहीं भिन्नता असेल तर ती म्हणजे पद्धतीची. प्रत्येक गटाच्या शिक्षिकेनें आपल्या वर्गांतील बालकांना शिकवितांना पुढल्या वर्षाच्या कार्यक्रमाच्या कौशल्याच्या आवश्यकतेची आपल्या मनांत ठीक जाणीव ठेवली होती व त्या अनुरोधानें बालकांना कसें मार्गदर्शन केलें पाहिजे याचे मार्ग शोधून काढले. शिक्षिकांत होणाऱ्या चर्चांमध्यें प्रत्येक वर्षाच्या कार्यक्रमानें मार्गदर्शन कसें करावें यासंबंधीच्या ढोबळ रूपरेखा आंखण्यांत आल्या व प्रत्येक वर्षासाठीं कोणते विषय असावेत हेंही ठर-

विण्यांत आलें. परंतु प्रत्येक गट जसजसा आपल्या या शालेय अभ्यासांत प्रगतिमान होऊं लागला तसतसा त्यानें आपला स्वतःचा असा मार्ग चोखळला व हा मार्ग शिक्षणाच्या अशा अनेक प्रांतांतून जाऊं लागला कीं, ज्या विषयाचें ज्ञान त्या गटांतील बालकांना दिलेंही गेलें नव्हतें. आणि यायोगें त्यांना केवळ त्यांच्या जीवनकालाला आवश्यक अशा प्रकारचें ज्ञान प्राप्त करुन घेण्याच्या संवयीच प्राप्त झाल्या असें नव्हें तर विस्मयजनक अशा मोठ्या प्रमाणावरील माहिती देखील उपलब्ध झाली.

भोंवतालच्या परिचित जगाचें प्रत्यक्षपणें ज्ञान मिळविण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीनुसार त्यांची ही इच्छा पूर्ण होईपावेतों, पुस्तकादि साधनांकरवीं अप्रत्यक्षरीत्या ज्ञान संक्रांत करण्याचे आम्हीं बुद्धयाच टाळलें. त्यामुळें मात्र हीं बालकें त्यांच्यापासून काळ व मर्यादा यांनीं दूर असलेल्या वस्तूंचें ज्ञान मिळविण्याच्या खऱ्याखुऱ्या रुचीनें पुस्तकें वाचूं लागलीं. या छापील ज्ञानाच्या जगतानें त्यांच्यापुढें कोणत्याही प्रकारें धाकाचा डोंगर अथवा थकण्याची भीति निर्माण झाली नाहीं. अन्यथा त्यांना जें कांहीं समजून घेण्याची आवश्यकता होती त्यासंबंधीं बालकांना कसें निरुत्साही केल्यासारखें होतें हें आढळून आल्यानंतर त्यांना तत्संबंधीं फारच गंमत वाटली.

साहजिकच अशा प्रकारच्या बाल-संशोधकाच्या विशिष्ट प्रकारची पुस्तकसंग्रहालयाची आवश्यकता भासते व तें तसें आमच्याजवळ होतें. विषयानुसार पुस्तकांची एक विशिष्ट व अभिनव अशा प्रकारची जंत्री आमच्या पुस्तकसंग्रहालयाच्या व्यवस्थापकांनीं केली होती. उदाहरणार्थ ‘ छपाई ’ या विषयावरील पुस्तकांची जंत्री करतांना छपाईसंबंधीचीं तांत्रिक व छपाईच्या इतिहासाचींच पुस्तकें केवळ समाविष्ट करण्यांत आलीं होतीं असें नाहीं, तर या विषयाला अनुसरून असणाऱ्या गोष्टींच्या पुस्तकांचाही समावेश त्यांत होता.

आम्हांला असें आढळून आलें कीं, त्यांना दिलेल्या एकाद्या विषयावर संशोधन करण्यास नऊ वर्षें वयाचीं बालकें अगदींच लहान पडत होतीं असें मात्र नव्हे..एकादी सहल अथवा वर्गांत चालणारी चर्चा वा वर्ग-शिक्षिकेनें वर्गासाठीं एकाद्या पुस्तकाचें मोठ्यानें केलेलें वाचन यांतून अनेक प्रश्न

निर्माण केले जात व या प्रश्नांतून एकादा विषय निवडून काढून त्यावर तीं संशोधन करूं लागत. त्यासाठीं पुस्तकांची निवड करण्यास शिकणें हीं त्यांच्या स्वतंत्र संशोधन कार्यातील पहिली पायरी होती. तसेंच केवळ जी माहिती सांपडली ती उतरून न घेतां विशिष्ट प्रकारची माहिती शोधून काढून महत्त्वाची ती आपल्या वहींत उतरून घेणें हेंही त्यांना शिकायचें होतें !

स्मरणवह्या, पत्रें व काळ आणि जीवन यांच्या संबंधींचें प्रत्यक्ष लिखाण ह्यांचा तीं अभ्यास करीत होतीं. व यासंबंधींचें लिखाण मोठ्यानें वाचून दाखविल्यावेळीं तीं त्यांत अगदीं तन्मय बनून जात. केवळ बालवाङ्मयावरच निर्भरित न राहाण्याची मीं त्यांच्या शिक्षिकांना विनंति केली. या बालकांच्या एका शिक्षिकेनें त्यांना इरॅझमसच्या ' मूर्खत्वाच्या प्रशंसेखातर ' लिखाणांतील एक उतारा वाचून दाखविला. याच बालकांनीं आणखीही पुढें जाऊन तत्त्वज्ञानासंबंधींही चांगलीच आस्था दाखविली. त्यांनीं स्वतः कॉन्फ्यूशिअसचीं तात्त्विक विधानें संकलित केलीं व त्यांचें विश्लेषण करण्यांत तीं समाधानपूर्वक गढून गेलीं.

पुस्तकांतील विषयांचें संशोधन करण्यासाठीं हीं बालकें पुन्हां पुस्तकालयांतून सहलींसाठीं बाहेर पडलीं. वाचलेल्या विषयाचा प्रयोग करून पहाण्यासाठीं तीं प्रयोगशाळेंत जात अथवा एकादी वाचलेली गोष्ट स्वतः प्रत्यक्ष पाहाण्यासाठीं त्या त्या स्थळीं जात. भूमध्य समुद्रांतून जस्ताचीं गलबतें भरून नेणाऱ्या फोनेशियन लोकांची कथा वाचून एका बालकानें आमच्या प्रयोगशाळेंत ' ब्रॉंझ ' धातू तयार करण्याचा प्रयत्न केला व त्यानें आपल्या प्रयोगाचें जें टांचण केलें त्यामुळें एका अद्यावत् ब्रॉंझ फाउंड्रीला भेट देण्यास त्या वर्गातील बालकांना स्फूर्ति मिळाली.

अशा प्रकारें आपणांला जें ज्ञान मिळवायचें त्यांच्या मनांत होतें तें मिळविण्यासाठीं आमचा विज्ञानशास्त्राचा वर्ग हें त्यांचें दुसरें स्थळ बनलें. शाळेंत वा त्यांच्या घरीं एकादा प्रश्न त्यांच्यापुढें निर्माण झाला कीं, लगेच आमच्या या विज्ञानाच्या वर्गांत तत्संबंधीचा प्रयोग करून पहाणें याचा त्यांना चांगलाच सराव झाला व मोठ्या आनंदानें तीं तें करीत असत.

आमच्या एकंदर कार्यापैकीं. मला वाटतें, रंगकला, नमुने बनविणें, गाणीं, कथा व बालकांनीं स्वतः लिहिलेलीं नाटकें यांच्यावर आम्हीं जो जास्त भर देत असूं तत्संबंधीं पालक आम्हांला नेहमींच प्रश्न विचारीत. जर आम्हांला छोटे रेम्ब्रँड्स व शेक्स्पियर निर्माण करावयाचे नव्हते-( आणि खरोखरीच आमचा तो उद्देश नव्हता असें आमचें ठासून सांगणें होतें,— तर मग या सर्व गोष्टींचें प्रयोजन काय ?

ज्या शोधासाठीं आम्हीं सहेतुकतया बाहेर पडत असूं, त्याच्या व्यतिरिक्त इतरही कांहीं गोष्टीं आमच्या योजनेंत अंतर्भूत नव्हत्या, त्यांनाही आमच्या दृष्टीनें महत्त्व होतें. एकाद्या विशिष्ट अनुभूतीचा ठसा आमच्या मनावर अधिक सखोल उमटेल हें मोठ्यांच्या बाबतींतही तितकेंच खरें आहे याची आम्हांला जाणीव होती हे ठसे वा हीं प्रतिबिंबें मनांत साठून राहतात व ज्या वेळीं आवश्यकता भासते त्या वेळीं ते मनश्चक्षूंपुढें उभे राहतात अथवा जीं अभावितपणें आपल्या विचारांवर आपला प्रभाव पाडतात व प्रसंगीं आपल्या कृतनिश्चयांवर आपला अंमल चालवितात. उदाहरणार्थ, बालकें ज्या वेळीं सहलींवर जात त्या वेळीं तीं तेथील वातावरणांत व तेथील दृश्यांत इतकीं निमग्न होऊन जांत कीं, आम्हांला त्याची क्वचितच कल्पना आली असेल किंवा आम्हीं तसें क्वचितच ताडलें असेल. या गोष्टींच्या प्रत्यक्ष अनुभूती त्यांच्या मनांत पूर्वींच संकलित झालेल्या सांगितलेल्या परानुभूत माहितीच्या सांठ्यांत भर टाकीत अथवा त्या भिन्न प्रकारच्या अनुभूतींवर अधिष्ठित असल्यास त्या त्यांच्या मनांत कोठेंतरी एका बाजूला दडून राहत व प्रसंग पडतांच बाहेर पडत. या अशा प्रकारच्या अनुभूतींच्या सांठ्याला आपण अभावितपणें व ज्या क्रियेला बर्गसननें ' आत्मयज्ञात्मक विचारक्रिया ' असें म्हटलें आहे त्या क्रियेच्या अनुषंगानें जाणीत असतों.

माझ्या समोरच्या भिंतीवर एका सात वर्षांच्या बालिकेनें काढलेलें चित्र टांगलेलें आहे. सुंदर सुंदर अशा रंगांनीं रंगविलेल्या अशा शहरी घराचें तें चित्र आहे. कांहीं खिडक्या काळ्या रंगाच्या आहेत तर कांहीं पिवळ्या रंगाच्या आहेत, याचा ध्वन्यर्थ येवढाच कीं संध्याकाळ होत चालली

आहे. चित्रांत दर्शनींच एक चढणीचा लोहमार्ग आहे. त्याचे खांब घराच्या दर्शनी भागांच्यावर आलेले आहेत. या बालिकेला ही जाणीव झाली होती कीं, आगगाड्यांचें वजन झेपण्यासाठीं हा लोहमार्ग बळकट केला पाहिजे. त्या बालिकेनें हे जे खांब काढले आहेत ते देखील योग्य अशाच आकारमानाचे काढले असून ते या सर्व चित्राला साजतील असेच आहेत. जमिनीवर इतस्ततः बर्फ पडलें आहे. घराच्या चिमण्यांतून निघणारा धूर एकाच दिशेनें चालला आहे. रस्त्यावर मोटारगाड्या दिसत आहेत, लोहमार्गावर एक आगगाडी आहे—आणि त्या चित्रांत जीं एकंदर दृश्यें दाखविलीं आहेत, त्यांपैकीं हीं अर्धी देखील झालीं नाहींत.

हें चित्र काढण्यास घेईपर्यंत या बालिकेला आपणांला इतक्या सगळ्या गोष्टींची माहिती आहे ह्याची जाणीव देखील नव्हती. परंतु ज्या वेळीं आवश्यकता निर्माण झाली त्या वेळीं तिनें ही सर्व माहिती आपल्या ‘ गुप्त खजिन्यांतून ’ बाहेर काढली. कदाचित् या तिच्या माहितीच्या व अनुभूतींच्या खजिन्यांत या विविध गोष्टींचा परस्परांशीं संबंध देखील नसेल, परंतु वेळ येतांच व तिच्या मनश्चक्षूंसमोर त्या निवडक अनुभूती हजर झाल्या व त्यांनीं आपापल्या जागा धारण केल्या.

प्रत्येक बालकाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठींच आम्हीं प्रयत्न केला आहे त्यांची चित्रकला, रंगकला, खोदकाम, कविता व नाटकें हीं कला अथवा वाङ्मय म्हणून महत्त्वाचीं नाहींत; परंतु या ‘ आत्मज्ञानात्मक विचारक्रिये’चा तसेंच तार्किक विचारशक्ति यांचा सराव या दृष्टीनें त्यांचें महत्त्व आहे.

आमच्या या शाळेंतून आमच्या पदवी-परीक्षा उत्तीर्ण होऊन हायस्कूलांत दाखल झालेल्या बालकांच्या शिक्षकांनीं मला अनेकदां विचारलें आहे कीं, आपल्या अभ्यासांत मन लावण्याचें चैतन्य व इतकी अभिनवता व कल्पकता या बालकांत कशामुळें निर्माण झाली. हें जर खरेंच तसें असेल तर माझी खात्री आहे कीं हें त्यांचें वैशिष्ट्य त्यांना तार्किक विचारशक्ति व आत्मज्ञानात्मक विचारशक्ति यांच्या वाढीची जी संधि मिळाली तींतून निर्माण झालेलें आहे; आणि ह्या सर्वांची परिणति बहुशीं ज्याला आपण सृजनशीलता म्हणतों त्यांतच आहे.

# ११. बालकांचीं नाटकें.

भाषेसंबंधीचा बालकांचा विकास व त्यांतील त्यांची कुशलता अधिकाधिक होऊं लागतांच त्यांचा कल उत्तरोत्तर शब्दांच्या निर्माण-कृतींकडे जास्त जास्त जाऊं लागला. विशेषतः निरनिराळ्या अभिरुचींच्या बालकांना एका विशिष्ट प्रकारानें एकत्र आणलें; तो प्रकार म्हणजे नाट्याविष्कार हा होय.

अगदीं आरंभापासूनच बालकें नाट्याविष्कार करूं लागलीं होतीं. संगीताच्या खोलींत सुरेल सुरावटींच्या साथीवर ससा अथवा बेडूक यांच्या उड्यांची नक्कल करीत असत. तीं सात वर्षांच्या वयाचीं झाल्यावर सहेतुकतया नाटकें करूं लागलीं होतीं. कांहीं वेळां तीं आपल्या इतिहासाच्या अभ्यासांतील त्यांना आवडलेल्या एकाद्या प्रसंगाचा नाट्यांत आविष्कार करीत. पश्चिमेकडील देशांत सफर करणाऱ्या एका कुटुंबाची नक्कल करणें हा नऊ वर्षें वयाच्या बालकांचा अवीट असा आवडता खेळ होता. कांहीं प्रसंगीं हा खेळ संगीताच्या पार्श्वभूमीवर सुरू होई. बालकांच्या एका गटाला जमिनीवरील खेळापेक्षां समुद्रावरील खेळ अधिक आवडूं लागल्यानें त्यांनीं आपल्या या आवडींतून तालासुरावर एक सुंदर व आकर्षक असा खेळ निर्माण केला. व्यायामशाळेचें त्यांनीं जहाज केलें, हें जहाज बंदरांतून जाऊं लागलें—दूरदूरच्या देशीं तें प्रवास करूं लागलें. ह्या खेळांतील खलाशी शिडीसारख्या उपकरणावरून जहाजावर चढण्याचा आविष्कार करूं लागले. तसेंच वर चढून आल्यावर दूरवर दृष्टि फेंकून दुसरें एकादें जहाज दिसतें कां तें

पहाण्याची व तत्संबंधीं खलाशांच्या भाषेंत पुकार करण्याची नक्कल त्यांनीं केली व इकडे बोटीच्या कप्तानानें आपल्या डेकवरून जोरानें ओरडून हुकूम सोडले. हें जहाज इच्छित बंदरांत येऊन पोहोचतांच तेथील लोक आपल्या तद्देशीय पेहेरावांत या जहाजाच्या स्वागतासाठीं आले. जहाजावरून कांहीं माल उतरवून घेण्यांत आला व नवा माल चढविण्यांत आला. शेवटीं सर्व बालकें स्वतः जहाजाच्या आकारानें उभीं राहिलीं आणि जसजसें एकेक बालक खोलींतून निघून जाऊं लागलें तसतसा हा आकार हळूं हळूं विरूं लागला व शेवटीं तो पूर्ण विरून गेला. खेळ संपला.

या नाट्याविष्काराच्या बाबतींत महत्त्वाची जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे आपल्या आवाक्यांत असलेल्या ज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रांतील कोणत्याही प्रकारची घटना अथवा एकादा जीवनमार्ग अथवा एकादा प्रसंग शोधून काढून त्याची आपल्या खेळांत सही सही नक्कल करण्याची स्वतंत्रता त्यांना मिळत असे.

ह्या गटांतील सर्व बालकें नाट्यलेखक आहेत, स्टेजमॅनेजर आहेत, दृश्यें रंगविणारे आहेत, निरनिराळे वेष तयार करणारे आहेत तसेंच स्वतः नटही आहेत. घटना व पात्रांचे स्वभावाविष्कार यांतील यथार्थता व स्वाभाविकता, सहेतुक व निर्हेतुक विनोदाची योजना या सर्व अंगांचा आविष्कार करण्यांत तीं इतकीं तरबेज आहेत कीं, त्यांचीं हीं नाटकें पहातांना मोठीं माणसें देखील अगदीं आनंदून जातात. शाळेंतील ठरीव ठशाच्या नाटकांपेक्षां हीं त्यांचीं नाटकें फारच उत्कृष्ट आहेत.

बारा वर्षें वयाच्या बालकांनीं आपलें एक नाटक कसें तयार केलें याची त्यांच्या शिक्षिकेनें सांगितलेली माहिती पुढें दिली आहे.

विषयाची निवडः—" १९३६ सालीं आम्हीं आमच्या वर्गाच्या इतिहासविषयाच्या अभ्यासाला आरंभ केला. त्या वेळीं इटाली व एथिओपिया या देशांत युद्ध चालू होतें व या युद्धपरिस्थितीनें आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केलेलें होतें. आम्हीं युद्धाच्या कारणांचें विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला व त्यासाठीं औद्योगिक क्रांति, ब्रिटिशांच्या सत्तेचा उदय, फ्रेंच व जर्मन साम्राज्यें व जागतिक युद्ध यांचा थोडासा अभ्यास केला.

—" आम्हीं जागतिक युद्धापर्यंत येऊन ठेपतांच मला जर कांहीं प्रामुख्यानें आढळून आलें असेल तर तें म्हणजे १९१७ सालीं रशियानें महायुद्धांतून आपलें अंग काढून घेतलें तें होय; आणि म्हणूनच आम्हीं रशियन क्रांतीचीं कारणें व त्यांतील प्रमुख घटना यांचा अधिक अभ्यास केला.

—"वर्षाच्या शेवटीं नाटक तयार करण्याची वेळ आली त्या वेळीं मीं प्रत्येक बालकाला विचारलें कीं कोणतें नाटक तयार करण्याची त्याची इच्छा आहे. त्या वेळीं बालकांनीं केलेल्या सूचना पुढें दिल्या आहेत."

( १ ) महायुद्धांत आफ्रिकेनें भाग घेतला त्या वेळीं कारणीभूत झालेल्या भिन्नभिन्न घटना

( २ ) महायुद्धापूर्वीची व नंतरची परिस्थिति

( ३ ) क्रांतिकालांतला रशिया

( ४ ) आजच्या मोठ्या गोष्टींपैकीं एकादी गोष्ट

( ५ ) गोल्डकोस्ट वसाहतीचीं आरंभापासूनचीं स्थित्यंतरें

( ६ ) उत्थान-संप ( औद्योगिक क्रांतीच्या वेळचा )

( ७ ) चिनी धर्तीचें दृश्यविरहित नाटक

( ८ ) फ्रान्स व जर्मनींतील खाणींसंबंधीचें नाटक

( ९ ) वेस्ट व्हार्जिनिआंतील खाणी व तेथील खाण-कामगारांची दुर्दशा.

ह्या सर्व सूचनांसंबंधीं मतदान घेतांच सर्वांनीं कोळसा-खाणीच्या दृश्यांचें नाटक बसविण्याचें ठरविलें. या नाटकाच्या विषयाचें विश्लेषण त्यांनीं पुढें दिल्याप्रमाणें तयार केलें.

दृश्य १ लें:—शस्त्रसंधीच्या करारानंतरची परिस्थिति, त्या वेळची एक खानावळ. फ्रेंच व जर्मन खाण-कामगार खानावळींत तहकूब झालेल्या युद्धासंबंधीं व खाणीच्या भयावह अवस्थेबद्दल बोलत बसले आहेत.

दृश्य २ रें:—स्थळ-खाणीची जागा. खाणीवरील छत उतरतें दिसत आहे. खाणींत जाण्याच्या अडचणीच्या मार्गांत एक खांब आडवा आलेला आहे.

दृश्य ३ रें:–युद्धांत जर्मन व फ्रेंच यांच्यांत लढाई होते व तींत एक जर्मन सैनिक फ्रेंच सैनिकाला ठार मारितो. मरणारा हा फ्रेंच मनुष्य आपल्या मुलाला जवळ बोलावितो व नेहमीं जर्मन लोकांचा द्वेष करण्यास त्यास उपदेश करितो.

दृश्य ४ थें:–दुसरा एक बोगदा. आंतील दृश्य. या वेळीं तोच जर्मन मनुष्य जर्मनांचा द्वेष करण्याची शपथ घेतलेल्या त्या फ्रेंच मुलाला वांचवितो.

**नाट्य कृतीचा आराखडा :**—"या नंतरचें काम म्हणजे प्रमुख अभिनयाची योजना करणें. अनेक प्रयत्नांनंतर तयार झालेला आराखडा यत्न व चुका यांतूनच निर्माण झाला होता. आमच्या या नाटकांतून कोणती गोष्ट प्रतीत झाली पाहिजे या संबंधीं सुरवातीलाच आम्हांत सहमत झालें होतें व तदनुसारच आम्हीं आमच्या नाटकाच्या 'प्लॉट'मध्यें आवश्यकतेनुसार फेरफार करीत होतों. खाणीसंबंधीं आमच्या पुस्तकालयांतील पुस्तकांतून आम्हांला तत्संबंधीं भरपूर माहिती मिळालेली होती. खाणींत होणारे स्फोट, पूर, लागणाऱ्या आगी, खाणींतील एकादा धस कोसळल्यानें होणारी कोंडी व विषारी धूर इत्यादींचीं वर्णनें आम्हीं या पुस्तकांतून वाचलेलीं होतीं. आणि कर्मधर्मसंयोगानें याच वेळेला वृत्तपत्रें व रेडिओ यांत नोव्हा स्कॉटिआ येथील एका पडीक खाणींत कोणी तिघे इसम अडकून पडल्याच्या खळबळजनक वृत्तानें एकच हाहाःकार माजवून सोडलेला होता.

—'आम्हीं शेवटीं आमच्या नाटकासाठीं कोणता भयानक प्रसंग घ्यायचा तें निश्चित केलें. खाणींत पुराच्या पाण्यानें उडविलेला प्रलय व त्यांतच 'ब्लॅक्-डॅम्प' नांवाच्या विषारी वायूचा उद्रेक हीच ती प्रमुख घटना.

—"तत्संबंधीं अनेक वेळां चर्चा करून व बालकांच्या छोट्या छोट्या गटांकडून विविध प्रकारें प्रयत्न करवून घेतल्यानंतर नाटकाच्या कथा-वस्तूचा एक ढोबळ आराखडा तयार झाला. नाटकाची सर्वसामान्य योजना सर्वानुमतें निश्चित केल्यानंतर नाटकांतील विविध प्रसंग अभि-नयद्वारें व्यक्त करण्याचें प्रयत्न आम्हीं करूं शकलों विशिष्ट प्रसंगाच्या

अभिनय करण्यासाठीं आवश्यक ती विशिष्ट पात्रें आम्हीं निर्माण केलीं. बालकांनीं स्वखुशीनें या पात्रांचें काम अंगावर घेतलें आणि इतकें झाल्यानंतर त्यांनीं स्वतःच नाटकाच्या मुख्य घटनेला अनुलक्षून निरनिराळ्या प्रसंगांचे संवाद व तत्सम इतर गोष्टींच्या योजनेला आरंभ केला. हे सर्व प्रसंग पूर्णतया तयार झाले कीं, ते सर्व प्रसंग साकल्यानें घेतले म्हणजे एक सबंध असें नाटक तयार होतें किंवा नाहीं तें पहाण्यासाठीं या प्रसंगांत भाग घेतलेलीं बालकें ते प्रसंग इतर बालकांपुढें करून दाखवीत. या विभागशः प्रसंगाच्या सुसूत्रपणानें नाटकाची घटना प्रेक्षकांना व्यक्त होते किंवा नाहीं हें हीं प्रेक्षक–बालकें ठरवीत. तसेंच प्रसंगांत काम करणारीं पात्रें व त्यांचा अभिनय व संवाद परस्परसंबद्ध आहेत किंवा नाहीं तसेंच एकादा प्रसंग हा सुसंगत अभिनय नसल्यानें कंटाळवाणा तर होत नाहीं ना याचा निर्वाळा देणें ही जबाबदारीहि या छोटेखानी प्रेक्षकांवर असे.

**संवाद** –“ बालकें आपले संवाद घोकून तयार करीत नसत खरें म्हणजे संवादाचा पुष्कळसा भाग हा केव्हांच लिहून काढलेला नसे. याचा अर्थ असा नव्हे कीं, नाटकाच्या निश्चितीचा जो अंतिम प्रयोग करण्यांत येई त्यांत पूर्वीच्या प्रयत्नात्मक प्रयोगांतील महत्त्वाचीं व चांगलीं वाक्यें बहुधा येत नसत, उलट पक्षीं, एकादा प्रसंग बहुधा इतका नेमका करून दाखविला जात असे व त्या प्रसंगाला अनुरूप अशीं भाषणें व पात्रांचा क्रम या गोष्टी त्या प्रसंगाच्या अभिव्यक्तीला इतक्या महत्त्वाच्या ठरून गेलेल्या असत कीं, तो सबंध संवाद हा चांगल्या रितीनें घोटून घोटून तयार केल्यागत वाटे. परंतु येवढें मात्र खरें कीं, या प्रयत्नात्मक प्रयोगाच्या वेळीं बालकें आपल्या संवादांत वेळोंवेळीं कांहीं फरक करीत असत व शेवटाच्या प्रयोगांत तर तीं भाषणें पुष्कळच सुधारून तयार केलेलीं असत.

**पात्रांच्या निवडीचा बालकांवरील परिणाम**—: “ माझा अनुभव असा आहे कीं, प्रत्येक पात्राची भूमिका निश्चित करणें हें ''शेवटच्या प्रयोगापर्यंत स्थगित करावें. याचा मुख्य फायदा हा असतो कीं,

नाटकांतील प्रमुख पात्रांना ( नाटकांत शक्य तितकीं जास्त प्रमुख पात्रें असावींत ) स्वेच्छेनुसार आपल्या भूमिकांत विकासशील फेरफार करण्याला वांव सांपडतो. तसेंच यांत एक तोटा असतो तो हा कीं, कांहीं बालकांना विशिष्ट प्रसंगीं कोणत्याही एकाद्या भूमिकेशीं तद्रूप होण्याचा अनुभव मिळतो. अशी एकाद्या तयार वा पूर्वरचित नाटकां-पेक्षां असल्या प्रयोगांवर व अनुभूतींवर अधिष्ठित असलेल्या किंबहुना त्यांतूनच निर्माण झालेल्या नाटकाला जो एक फायदा मिळतो तो म्हणजे त्यांतील ही अशी सुलभता होय. म्हणूनच नाटकाच्या घटनेची क्रिया ही अशी घोटीव बनेपावेतों नाटकाच्या भूमिकांची निश्चिति करूं नये. असा माझा आग्रह आहे.

पात्रयोजनेंत सतत बदल करण्याचें दुसरें एक कारण असें कीं, त्यायोगें नावडती अशी भूमिका तात्पुरती करण्यास सांगितलें गेल्यानें बालकाचा बहुधा फायदा होतो. धारणाशक्तीचा उत्तम आरंभ म्हणजेच हीं नाटकें होत.

---

# १२. छोटेखानी लोकशाही

एके दिवशीं आमची एक शिक्षिका एका सहा वर्षे वयाच्या मुलाला माझ्याकडे घेऊन आली. तो तर सर्व बालकांना विनाकारण मारीत सुटला होता. हा मुलगा आमच्या शाळेंत नवीनच आला होता.

मीं त्याला कारण विचारतांच तो म्हणाला–" मिस् प्रॅट, त्याचें असें आहे कीं, मी एखाद्या मुलाला मारतों व तो मला मारतो, नंतर मग आमची ओळख होते. मिस् प्रॅट, मला आतां थांबवूं नका. मी दोघांखेरीज इतर सर्वांना पिटून काढलें आहे, राहिलेल्या दोघांना मारूं द्या म्हणजे त्यानंतर माझ्यापासून तुम्हांला त्रास केव्हांही होणार नाहीं ! "

इतरांशीं वागण्याचे अनेक प्रकारचे मार्ग असतात व या मुलाचा मार्ग हा अशाचपैकीं एक होता. कित्येक मुलें आपला मार्ग देणग्या, पैसे अथवा अशाच कोणत्या तरी एखाद्या सवलतीवर प्राप्त करून घेत असतात. मोठीं मुलें अशाच प्रकारें वागत असतात व त्यांचें यश हें साधारणतया अशाच प्रकारचें असतें.

प्रतिपक्षाशीं वागण्याचे फक्त दोनच प्रामाणिक मार्ग असतात. एक तर तुम्हांला समझोता घडवून आणावा लागतो किंवा शेवटचा उपाय म्हणून मारामारी तरी करावी लागते. हा लहानगा मुलगा या पद्धतीचा फक्त उलट्या क्रमानें अवलंब करीत होता–तो प्रथम मारामारी करी व नंतर समझोता घडवून आणी.

जगांत सर्वत्र अशी शुभाकांक्षी माणसें असतात कीं जीं माणसांना समजूतदारपणाचाच मार्ग अवलंबिण्यास लावण्याचा प्रयत्न करीत असतात. जर जगांत बालपणापासूनच समझोत्याच्या मार्गाचें वळण लागलेले असे पुरेसे पुरुष व पुरेशा स्त्रिया असत्या; तर मग कदाचित त्यांच्यांत कधींच भांडणाचा प्रसंग उद्‌भवला नसता.

जगाच्या संत्रस्ततेसंबंधींचें हें अतिशयोक्त अथवा आभासात्मक असें स्पष्टीकरण आहे हें मला कबूल आहे. परंतु जगांतील सर्व माणसें हीं एके वेळीं बालकें होतींच आणि एकाद्या गोष्टीच्या चांगल्या अथवा वाईट वळणाचें मूळ शोधण्यासाठीं आपणाला बाल्यावस्थेचाच आढावा घ्यावा लागतो.

जर एकाद्या बालकाची आई त्याच्यावर योग्य प्रकारें प्रेम करीत असेल, एक मानवी व्यक्ति दुसऱ्या मानवी व्यक्तीच्या ठायीं ज्या प्रकारच्या आदर-पूर्ण भावनेनें वागते मग ती व्यक्ति कितीही लहान व असहाय असो अशाच प्रकारच्या साध्याभोळ्या आदराच्या भावनेनें जर ती माता आपल्या बाल-काशीं वागत असेल तर तें बालक खरोखरच सुदैवी होय. अशा बालकाचें स्वागत जग अशाच मित्रत्वाच्या नात्यानें करील. परंतु जीवनांत असे कांहीं इतर संबंध असतात कीं, ज्यांची कदर त्याला करावी लागतेच आणि सुजाण माता त्याला त्याच्या बरोबरीच्या वयाच्या इतर बालकांत आस्ते आस्ते मोकळें सोडून या कामीं त्याला मदत करीत असते. या बालकाला अपरिचित असलेलीं हीं वयस्थ बालकें या नव्या बालकाच्या मातेप्रमाणें केवळ त्याला काय पाहिजे असावें, असा विचार करीत नाहींत; तर आपल्याला काय पाहिजे व त्याची प्राप्ति कशी होईल असाच विचार तीं करीत असतात. अर्थात् अशा परिस्थितींत हें नूतन बालक स्वतःच स्वतःचा बचाव करण्यास शिकतें, वेळ आल्यास मारामारीहि करण्यास शिकतें, परतु मुख्यत्वें आपल्या या समवयस्क बालकांबरोबर खेळीमेळीनें राहाण्या-साठीं कशा प्रकारें वागलें पाहिजे हेंच तें शिकतें.

त्यानंतर त्याचें शालेय जीवनाला प्रारंभ होतो व ज्या ठिकाणीं अगदींच भिन्न अशा प्रकारची वागणूक त्याच्याकडून अपेक्षिली जाते अशा

एका अपरिचित जगांत तें बालक येऊन ठेपतें. शाळेंतील शिक्षकांना त्याच्याच सारख्या तीस चाळीस बालकांची काळजी घ्यावी लागत असल्यानें हें बालक शिक्षकाशीं मित्रत्व जोडूं शकत नाहीं. आपला वेळ घालविण्यासाठीं तें बालक आपल्या शेजारच्या बालकाशीं गप्पा गोष्टी करण्यास धजत नाहीं कारण तसें करणें ही वाईट प्रकारची वर्तणूक समजली जाते व त्यामुळें त्याला शिक्षाहि होण्याचा संभव असतो. जर त्यानें जादा उत्सुकता अथवा जादा खेळकरपणा दाखविला तर लगेच त्याच्यावर 'समाज-विघातक' असा शिक्का बसतो. केवळ मिलत्व ही त्रासदायक गोष्ट ठरते. सर्वसामान्य शाळेंत असें बालक इतर कांहींही शिकलें तरी इतरांमध्यें मिळून मिसळून कसें वागावें व त्यांच्या समवेत कसें रहावें हें कांहीं तेथें तें शिकणार नाहीं.

शालेय जीवन हें इतरत्रच्या जीवनाचें दुसरें स्वरूप आहे. आम्हांला जर बालकांना अनियंत्रित हुकुमशाही अंमलाखालीं राहाण्यास तयार करावयाचें असतें, तर मात्र कडक अशा शिस्तीची आवश्यकता मी समजूं शकलें असतें. परंतु आम्हांला त्यांना लोकशाही जगतांतील जबाबदार नागारिक बनवायचें होतें.

आमच्या शाळेचा अभ्यास व खेळ यांचा कार्यक्रम केवळ बालकांना उत्साही बनविण्यासाठीं तयार केलेला नव्हता तर बालकांच्या स्वाभाविक प्रवृत्तींचा व शक्तींचा त्यांच्या सर्व हालचालींमध्यें परस्परांशीं खेळीमेळीनें वागण्याकडे उपयोग करून घेतां येईल अशाच प्रकारें आंखण्यांत आला होता. बालका-बालकांत शाळेमध्यें होणारें संभाषण हें त्यांच्या घरगुती अथवा खेळाच्या मैदानावर होणाऱ्या संभाषणाइतकेंच स्वाभाविक होईल याबाबत आम्हांला केव्हांच संदेह वाटला नाहीं. ऐकणें व बोलणें यासाठीं विशिष्ट अशा वेळा असतात हें शिकण्याला इतर कोणत्याही स्थळाइतकेंच शाळा हेंही एक उत्तम स्थळ आहे असें आमचें मत होतें-सर्वांनीं एकाच वेळीं बोलण्यास सुरवात केली तर चर्चेचा शेवट होईल, तसेंच आपल्या शेजारीं असलेल्या बालकाला-आणि आपल्या शिक्षिकेला देखील एकदां

तरी कांहीं बोलायचें असेल व तें त्यांचें बोलणें ऐकण्यासाठीं आपण उद्युक्त असलें पाहिजे हें याच ठिकाणीं शिकायचें असतें.

आम्हीं आमचा वर्ग सजवितांना त्यांत डेस्क वा बाक यांचा निर्बंध ठेवला नाहीं, ठोकळे व खेळणीं आणि शाडूची माती व चित्र काढण्याचें सामान हें सर्व साहित्य यांचा सर्वांना सारखा उपयोग करतां यावा म्हणून उघड्या कपाटांत ठेवलें होतें. परंतु टेबलें मात्र ठेवलीं होतीं आणि तीं सुद्धां अशा रितीनें कीं, ज्यांच्यावर बालकांना एकत्रित रीत्या बसून खेळी-मेळीनें आपापलें इच्छित काम करतां यावें तथा वर्गांत एका बाजूला अशींही कांहीं टेबलें ठेवलेलीं होतीं कीं जर कोणा बालकांना आपलें काम करण्यासाठीं एकांताची आवश्यकता भासली तर त्यांना तसें करतां यावें.

प्रत्येक बालकाला आवश्यक असणाऱ्या वस्तू त्याच्या मालकीच्या होत्या. कपडे ठेवण्याचें कपाट प्रत्येकाचें वेगळें होतें. त्यावर त्या बालकाचें नांव लिहिलेलें असे. त्या कपाटांवर एक खण असे. त्यांत तीं आपलें सामान व स्वतः तयार केलेल्या वस्तू ठेवीत. सामायिक व वैयक्तिक अशा मालकीचा फरक यायोगें त्यांना कळून आला होता; सामाजिक जीवनांतील हा त्यांचा पहिला धडा होता.

हे उदयोन्मुख नागरिक परस्परांशीं नेहमींच गुण्यागोविंदानें रहात होते. असा जर यावरून निष्कर्ष काढला तर तो अवास्तव ठरेल. खेळण्यांची झोंबाझोंबी व त्यानंतर निर्माण झालेली मारामारी व नंतर निषेधार्थ केलेली आरडाओरड व किंकाळ्या यांच्यामुळेंच एक असा अवसर प्राप्त होत असे कीं, ज्या वेळीं त्यांच्या शिक्षिकांना शेजारधर्माबाबतचे धडे त्यांना देतां येत.

साधारणतः बालकांची एक अशी खोड असते कीं, तुम्हीं घ्याल तीच वस्तु त्यांना हवीशी होते. या त्यांच्या खोडीचा शिशुसंगोपनगृहांत एका विशिष्ट पद्धतीनें उपयोग करून घेतला जातो. समजा ही वस्तु म्हणजे एखादें खेळणें आहे. तें बालकानें तुमच्यापासून घेतल्यानंतर लगेच तें परत त्याच्या हातून हिसकून घेण्यांत येतें. त्यासाठीं प्रसंगीं त्या बालकाला एखादी थप्पड लगावण्यांत येते. अशा रीतीनें त्या बालकाला चांगला

धडा मिळतो. हें भांडण संपलें व त्या बालकाचा पूर्णतया निरुपाय झाला म्हणजे मग तें बालक आपली बाजू शब्दांत मांडूं लागतें. अशा रीतीनें आपलें मनोगत व्यक्त करण्यास तें शिकतें.

परंतु अशा प्रकारें एकाद्या खेळण्याच्या बाबतींत असा प्रश्न निर्माण झाला तर तो सोडविण्याचा मार्ग हा क्वचितच कठीण असतो. असाच एक प्रकार आमच्या शाळेंतही निर्माण झाला. एक बालक ठोकळ्यांची बोट तयार करीत होतें. त्याच्या त्या रचनेंत त्याला एका ठराविक ठोकळ्याची उणीव पडली व तो ठोकळा दुसऱ्या बालकाकडून हिसकावून घेण्याचा त्यानें प्रयत्न केला. परतु व्यर्थ. जेव्हां त्याला आपल्या या प्रयत्नांत अपयश आलें तेव्हां त्यानें आपल्या शिक्षिकेकडे आपली कैफियत मांडली व शिक्षिका कोणता उपाय अंमलांत आणते तें निमूट पहात राहाण्याचें ठरविलें. शेल्फवर तसलाच दुसरा एकादा ठोकळा होता का ? ज्या बालकाजवळ तो ठोकळा होता त्याच्या पूलबांधणीच्या कामांत व्यत्यय न येतां तें तो देऊं शकत होतें कां ? होय—बोट बांधणाऱ्या बालकाला पाहिजे असलेल्या लांब ठोकळ्याच्याऐवजीं दुसरे दोन लहान ठोकळे पूल बांधणाऱ्याला चालले असते. इतकें झाल्यानंतर आतां त्या पूल बांधणाऱ्या बालकाला तसें समजाविणें हें या बोट बांधणाऱ्या बालकाचें काम होतें; आणि या व्यतिरिक्त इतर दुसरें कोणतें कारण नसल्यानें या दोन बालकांत निर्माण झालेल्या तंट्याचा हा प्रसंग प्रत्येकाला समाधान होईल अशा प्रकारनें निभावला गेला.

कांहीं प्रसंगीं अशा एकाद्या वस्तूमुळें अथवा खेळण्यामुळेंच असे प्रसंग निर्माण होतात असें नाहीं; ज्या बालकानें अशी एकादी वस्तु दुसऱ्या बालकाकडून हिसकावून घेण्यास सुरवात केलेली असे. त्याला खरोखरच कांहींतरी भांडण उकरून काढावयाचें असे. अशा प्रसंगीं ती वस्तु म्हणजे केवळ निमित्तमात्र होत असे. असें बालक बहुधा प्रतिपक्षाशीं सलोख्यानें मिळतें घेण्यास तयार नसेच. अर्थात् अशा बालकाला प्रथम नीट ताळ्यावर आणावें लागतें. अशा बालकाला कांहीं काळ इतरांपासून एकीकडे बसविल्यानें आपली वागणूक ही योग्य नव्हती याची त्याला जाणीव होते व

त्याच वेळीं एकाकी अशा तऱ्हेनें काम केल्यानें आपल्या नैसर्गिक प्रवृत्तींनी व धारणाशक्तीला उत्पादक स्वरूपांत व्यक्त करण्याला संधि मिळते. अशा तऱ्हेनें केवळ नाइलाज म्हणून एकटें काम करावें लागल्यानें व कांहींतरी केल्याशिवाय गत्यंतर नसल्यानें तें बालक आपल्या कामांत शक्य तितकें लक्ष घालून तें काम यशस्वीरीत्या करीत असतें. अर्थात् इतरत्र त्याला आपल्या करामतीची इतकी सुढाळ प्रचीति आली नसती. ही आस्था म्हणजे त्याच्या मनांत अंतर्गत सुरक्षा व आत्मविश्वास निर्माण होण्याचा आरंभच होय आणि हीच अवस्था उत्तम सामाजिक संबंधाचा पाया होय.

भांडगतंटा ही कांहीं वेळां बाल्यावस्थेची एक अटळ अभिव्यक्तीच होय आणि प्रसंगीं अशा प्रकारें भांडणतंटा करणाऱ्या बालकांना कांहीं वेळां शाळेंत झगडूं देणें योग्यच होय. एकदां असाच एक प्रसंग शाळेंत निर्माण झाला. दहा वर्षें वयाच्या बालकांच्या गटांतील तीन ' गुंड ' बालकांनीं आपल्या वर्गाला चांगलीच दहशत बसवून ठेवली होती. त्यांनीं या इतर बालकांना शाळेच्या बाहेर एकेकट्याला गांठून चोप देण्याची भीति घातली होती. या इतर बालकांपुढें मोठी अडचण निर्माण झाली होती ती म्हणजे या तिघांच्याबरोबर एकेकट्यानें तोंड देऊन आपला बचाव करणें त्यांना शक्य नव्हतें.

ही गोष्ट आम्हांला कळतांच आम्हीं एका ' मुष्टि–युद्ध ' शिकविणाऱ्या शिक्षकाला बोलाविलें व आठवड्यांतून दोन वेळां त्यानें या बालकांना मुष्टियुद्धाचें शिक्षण देण्याचें सुरू केलें. अल्पावधींतच आमच्या या वर्गांत या गुंडांना तोंड देऊं शकणारे असे बाल–मुष्टियोद्धे तयार झाले. त्या वेळीं मात्र या तीन गुंडांनाही दहशत बसली व ते देखील मुष्टियुद्ध शिकण्यासाठीं उद्युक्त झाले. परंतु त्यांना जें उत्तर मिळालें तें असें कीं, मारामारी कशी करावी हें त्यांना ठाऊक असल्यानें मुष्टियुद्धाचे पाठ त्यांना देण्यांत वेळ खर्च करण्यास आमची तयारी नाहीं. अर्थात् त्यांचा दहशतवादी अंमल अशाप्रकारें नष्ट झाला.

केवळ भीतीमुळें बालकाला असहाय होऊं देतां नये. कोणत्याही गोष्टी-बाबतचा विचार करण्याची आपली शक्ती उपयोगाला आणून आपल्या

सोबत्यांबाबतचा एक ठराविक निष्कर्ष आपल्या मनाशीं ठरविण्यापूर्वीच ही अशा प्रकारची भीति त्यांच्या मनांतून काढून लावली पाहिजे. आमच्या या वर्गातील या तिघा गुंडांनीं धुमाकूळ घालून प्रत्येक बालकाला भिववून सोडलें होतें. ती त्यांची भीति मुष्टि युद्धाच्या शिक्षणानें घालवून दिली. बालक भ्यालें नाहीं तर प्राप्त प्रसंगांतून पळून न जातां त्या प्रसंगाला अभिमुख होऊन त्यांतून आपला बचाव कसा करतां येईल याचा तें विचार करूं लागेल. नंतरच त्याला पुढें कोणता मार्ग स्वीकारावयाचा वा काय उपाय करावयाचा यासंबंधीं निवड करायची असते. मदतीसाठीं आरडा-ओरड करणें, अथवा पोलीसांना जाऊन खबर देणें किंवा मारामारीस सज्ज रहाणें. अर्थात् यांत मारामारीचें स्वातंत्र्य हें या प्रसंगांतून सुटण्याचें उत्तर नाहीं, तर भीतीपासूनचें स्वातंत्र्य हेंच होय.

भित्रें बालक भिऊन जातें हें ओळखणें कांहीं कठीण नाहीं. परंतु या संबंधीचें गूढ सत्य हें कीं, एखाद्या भित्र्या बालकावर हल्ला करणारें बालक निर्भय असतें असें नाहीं. अशा वेळींच बालकांना मदत करणाऱ्या मित्राची जरूर भासते. अशा बालकाला दांडगा अथवा गुंड म्हणणें याचा कांहीं उपयोग होत नाहीं. त्या बालकाला भांडणास वा मारामारीस उद्युक्त करण्याला कदाचित एकादें भावनाविवश असें व्यक्तिगत कारण असूं शकेल. आणि माझ्या मतानुसार जी एक सामाजिक–शिस्त आहे व जिची मी तरफदारी करतें त्यांच्यामुळें सर्व वादंग सोडविले जातीलच असें मी म्हणूं शकत नाहीं.

मारामारी करणाऱ्या बालकाला एकाद्या विशिष्ट मदतीची अत्यंत आवश्यकता असणें शक्य आहे. कदाचित ती मानसिक स्वरूपाचीही असेल आणि ही उणीव भरून काढून त्याला त्याच्या मानसिक त्रासांतून सोडविण्याला त्याच्या आई–वडिलांनीं अथवा शिक्षकांनीं केलेले प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळें समाजहितविरोधी वागणूक करणें त्याला भाग पडलें असावें. अशा वेळीं त्याला रामबाण अशा प्रकारची मदत मिळवून देण्याला वेळ खर्च करणें शक्य नसतें.

आपण अपेक्षा करतों त्यापेक्षांही चांगल्या प्रकारें बालकें परस्परांना ओळखीत असतात. आमच्या शाळेंतील नऊ वर्षांच्या मुलांना एकदां बेस-बॉलचा खेळ खेळतांना नीट पहात होतें. त्यांच्यापैकीं एक मुलगा दुसऱ्या मुलांना अद्वातद्वा बोलून आपल्या अपयशाचें खापर त्यांच्यावर फोडीत होता. त्यांचा हा खेळ आटोपल्यानंतर या मुलाच्या वागण्याचें स्पष्टीकरण मला सांपडलें. मीं त्या मुलाच्या अपरोक्ष इतर बालकांना तत्संबंधीं विचारलें व तीं त्याच्याशीं अशीं कां वागतात असें विचारलें. त्यावर एका लहानग्या बालिकेनें सांगितलें "मिस् प्रॅट, कां म्हणून विचारतां? तुम्हांला तो कसा आहे तें ठाऊक नाहीं. तो नेहमींच तसा वागतो. आम्ही मग त्याच्याकडे नेहमींच दुर्लक्ष करतों. त्याच्याबरोबर वागण्याला हाच एक मार्ग आहे."

एका विशिष्ट अशा प्रकारच्या परिस्थितींचें हें प्रत्यक्षांतील विश्लेषण होय. परंतु त्याला कांहीं सामाजिक मूल्य आहे असें नव्हे. या बालकांपेक्षां वयानें मोठ्या असणाऱ्या बालकांना जोसेफ ( त्या बालकाचें नांव ) बाबत अधिक जबाबदारी स्वीकारावी लागली असती—कारण या बालकांनीं जो विचारीपणा दाखविला तो तसा न दाखविणा-या अशा वेगळ्या बालकांत जोसेफची काय अवस्था होईल? समाज—शिक्षणाची ही एक दुसरी बाजू आहे,— एका विशिष्ट समुदायाची त्या समुदायांतील प्रत्येक व्यक्तीच्या बाबतची जबाबदारी हीच होय.

मोठ्या बालकांच्या बाबतींत आम्ही त्यांना आपल्या सारासार विचार-शक्तीचा वापर करण्यासाठीं खास संधी निर्माण केल्या. तेरा वर्षें वयाच्या बालकांच्या वर्गाची मीं विभागणी केली व प्रत्येक विभागाकडे शिशुसंगोपन शाळेंतील कांहीं लहानग्या बालकांच्या गटाची जबाबदारी दिली. त्यांनीं या लहानग्या बालकांच्या वागणुकीकडे लक्ष ठेवलें व आपल्या मतानुसार त्यांच्या वाटण्याचे अर्थ काय असावेत तें कळविलें.

एकदां अशीच मी व्यायामशाळेच्या जागेत पांच वर्षें वयाच्या बाल-कांच्या संगीताच्या तासाच्या वेळीं हजर होतें. माझ्याबरोबर या बालकांचें निरीक्षण करण्याचें काम ज्या तेरा वर्षांच्या बालकांकडे दिलेलें होतें तीं बालकेंही होतीं. या पांच वर्षांच्या बालकांपैकीं एक बालिका इतर सर्वजण

८७४९

उठून उभे राहिले तरी देखील ती जमिनीवर पडूनच होती. या बालिकांच्या अशा वागण्यानें काय सूचित होतें असें मीं या माझ्या बरोबरच्या छोट्या निरीक्षकांना विचारलें. त्या सर्वांनीं एकच सांगितलें कीं, इतर बालकांप्रमाणें तिला या प्रसंगीं नेमकें काय करावयाचें याची जाणीव झालेली नाहीं; तिच्याकडे जास्त लक्ष पुरविणें आवश्यक आहे.

विशिष्ट अशा परिस्थितींतील विशिष्ट हालचालींचा व वागण्याचा अर्थ व त्यांतून काय सूचित होतें हें बरोबर ओळखण्यांत हीं तेरा वर्षें वयाचीं बालकें जितकीं तल्लख होती तितकी तल्लखता आमच्या विद्यार्थी शिक्षकांत देखील नव्हती. या पांच वर्षांच्या बालिकेप्रमाणेंच असणाऱ्या इतर बालकांकडे लक्ष पुरविणें आवश्यक आहे. त्यांची मानसिक वाढ योग्यरीत्या होत नसल्याचें ओळखण्यांत हे आमचे छोटे निरीक्षक अत्यंत तल्लख होते.

आमची त्या संबंधीची चर्चा झाल्यानंतर जेव्हां आम्ही त्या वर्गाच्या शिक्षिकेनें सादर केलेला अहवाल वाचला त्या वेळीं या छोट्या निरीक्षकांनीं काढलेल्या निष्कर्षांपैकीं पुष्कळसे निष्कर्ष हे या अहवालाशीं जुळणारे आहेत असें आम्हांला आढळून आलें. एकंदरींत आमचे छोटे निरीक्षक म्हणजे चिमुकले मानसशास्त्रज्ञच ठरले.

आमच्या चर्चेत एकदां या बाल-निरीक्षकांनीं लहान बालकांचे दोन वर्ग करण्याचें सुचविलें. जीं बालकें आपल्याच अंतःस्फूर्तीनें एकादी गोष्ट करूं शकण्यास समर्थ आहेत, त्यांचा एक वर्ग व दुसरा म्हणजे ज्यांना क्रियाशील बनण्यासाठीं बाह्य स्फूर्तींवर अवलंबून रहावें लागतें त्यांचा होय.

त्यानंतर मी त्यांचें लक्ष त्यांच्याच गटाकडे वळविलें. त्यांनीं परस्परांच्या स्वाभाविक गुणांचें विश्लेषण केलें व त्यांच्यापैकीं कांहीं बालकें आपल्या स्वतःच्या जोरदार प्रेरणांकरवींच आपापलीं कार्यें करीत असल्याचें त्यांनीं तत्काळ ताडलें. तसेंच त्यांनीं हें मान्य केलें कीं, आपल्या कार्यांत गढून जाऊन क्वचितच देहभान विसरणारा असा एक मुलगा होता.

स्वतःबद्दलची अशी जाणीव असणाऱ्या या बालकाचा त्यांनीं नामोल्लेख केला नाहीं. या बालकाच्या या दोषाचें उच्चाटन करण्यासाठीं त्यांच्या-

कडे अधिक लक्ष पुरविणें आवश्यक होतें. इतर बालकांनीं जरी या बालकाचें नांव उघड करण्यास टाळलें तरी स्वत: त्या मुलानें आपलाच हा दोष असल्याचे सांगितलें. तो म्हणाला "मला तें माहीत आहे, आणि माझ्यामधील हा दोष नाहींसा होणार नसेल तर मी मरण पत्करीन"

आपले स्वत:चे व परस्परांचे दोष समजण्याची बालकांना शक्ति नसते असा आपला चुकीचा ग्रह असतो. आपल्या अपेक्षेपेक्षां जास्तच त्यांची अवलोकन व श्रवणशक्ति असते; आणि प्रसंगीं आपल्या अवलोकनाचें वर्णन तीं शब्दांत देखील करूं शकतात.

उदाहरणादाखल बालकांत एके प्रसंगीं झालेल्या संभाषणाचा गोषवारा पुढें दिला आहे. हें संभाषण एका विद्यार्थी - शिक्षकानें आडून ऐकलें:–

इव्हेलीन: "टॉमी, मला तुझी आई आवडत नाहीं."

स्यू: "त्याची आई तुला कां आवडत नाहीं."

इव्हेलीन: "कारण तिच्या अंतर्यामीं दयामायाच नाहीं. ?"

टॉमी: "पण तें तुला कसं कळलं? आमच्या बाबांशी ती कशी वागते तें पहा म्हणजे समजेल."

या संभाषणांतील आशय ऐकून आश्चर्यमूढ होणारा पालक आढळणार नाहीं. माझ्या मनांत देखील त्या योगें एक भीतीची क्षणिक लाट तरळून गेली. भीती वाटणें साहजिकच आहे. आपल्या पालकत्वाखालीं असणाऱ्या या बालकांना त्यांच्यावरील आपल्या ताबेदारीची जाणीव असते तसेंच त्यांच्या हिताला बाधा आणणाऱ्या आपल्या स्वभावांतील विशिष्ट गोष्टीही त्यांना उमगलेल्या असतात. खरें पाहिलें असतां आपण जें त्यांना वारंवार म्हणत असतो "चांगलें बालक होण्याचा प्रयत्न कर, त्यांत फारच स्वल्प तथ्य असतें; त्या ऐवजीं त्यांना "चांगला मोठा माणूस हो" असें म्हणणेंच अधिक श्रेयस्कर ठरेल.

REFBK-0007751